





# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शनिवार १४ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







## राजस्थानमध्ये भीषण अपघात

## खाटू श्याम बाबांच्या दर्शनासाठी जाणा-या तिघांचा मृत्यू

**नागपूर/प्रतिनिधी :** राजस्थान येथील रिंगस परिसरातील खाटु श्यामबाबा मंदिरात दर्शनासाठी गेलेल्या कामठी येथील पारसे कुटुंबावर काळाने भीषण घाला घातला. सालासर रोड येथे झालेल्या भीषण अपघातात आई-वडील व मुलाचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात सात जण गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, कचरीपुरा (कामठी) येथील महादेव त्र्यंबी पारसे (५२) हे ६ मार्च रोजी त्यांच्या घराशेजारी राहणारे मनोज चिंदमवार (३५) यांच्या मालकीच्या तवेरा गाडी (एमएच २८ व्ही ५२३४) ने कुटुंबीयांसह देवदर्शनासाठी रवाना झाले होते. त्यांच्या सोबत पत्नी कांता महादेव पारसे (४५), मुलगा घनश्याम महादेव पारसे (२२), पुतणी आराधना चंद्रभान पारसे (२६), पायल शंकर पारसे (२२), पल्लवी चंद्रभान पारसे (२१), पूनम यादव पारसे (२०), तुषार महादेव पारसे (२४) आणि पवन बागडे (२२), असे एकूण दहा जण होते. सर्व जण ६ मार्च रोजी मध्यरात्री सुमारे बारा वाजता कामठीतून निघाले होते. प्रवासादरम्यान त्यांनी ऊज्जैन येथील महाकालेश्वर येथे दर्शन घेतले. त्यानंतर बुधवारी ११ मार्च रोजी सायंकाळी सुमारे सहा वाजताच्या सुमारास ते राजस्थानातील रिंगस येथे खाटू श्यामबाबा मंदिरात दर्शनासाठी जात असताना जयपूर मार्गावरील सालासर परिसरात त्यांच्या तवेरा वाहनाला विरुद्ध दिशेने येणा-या अनियंत्रित पिकअप वाहनाने जोरदार धडक दिली.



## इंधन पुरवणारे विमान इराकमध्ये कोसळले; चौघांचा मृत्यू

**तेहरान/वृत्तसंस्था :** इराकमध्ये अमेरिकेचे लष्करी विमान कोसळले असून यामध्ये सहापैकी चारजणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त समोर येत आहे. यूएस सेंट्रल कमांडने याबाबत शुक्रवारी अधिकृत माहिती दिली. लांब पल्ल्याच्या मोहिमांमध्ये वापरले जाणारे लढाउ विमान केसी १३५ एरिअल टँकर हे विमान कोसळले आहे. इतर विमानांना इंधन भरण्यासाठी हे विमान वापरले जात असे. १२ मार्च रोजी पश्चिम इराकमध्ये अमेरिकेचे केसी-१३५ विमान कोसळले, असे यूएस सेंट्रल कमांडने सांगितले. कमांडने असेही म्हटले आहे की विमानाचे नुकसान शत्रू देशाने केलेल्या गोळीबारामुळे किंवा मैत्रीपूर्ण गोळीबारामुळे झाले नाही आणि या घटनेच्या सभोवतालच्या परिस्थितीचा सध्या तपास सुरू आहे. इराकमध्ये कार्यरत असलेल्या इराण-समर्थित इस्लामिक गटाने विमान पाडण्याची जबाबदारी स्वीकारली आहे, तर वृत्तसंस्था रड्युटर्सच्या म्हणण्यानुसार, अमेरिकन सैन्याने म्हटले आहे की या अपघातासाठी शत्रू देशाची कृती जबाबदार नव्हती. तसेच, यूएस सेंट्रल कमांडने म्हटले आहे की या घटनेत दोन विमानांचा समावेश होता. एक विमान सुरक्षितपणे उतरले, तर दुसरे पश्चिम इराकवर कोसळले. ऑपरेशन एपिक फयुरी दरम्यान ही घटना मैत्रीपूर्ण हवाई क्षेत्रात घडली आणि बचावकार्य सुरू आहे, असे इराणला लक्ष्य करणा-या अमेरिकेच्या लष्करी मोहिमेचा संदर्भ देत कमांडने म्हटले आहे. परिस्थिती अजूनही सुधारत असून नाव न सांगण्याच्या अटीवर बोलताना एका अमेरिकन अधिका-याने सांगितले की, या घटनेत सामील असलेले दुसरे विमानसुद्धा केसी-१३५ टँकर होते.



## पाकच्या एअर स्ट्राईकने काबूल-कंदाहार हादरले; महिला व मुलांसह 4 ठार

**कराची /वृत्तसंस्था-**अमेरिका-इस्त्रायल आणि इराणमधील युद्धामुळे जगभरात चिंतेचे वातावरण असतानाच आपल्या शेजारील राष्ट्र असलेल्या पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील तणाव पुन्हा वाढला आहे. कारण पाकिस्तानाने अफगाणिस्तानमधील विविध ठिकाणी हवाई हल्ले केले असून या हल्लात चौघांचा मृत्यू तर १५ जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. पाकिस्तानने कंदाहार विमानतळाजवळील खासगी विमान कंपनीच्या तेल साठ्यावर बाम्ब हल्ला केल्याचा आरोप तालिबान सरकारने केला आहे. दरम्यान, पाकिस्तानी लष्कराने तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान या संघटनेच्या तळाला अचूक लक्ष्य केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. अफगाणिस्तान तहरीक-ए-तालिबानच्या दहशतवाद्यांना आसरा देत असल्याचा आरोप पाकिस्तानकडून करण्यात येतो. मात्र, अफगाणिस्तानने हे दावे फेटाळत अफगाणिस्तानच्या जमिनीचा वापर दुस-या देशावर हल्ले करण्यासाठी केला जात नसल्याचे स्पष्ट केले आहे. शिवाय दहशतवाद ही पाकिस्तानची अंतर्गत समस्या असल्याचा दावा देखील तालिबान सरकारने केला आहे. दरम्यान, पाकिस्तानने काबूलमधील नागरी वस्तीत बाम्ब हल्ला केल्याची माहिती काबूल पोलिसांनी दिली आहे. या हल्ल्यात चार नागरिकांचा मृत्यू झाला असून १५ नागरिक जखमी झाल्याचेही पोलिसांनी सांगितले आहे. तर तालिबान सरकारचे प्रवक्ते जबीहुल्लाह मुजाहिद यांनी एक्सवर पोस्ट करत या हल्ल्याची माहिती दिली आहे. दक्षिणेकडील कंदाहार प्रांत पत्तिया आणि पत्तिका या पूर्वेकडील प्रांतांवरही पाकिस्तानने हल्ला केल्याची माहिती तालिबानने दिली आहे. तर आता पाकिस्तानच्या या हल्ल्याला तालिबान कशा प्रकारे प्रत्युत्तर देणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.



## गॅस सिलिंडरच्या नावाखाली महिलांच्या खात्यातून 4 लाख लाटले

**मुंबई/प्रतिनिधी-**कल्याण- डोंबिवली परिसरात ऑनलाईन फसवणुकीचे एक धक्कादायक प्रकरण समोर आले. महानगर गॅस लिमिटेडचे प्रतिनिधी असल्याचे भासवून सायबर भामट्यांनी दोन महिलांच्या बँक खात्यातून तब्बल ४ लाख रुपये लुटले. विशेष म्हणजे, गॅस सिलिंडरच्या तुटवड्याचा फायदा घेत फसवणुकीचा हा नवा फंडा वापरला जात असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सहाय्यक पोलिस आयुक्त सुहास हेमाडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिलांना एका अनोळखी क्रमांकावरून फोन आला. फोन करणा-या व्यक्तीने आपण गॅस वितरण कंपनीतून बोलत असल्याचे सांगितले. तुमची गॅसची माहिती अपडेट करायची आहे, अन्यथा गॅस पुरवठा खंडित होउ शकतो, अशी भीती त्याने महिलांना घातली. भामट्याने महिलांचा विश्वस संपादन करून त्यांना व्हाट्सअॅप किंवा मेसेजद्वारे एक अढङ फाईल पाठवली. महिलांना ही फाईल डाउनलोड करून त्यातील एक फार्म भरण्यास सांगण्यात आले. महिलांनी ही लिंक उघडून फार्म भरताच, सायबर चोरांना त्यांच्या फोनचा आणि बँक खात्याचा ताबा मिळाला. काही वेळातच दोन्ही महिलांच्या खात्यातून एकूण ४ लाख रुपये डेबिट झाल्याचे संदेश आले, तेव्हा त्यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. या प्रकरणी डोंबिवली पोलिस ठाण्यात ऑनलाईन आर्थिक फसवणुकीचे दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# त्र्यंबक-नाशिकचा कुंभमेळा जगाला आकर्षण वाटणारा असावा-मुख्यमंत्री

### 22 हजार 181 कोटी रूपयांच्या कामांना मान्यता | नाशिक सिंहस्थ कुंभमेळा शिखर समिती बैठक





**मुंबई/प्रतिनिधी :** त्र्यंबक-नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन २०२७ मध्ये करण्यात येत असून या कुंभमेळ्यात देश-विदेशातून करोडो भाविक येणार आहेत. कुंभमेळ्याच्या माध्यमातून येथे येणारा प्रत्येक भाविक भारताची पर्यायाने महाराष्ट्राचे प्रतिबिंब सोबत नेणार आहे. त्यामुळे याच्या यशस्वी आयोजनातून जगाला आकर्षण वाटणारा कुंभमेळा करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

त्र्यंबक-नाशिक सिंहस्थ कुंभमेळाकरिता करण्यात येत असलेल्या विविध कामांसाठी २२ हजार १८१ कोटी रु पयांच्या कामांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवनात आयोजित कुंभमेळा शिखर समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यामध्ये पहिल्या टप्प्यातील ५ हजार १४० कोटी आणि दुस-या टप्प्यातील १७ हजार ४१ कोटी रु पयांच्या कामांचा समावेश आहे. कुंभमेळा निमित्त सुरू असलेली आणि प्रस्तावित असलेल्या कामांमध्ये कुणी वाईट हेतूने किंवा मुद्दाम विलंब होण्याच्या हेतूने अडथळा आणत असेल, तर त्याची गय केली जाणार नाही. त्याच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला. बैठकीला अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार सीमा हिरे, आमदार देवयानी फरांदे, आमदार सरोज अहिरे, आमदार सर्वश्री पंकज भुजबळ, माणिकराव कोकाटे, दिलीप बनकर, हिरामण खोसकर, राहुल ढिकले, नाशिकच्या महापौर हिमगौरी आहेर उपस्थित होत्या.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कुंभमेळा निमित्ताने करण्यात येणा-या कामांकरिता लागणा-या जमिनीच्या भूसंपादनाचा योग्य मोबदला शेतक-यांना देण्यात यावा. नाशिक वर्तुळ मार्गातील अडथळे दूर करीत विशेष बाब म्हणून ५० टक्के भूसंपादन पूर्ण झाल्यानंतर रस्त्याच्या कामाला सुरुवात करावी. कुंभमध्ये स्वच्छता अत्यंत महत्वाची असून या कामांमध्ये करण्यात येणारी शौचालय दर्जेदार असावी. कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकच्या परिसरातील स्थानकांची पायाभूत सुविधांची कामे रेल्वेच्या माध्यमातून सुरू करण्यात येत आहेत. यामध्ये निफाड रेल्वे स्थानकाचाही समावेश करण्यात यावा, याबाबत रेल्वेने पडताळणी करून कार्यवाही करावी.कुंभमेळ्यासाठी येणारे भाविक शिर्डी व शनिशिंगणापूरला निश्चितपणे जाणार आहेत. त्यामुळे शिर्डी ते ➪(पान २ वर)

## गॅसची ऑनलाईन व घरपोच सेवा ठप्प!



**मुंबई/प्रतिनिधी-** गेल्या दोन दिवसांपासून राज्यात गॅस तुटवड्याने नागरिक पुन्हा एकदा रांगेत उभे ठाकले आहेत. नोटाबंदीची आठवण नागरिकांना झाली आहे. भर उन्हात नागरिकांना गॅस सिलिंडरसाठी रांगेत उभे राहावे लागत आहे. आतापर्यंत घरपोच सेवा देणा-या कंपन्यांचे गॅस बुकिंगचे नंबर बंद येत असल्याने नागरिकांच्या संतापाचा कडेलोट झाला आहे. अनेक ठिकाणी गॅस एजन्सीवर गदारोळ होत आहे. तर नागरिक संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत. तीन-चार तास रांगेत उभे राहूनही गॅस सिलिंडर मिळेल याची शाश्वती नसल्याने सर्वसामान्यांचा पारा उन्हापेक्षा अधिक वाढला आहे.

प्रशासन घरगुती गॅस पुरवठा सुरळीत असल्याचा दावा करत असताना वास्तव मात्र वेगळेच दिसत आहे. परिणामी गॅस मिळवण्यासाठी ग्राहकांना एजन्सीच्या बाहेर लांबच लांब रांगा लावाव्या लागत आहेत.

काही ग्राहकांनी जादा दर मिळवण्यासाठी कृत्रिम टंचाई निर्माण केली जात असल्याचा आरोप केला आहे. तसेच ऑनलाईन बुकिंगची सुविधा सुरळीत नसल्याने अनेक ग्राहकांना मनःस्ताप सहन करावा लागत असून गॅस पुरवठा तातडीने सुरळीत करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. बीडमध्ये गॅस एजन्सीच्या कारभारामुळे सर्वसामान्य नागरिक अक्षरशः त्रस्त झाले आहेत. आखाती देशातील युद्धाचा परिणाम आता थेट बीड जिल्ह्यातील नागरिकांवर होत असल्याचे दिसू लागले आहे. गॅस एजन्सीकडून घरपोच डिलिव्हरी पूर्णपणे बंद करण्यात आली आहे तर बुकिंगसाठी दिलेले फोन नंबरही सतत बंद येत असल्याने ➪(पान २ वर)

## राज्यात गारपिटीसह वादळी पावसाचा अंदाज

### हवामान विभागाच्या इशा–याने प्रशासन सतर्क

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील काही भागांमध्ये १७ ते २० मार्च दरम्यान मेघगर्जनेसह पाउस, विजांचा कडकडाट आणि वादळी वा-यांची शक्यता हवामान विभागाने व्यक्तकेली आहे. हा परिणाम प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, खान्देश आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये जाणवू शकतो. १८ ते २० मार्च दरम्यान परिस्थिती अधिक तीव्र होण्याची शक्यता असून काही ठिकाणी गारपीट होण्याचीही शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी अडचणीत येण्याची शक्यता आहे.



रबी हंगामातील पिकांची काढणी सुरू असल्याने शेतक-यांनी काढलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवावीत. हवामानाच्या अद्ययावत अंदाजावर लक्ष ठेवून शेतीची कामे नियोजित वेळेत करावीत आणि संभाव्य पाउस व वादळी वा-यांपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे कृषी विभागाकडून आवाहन करण्यात आले आहे. नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतक-यांचे मोठे नुकसान झाले होते. त्यात रबीचे पीक हातात आले तर त्यांना मोठा दिलासा मिळणार होता. मात्र, १७ मार्चला➪(पान २ वर)

## मोनालिसाच्या मृतदेहाचे 35 तुकडे मिळतील :साध्वी प्राची


**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** कुंभमेळ्यात व्हायरल झालेल्या मोनालिसा भोसले हिने फरमान खान याच्यासोबत लग्न केले. हा लव्ह जिहाद असल्याचा आरोप केला गेल्याने त्यांचे लग्न वादात सापडले. मोनालिसा आणि तिचा पती फरमान यांनी पत्रकार परिषद घेउन खुलासा केला असला, तरी हा वाद थांबलेला नाही. आता साध्वी प्राची आर्या यांनी मोनालिसाची हत्या होईल आणि तिच्या मृतदेहाचे ३५ तुकडे मिळतील असे म्हटले आहे. साध्वी प्राची म्हणाल्या, फरमानने हिंदू धर्म स्वीकारून लग्न केले असते, तर आम्ही त्याचे स्वागतच केले असते. पण, त्याने मोनालिसासोबत लव्ह जिहाद केला आहे. मोनालिसा ही माध्यमांनी मोठी केलेली मुलगी आहे. तिला ना लव्ह जिहाद माहीत आहे, ना मदरशांमध्ये दिल्या जाणा-या प्रशिक्षणाबद्दल.



**शिक्षण आणि करिअर मार्गदर्शन-** फरमान खान आणि मोनालिसा यांच्या लग्नाबद्दल साध्वी आर्या म्हणाल्या, मोनालिसासोबत लवकरच दगाफटका होईल. जेव्हा तिची कमाई बंद होईल, तेव्हा तिचे ३५ तुकडे मिळतील. मोनालिसाची अवस्थाही निकिता तोमर हत्याकांडासारखीच होईल.श्रद्धा वालकरसारखीच तिची➪(पान २ वर)

## 'भारत आमचा मित्र'-इराणी राजदूत

### भारतीय जहाजांसाठी होर्मुझची सामुद्रधुनी खुली होणार?



**तेलअवीव/वृत्तसंस्था :** अमेरिका-इस्त्रायल आणि इराणमध्ये सुरू असलेल्या युद्धाला आज तब्बल १४ दिवस पूर्ण झाले आहेत. अमेरिका-इस्त्रायल रोज संयुक्तपणे इराणवर हल्ले करत आहे, तर इराणही प्रतिहल्ले करत असून हे युद्ध आणखी भडकण्याची चिन्ह आहेत. या युद्धामुळे जगभरात चिंता व्यक्त केली जात असून या युद्धाचा फटका जगातील अनेक देशांना होत आहे.अमेरिका-इस्त्रायल आणि इराणमधील युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनीत तणावाची परिस्थिती निर्माण झाली असल्याने कच्च्या तेलाचा व्यापार ठप्प होण्याच्या मार्गावर आहे. होर्मुझ सामुद्रधुनीत तणावाची परिस्थिती असल्यामुळे भारतालाही याचा मोठ्या प्रमाणात फटका बसत आहे. मात्र, असं असताना भारतासाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. भारतीय जहाजांसाठी होर्मुझची सामुद्रधुनी खुली होण्याचे संकेत मिळत आहेत. याबाबत इराणचे भारतातील राजदूत मोहम्मद फथाली यांनी एक मोठं वक्तव्य➪(पान २ वर)

## लोकसभेत 8 खासदारांच्या निलंबनावरून घोषणाबाजी

# कामकाज सोमवारपर्यंत तहकूब

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** लोकसभेत विरोधी बाकांवरील ८ निलंबित खासदारांच्या मुद्यावरून आज, शुक्रवारी विरोधी पक्षांनी जोरदार गोंधळ घातला. प्रश्नोत्तराचा तास सुरू होताच विरोधी पक्षाच्या खासदारांनी ८ निलंबित खासदारांना पुन्हा सभागृहात प्रवेश देण्याची मागणी करत घोषणाबाजी केली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यासह अनेक विरोधी पक्षाच्या खासदारांनी या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेतल्याचे दिसून आले.



सभागृहात सुरू झालेल्या गोंधळामुळे कामकाज सुरळीत चालू शकले नाही. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी खासदारांना शांततेचे आवाहन करत संसदेची प्रतिष्ठा राखण्याचे आवाहन केले. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, जर तुम्ही सभागृहात टेबलांवर चढलात, तर अशा वर्तनावर कारवाई होणारच. संसदेची प्रतिष्ठा राखण्याची जबाबदारी प्रत्येक सदस्याची आहे. परंतु, त्यानंतही दगारोळ सुरूच होता. विरोधकांच्या गोंधळामुळे लोकसभा प्रथम दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आली. त्यानंतर पुन्हा कामकाज सुरू करण्याचा प्रयत्न झाला, मात्र पुन्हा गोंधळ सुरू झाल्याने लोकसभेचे कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. त्यानंतर दुपारी २ वाजता कामकाज सुरू झाले असले तरी ते केवळ एक तासच चालू राहिले. सततच्या घोषणाबाजी आणि गोंधळामुळे अखेर लोकसभेचे कामकाज १६ मार्चपर्यंत तहकूब करण्याचा निर्णय घेण्यात आला. संसदेतील या गोंधळामुळे महत्त्वाच्या विधेयकांवर चर्चा आणि इतर कामकाजावरही परिणाम झाल्याचे दिसून आले. यावेळी विरोधकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधातही जोरदार घोषणाबाजी केली. एलपीजी सिलिंडरच्या वाढत्या किमती आणि इंधन संकटाचा मुद्दा उपस्थित करत विरोधी पक्षाच्या खासदारांनी संसदेच्या परिसरात फलक आणि बॅनर दाखवत निषेध नोंदवला.दरम्यान, या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले की, आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे देशासमोर काही आर्थिक अडचणी निर्माण होत आहेत. सरकार परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी तसेच अर्थव्यवस्था स्थिर ठेवण्यासाठी आवश्यक पावले उचलत आहे. अशा संवेदनशील परिस्थितीत विरोधकांनी सरकारच्या खांद्याला खांदा लावून उभे राहणे अपेक्षित आहे. मात्र, सध्या ते बेजबाबदारपणे वागत असल्याचे सीतारामन म्हणाल्या.

### मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवण्याच्या नोटीस दाखल


***नवी दिल्ली-*** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना त्यांच्या पदावरून हटवण्यासाठी दोन्ही सभागृहात प्रस्ताव आणला आहे. आपल्या भाषणादरम्यान, सीतारमण यांनी बिजनौरच्या नगीना येथील खासदार चंद्रशेखर रावण यांना त्यांच्या नावातून 'रावण' हा शब्द काढून टाकण्यास आणि त्याऐवजी 'विदुर' असे शब्द वापरण्यास सांगितले, कारण महाभारत संपल्यानंतर विदुर बिजनौरमध्ये आला होता.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अमरावती जिल्हा उष्णतेच्या लाटेचा सामना करण्यासाठी सज्ज; 'इन-क्रिस' प्रकल्पांतर्गत उपाययोजनांना वेग

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात वाढत्या उष्णतेच्या लाटेचे संकट आणि हवामान बदलाचा धोका लक्षात घेता, जिल्हा प्रशासन आता अधिक सतर्क झाले असून विविध प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी सज्ज झाले आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अमरावती आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने, गृह मंत्रालय, भारत सरकार, 'जीआयझेड' आणि 'आद्रा इंडिया' यांच्या सहकार्याने जिल्ह्यात 'एकात्मिक हवामान जोखीम व्यवस्थापन' (In CRIS) हा विशेष प्रकल्प राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश जिल्ह्यातील सर्वात असुरक्षित घटक असलेल्या शेतकरी आणि शेतमजुरांचे तीव्र उष्णतेपासून



संरक्षण करणे हा आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पहिल्या टप्प्यात पुसदा, यावली, शिराळा, रोहनखेड, भातकुली, खोलापूर आणि दारापूर यांसारख्या निवडक गावांमध्ये सखोल मूल्यांकन आणि अंतर विश्लेषण करण्यात आले. या प्रक्रियेत अल्पभूधारक शेतकरी, महिला शेतकरी, शेतमजूर तसेच आशा स्वयंसेविका आणि अंगणवाडी सेविकांशी थेट संवाद साधून उष्णतेचा त्यांच्या आरोग्यावर आणि उपजीविकेवर होणारा परिणाम अभ्यासण्यात आला. या अभ्यासातून समोर आलेल्या निष्कर्षांच्या आधारे, आता हा प्रकल्प प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या टप्प्यात प्रवेश करत आहे. यामध्ये प्रामुख्याने शेतकरी आणि बाहेरील कामगारांसाठी 'शितकक्ष कॉरिडॉर', विश्रांती क्षेत्रे, थंड पाण्याचे डिस्पेंसर आणि 'ग्रीन शेड' (हिरव्या सावलीची ठिकाणे) उभारली जाणार आहेत, ज्यामुळे अति तापमानात आरोग्य आणि उत्पादकता टिकवून ठेवण्यास मदत होईल. केवळ पायाभूत सुविधाच नव्हे, तर जनजागृतीवरही प्रशासनाने मोठा भर दिला आहे. 'काय करावे आणि काय करू नये' याबद्दलचे प्रशिक्षण, लिंग-विशिष्ट उष्णता असुरक्षिततेवर चर्चा आणि विविध प्रचार साहित्याद्वारे समुदायाची क्षमता बांधणी केली जाणार आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून जिल्हाधिकारी येरेकर अध्यक्षतेखाली आरोग्य विभागाची विशेष बैठक आयोजित करण्यात येणार आहे. संपूर्ण जिल्ह्यात उष्माघाताबाबत व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. गृहनिर्माण, आरोग्य, हिरवळीची जागा आणि पाणी या क्षेत्रांमधील समन्वयातून उष्णतेशी संबंधित धोके कमी करण्यासाठी अमरावती जिल्हा प्रशासन आता पूर्णतः सज्ज झाले आहे.

# आज प. बंगालमध्ये, 18,680 कोटी रूपयांच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** पंतप्रधान नरेंद्र मोदी १४ मार्च २०२६ रोजी पश्चिम बंगालला भेट देतील. दुपारी २ वाजता पंतप्रधान कोलकाता येथे सुमारे १८,६८० कोटी रु पयांच्या अनेक विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करतील. या प्रदेशातील रस्ते पायाभूत सुविधांना मोठी चालना देण्यासाठी, पंतप्रधान सुमारे १६,९९० कोटी रु पये खर्चाच्या ४२० किमी पेक्षा जास्त लांबीच्या अनेक राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करतील. उद्घाटन होणा-या प्रकल्पांमध्ये पश्चिम बंगाल आणि झारखंडमधील राष्ट्रीय महामार्ग-१९ आणि पश्चिम बंगालमधील राष्ट्रीय महामार्ग-११४ चे भाग समाविष्ट आहेत. या प्रकल्पांमुळे रस्ता सुरक्षा वाढेल, प्रवासाचा वेळ कमी होईल, गर्दी आणि प्रदूषण कमी होईल, प्रादेशिक संचारसंपर्क सुधारेल आणि पर्यटनाला प्रोत्साहन मिळेल तसेच प्रदेशात आर्थिक विकासाला चालना मिळेल अशी अपेक्षा आहे. पंतप्रधान अनेक नवीन राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांची पायाभरणी करतील. यामध्ये राष्ट्रीय महामार्ग-११६अ च्या २३१ किमी लांबीच्या चार पदरी खरगपूर-मोरेग्राम आर्थिक क?रिड?र विभागातील पाच पॅकेजेसचा समावेश आहे. हा प्रकल्प खरगपूर आणि सिलिगुडी दरम्यानच्या आर्थिक क?रिड?रचा एक भाग आहे आणि तो पश्चिम बंगालच्या पश्चिम मेदिनीपूर, बांकुरा, हुगळी, पूर्व वर्धमान, बीरभूम आणि मुर्शिदाबाद जिल्ह्यांमधून जाईल. खरगपूर-मोरेग्राम थेट जोडणीमुळे प्रवासाचे अंतर सुमारे १२० किमीने कमी होईल आणि प्रवासाचा वेळ जवळपास सात ते आठ तासांनी वाचेल. हा कारिडार राष्ट्रीय महामार्ग-१६, राष्ट्रीय महामार्ग-१९, राष्ट्रीय महामार्ग-१४ आणि राष्ट्रीय महामार्ग-१२ यासारख्या प्रमुख राष्ट्रीय महामार्गांशी देखील जोडला जाईल, ज्यामुळे बहु-क?रिड?र जोडणी मजबूत होईल. पंतप्रधान राष्ट्रीय महामार्ग-१४ वरील ५.६ किमी लांबीच्या चौपदरी दुबराजपूर बायपासच्या बांधकामाची पायाभरणी करतील, ज्यामुळे दुबराजपूर शहरातील दाट वस्तीच्या भागातील गर्दी कमी होण्यास मदत होईल तसेच प्रवासाचा वेळ जवळजवळ एका तासाने कमी होईल. राष्ट्रीय महामार्ग-१४ वर कांगशावती आणि शिलावती नद्यांवरील अतिरिक्त चौपदरी प्रमुख पुलांच्या बांधकामाची पायाभरणी देखील ते करतील. या दौ-यात



पंतप्रधान जहाजबांधणी आणि बंदरांशी संबंधित अनेक प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करतील. त्यांच्या हस्ते हलदिया ड?क क?म्प्लेक्समधील बर्थ नंबर २ च्या यांत्रिकीकरण प्रकल्पाचे उद्घाटनही होणार आहे. यामुळे वस्तूमालाची कार्यक्षम, वेगवान आणि पर्यावरणपूरक हाताळणी करणे शक्य होणार आहे. या प्रकल्पामुळे माल हाताळणी क्षमता वाढेल, संपूर्ण मालगाडीवर वस्तूमाल चढवण्याची प्रभावी यंत्रणा निर्माण होईल तसेच कार्यक्षमते विषयक प्रमुख निर्देशांकात सुधारणा घडून येईल. त्यासोबतच धोकादायक स्वरुपाच्या कामांमधील मानवी हस्तक्षेप कमी झाल्यामुळे सुरक्षितता वाढेल आणि रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील. या भेटीत खिडदरपूर डाक्स (डाक १ - पश्चिम) इथल्या पुनर्विकास प्रकल्पाचे उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

या दौ-यात पंतप्रधान पश्चिम बंगाल राज्यातील बंदरांच्या पायाभूत सुविधांशी संबंधित विविध प्रकल्पांची पायाभरणीही करणार आहेत. यात श्यामा प्रसाद मुखर्जी बंदरातील हलदिया डाक काम्प्लेक्समधील बर्थ नंबर ५ च्या यांत्रिकीकरणाच्या प्रकल्पाचा समावेश आहे. याशिवाय कोलकाता डाक सिस्टममधील बास्कुल पुलाचे नूतनीकरण, खिडदरपूर डाक-क्ष (पूर्व) आणि डाक-क्ष (पूर्व) इथल्या जलनिसारण व्यवस्थेसह यार्डचा विकास, हावडा ब्रिज पायलन ते निमतला घाट या कोलकाता रिव्हरफ्रंटशी संबंधित संरक्षण विषयक काम आणि कोलकाता डाक सिस्टममधील इंडेंचर मेमोरियल काम्प्लेक्स जवळ नदीतील क्रूज जहाजांचा तळ आणि नदी पर्यटन सुविधेसंबंधीच्या टर्मिनल इमारतीचे बांधकाम अशा विविध प्रकल्पांचा यात समावेश आहे.रेल्वे क्षेत्राअंतर्गत पंतप्रधान पुरुलिया-आनंद विहार टर्मिनल (दिल्ली) एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवून रवाना करतील. यामुळे पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रादरम्यानच्या रेल्वे जोडणीला अधिक बळकटी मिळणार आहे.अमृत स्थानक योजनेअंतर्गत पुनर्विकसित केलेल्या कामाख्यागुरी, अनारा, तामलुक, हलदिया, बारभूम आणि सिऊरी या सहा रेल्वे स्थानकांचेही पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. या दौ-यात पंतप्रधान दोन रेल्वे प्रकल्प राष्ट्राला समर्पित करणार आहेत. यात बेल्डा आणि दांतान दरम्यानच्या १६ किमी लांबीच्या तिसऱ्या रेल्वे मार्गाचा आणि कलाईकुंडा ते कनिमोहूली दरम्यानच्या ऑटोमॅटिक ब्ल?क सिग्नलिंग प्रणालीचा समावेश आहे. या प्रकल्पांमुळे रेल्वेची सुरक्षा आणि वेळापत्रकीय वक्तशीरपणात सुधारणा घडून येईल, वाहतूक कोंडी कमी होईल तसेच या भागातील प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर होउ शकेल. या सर्व उपक्रमांमधून पश्चिम बंगाल आणि भारताच्या पूर्वेकडील प्रदेशांमधील पायाभूत सुविधांना बळकटी देणे, तिथल्या संपर्क जोडणीचा विस्तार करणे आणि आर्थिक विकासाला गती देण्याच्या बाबतीतील केंद्र सरकारची सातत्यपूर्ण वचनबद्धता दिसून येते आहे.

# अमरावतीत २४ मार्चला भव्य रोजगार मेळावा

## टीसीएस मध्ये नोकरीची संधी

**अमरावती/प्रतिनिधीः-** नोकरीच्या शोधात असलेल्या सुशिक्षित तरुण-तरुणींना नामांकित खासगी कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २४ मार्च २०२६ रोजी 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याचे मुख्य आकर्षण म्हणजे 'टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस' (टीसीएस) ही नामांकित कंपनी या मेळाव्यात प्रत्यक्ष उपस्थित राहून उमेदवारांची निवड करणार आहे. स्थानिक तसेच इतर जिल्ह्यातील नामवंत कारखाने आणि उद्योगसमूहांच्या माध्यमातून युवकांना स्वावलंबी बनवण्याच्या उद्देशाने हा मेळावा आयोजित केला आहे. टीसीएस कंपनीला आवश्यक असणाऱ्या विविध पात्रतेच्या पदांसाठी कंपनीचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहून उमेदवारांच्या लेखी परीक्षा व मुलाखती घेतील. विशेष म्हणजे, मुलाखत देऊन पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना लगेचच नोकरीची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. अमरावती जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींना या मेळाव्यातून रोजगार मिळवून देण्याचा प्रशासनाचा मानस आहे.या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी दिलेल्या क्यूआर कोडस्कॅन करून आपली ऑनलाईन नोंदणी करणे अनिवार्य आहे. नोंदणीनंतर प्राप्त होणाऱ्या 'Registration Slip' ची प्रिंट सोबत ठेवावी. मेळाव्याच्या दिवशी, म्हणजेच २४ मार्च रोजी सकाळी, स्वामी विवेकानंद विद्यार्थी भवन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे स्वखर्चाने बायोडाटा, पासपोर्ट फोटो आणि आवश्यक मूळ कागदपत्रांसह प्रत्यक्ष उपस्थित राहावे. नोंदणीबाबत काही तांत्रिक अडचण असल्यास उमेदवारांनी कार्यालयाच्या ०७२१-२५६६०६६ किंवा ८९८३२८८९८२ या क्रमांकावर अथवा amravatirojgar@gmail.com या ईमेलवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली यो. बारस्कर यांनी केले आहे.

पान १ व १० वरून

## त्र्यंबक-नाशिकचा कुंभमेळा

नाशिक रस्त्याचे काम करण्यात यावे. कुंभमेळ्यात येणा-या भाविकांना संपर्कामध्ये कुठलीही अडचण होउ नये, म्हणून मोबाईल संपर्काची व्यवस्था भक्कम असावी. त्यासाठी आतापासूनच तयारी करण्यात यावी. द्वारका जंक्शन येथे वाहतूक सुरळीत करण्यासाठी सुरू असलेल्या कामांमध्ये अंतर्गत रस्त्यांचा विचार करून परिसरातील रस्त्यांचा एकीकृत विकास करावा. नवीन घाटांच्या जागेकरिता शेतक-यांना मोबदला देण्यात यावा, यासाठी विशिष्ट पद्धतीचा अवलंब करावा. त्र्यंबकेश्वर येथील कुशावर्त व नाशिक येथील गोदावरी नदीतील पाणी कुंभमेळा दरम्यान शुद्ध राहण्यासाठी यंत्रणांनी विशेष काळजी घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.नाशिक येथील काळाराम मंदिराचे काम करताना आजूबाजूच्या वाहतुकीला अडथळा होणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात यावी. राम काल पथाच्या कामाला गती देण्यात यावी. शहरातील ऑप्टिकल फायबर केबलचे काम वेगाने पूर्ण करावे. तसेच स्मार्ट सिटी प्रकल्पातील नादुरुस्त सीसीटीव्ही बाबत पडताळणी करून नवीन सीसीटीव्ही कार्यान्वित करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची मान्यता घ्यावी. अमृत स्नानांच्या दरम्यान शहरातील भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता महाविद्यालयांमधील जागा पार्किंग तसेच पोलिसांसाठी घेण्याबाबत संबंधित विभागाशी चर्चा करून निर्णय घ्यावा. निवृत्तीनाथ मंदिर ट्रस्टच्या कामांचा समावेश करून पुढील कार्यवाही करण्यात यावी. नाशिक शहर व परिसरातील जवळपास दोन ते चार हजार मुलांना कुंभमेळ्याच्या निमित्ताने आवश्यक कौशल्याचे प्रशिक्षण देउन त्यांना स्वयंसेवक म्हणून काम करण्यासाठी प्रेरित करावे. महिला बचत गटांच्या कुंभमेळातील समावेशनाबाबत पडताळणी करून तशा पद्धतीचे बिझनेस माडेल उभारावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. बैठकीत नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी सादरीकरण केले. बैठकीला मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (गृह) मनिषा म्हैसकर, अपर मुख्य सचिव (परिवहन) संजय सेठी, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी गुप्ता,विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, मनपा आयुक्त मनीषा खत्री आदी उपस्थित होत्या. तसेच नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त जलज शर्मा यांनी दूरदृश्य संवाद प्रणाली द्वारे बैठकीत सहभाग घेतला.

## गॅसची ऑनलाईन व घरपोच

नागरिकांची गैरसोय होत आहे.

**धुळयात नोंदणी करूनही गॅस नाही-** धुळ्यातील गॅस एजन्सीवर नागरिकांच्या रांगा लागल्या आहेत. पोलिस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना देण्यात येणा-या दक्षता गॅस एजन्सीवर पोलिस कर्मचारी आणि कुटुंबीयांची सिलिंडर घेण्यासाठी गर्दी दिसून आली. नोंदणी करून देखील घरपोच गॅस मिळत नसल्याने मोठ्या प्रमाणात गर्दी झाली आहे.

**जालन्यात नागरिकांची तोबा गर्दी-** सिलिंडर मिळणार नाही या भीतीपोटी ग्रामीण भागातील नागरिक एजन्सीच्या बाहेर मोठ्या प्रमाणात गर्दी करत आहेत. जालन्यातील बदनापूर येथील गॅस एजन्सीच्या बाहेर सकाळपासूनच एजन्सी उघडण्यापूर्वीच नागरिकांनी तोबा गर्दी केली होती. बुकिंग करूनही सिलिंडर मिळेल की नाही याची शाश्वती नसल्याने एजन्सीच्या कर्मचा-यांसोबत नागरिकांची बाचाबाची होउन गोंधळ देखील उडत आहे.

**जळगावात घरगुती गॅसची टंचाई-** जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यात घरगुती गॅस सिलिंडरची टंचाई निर्माण झाल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. गॅस बुकिंगसाठी पहाटेपासूनच नागरिकांची गॅस एजन्सींवर मोठी गर्दी होत असून अनेक ठिकाणी लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र आहे.

**गडचिरोलीत गॅससाठी नागरिकांची मोठी कसरत-** गडचिरोली जिल्हा दुर्गम भागात येत असून या ठिकाणी जवळपास ७० टक्के नागरिक एलपीजीवर अवलंबून आहेत. नागरिकांनी सतर्कतेनुसार अग्रिम एलपीजी सिलिंडर खरेदी करण्यासाठी मोठी गर्दी करण्यात येत आहे. गडचिरोली शहर असो की आष्टी, आलापल्ली, अहेरी, सिरोंचा भाग असो मोठ्या प्रतीक्षेनंतर नागरिकांना सिलिंडर मिळत आहेत.

**ठाण्यातील हाटेल व्यवसाय बंद-** ठाण्यातील वागळे इस्टेट परिसरामध्ये ठाणे महानगरपालिका टीएमटी आगारात असणारी कॅन्टीन गॅस कमतरतेमुळे बंद करण्यात आली आहे. ठाण्यातील हॉटेल व्यवसाय बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. गॅस शिल्लक नसल्यामुळे कमीच पदार्थ हाटेलमध्ये बनवले जात आहेत. हाटेल व्यावसायिकांवर उपासमारीची वेळ आली आहे.

## राज्यात गारपिटीसह वादळी

वादळी पावसाची शक्यता वर्तवल्याने शेतकरी चिंतेत आहेत. काही ठिकाणी रब्बीच्या पिकाची काढणी सुरू आहे. हवामान विभागाच्या इशा-यानंतर हे पीक सुरक्षित ठिकाणी ठेवण्याचे काम शेतक-यांकडून सुरू आहे.

**कर्जमाफीची प्रतीक्षा-** गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी अडचणीत आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीची घोषणा अर्थसंकल्पात केली आहे. सरकारने नेमलेल्या समितीचा अहवाल आल्यानंतर कर्जमाफी दिली जाणार आहे. त्यामुळे कर्जमाफीचे निकष काय असणार यावरून विरोधी पक्षाने सरकारवर टीका केली आहे.

## मोनालिसाच्या मृतदेहाचे 35

हत्या होउ शकते. तिचा मृतदेह फ्रीजमध्ये मिळेल. हा लव्ह जिहाद आहे. फरमानने हिंदू धर्म स्वीकारायला हवा होता आणि नंतर लग्न करायला हवे होते, असे सांगत साध्वी प्राची म्हणाल्या की, हिंदू कुटुंबातील लोकांनी आपल्या मुलांच्या गळ्यात डुकराचा दात बांधावा जेणेकरून दृष्ट त्यांच्याजवळ येणार नाही.

**हिंदू मुलींना फसवून लग्न केले जाते-** साध्वी प्राची म्हणाल्या की, मोनालिसा ही मीडियाने मोठी केलेली मुलगी आहे. तिला लव्ह जिहाद आणि मदरशांमध्ये दिल्या जाणा-या प्रशिक्षणाविषयी माहिती नाही. हिंदू मुलींना फसवून त्यांच्यासोबत लग्न केले जाते. त्यानंतर त्यांना धोका दिला जातो. त्यांचे नाते हे समाजासाठी मोठा धोका आहे. येणा-या काळात याचे गंभीर परिणाम होतील.

## 'भारत आमचा मित्र'

केलं आहे. भारत आमचा मित्र असल्याचं राजदूत मोहम्मद फथाली यांनी म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. इराणचे भारतातील राजदूत मोहम्मद फथाली यांनी संकेत दिले की, भारताला होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षित मार्ग मिळू शकतो. पत्रकारांशी बोलताना मोहम्मद फथाली म्हणाले की, या धोरणात्मक जलमार्गातून भारताला प्रवेश मिळावा यासाठी लवकरच पाउल उचललं जाईल. दरम्यान, होर्मुझच्या सामुद्रधुनीतून भारताला सुरक्षित मार्ग मिळेल का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता ते म्हणाले की, हो. कारण भारत आमचा मित्र आहे. तुम्हाला ते दोन ते तीन तासांत दिसेल.दरम्यान, इराणचे राजदूत मोहम्मद फथाली यांनी यावेळी भारताचं वर्णन इराणसाठी एक महत्त्वाचा भागीदार म्हणून केलं. तसेच या प्रदेशातील दोन्ही देशांमधील सामायिक हितसंबंधांकडे लक्ष वेधलं. राजदूतांनी नवी दिल्ली आणि तेहरानमधील व्यापक संबंधांबद्दलही भाष्य केलं आणि ते मैत्री आणि सहकार्याचे संबंध असल्याचं म्हटलं आहे.

**होर्मुझच्या सामुद्रधुनीवर कुणाचा ताबा?**

होर्मुझ सामुद्रधुनीच्या उत्तरेला इराण आणि दक्षिणेला ओमान व संयुक्त अरब अमिराती हे देश आहेत. ही सामुद्रधुनी उत्तरेकडील पर्शियन आखाताला दक्षिणेकडील ओमानच्या आखाताशी जोडते आणि त्यानंतर ती अरबी समुद्रात विलीन होते. या सामुद्रधुनीची लांबी सुमारे १६१ किलोमीटर आणि रुंदी सर्वात अरुंद भागात फक्त ३३ किलोमीटर आहे. कोणत्याही वेळेस या मार्गावरून डझनभर तेलवाहू जहाजे ये-जा करीत असतात. संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय समुद्र कायद्यानुसार, प्रत्येक देशाला त्याच्या किनारपट्टीपासून १२ न?टिकल मैल (सुमारे १३.८ मैल) पर्यंतचा भाग नियंत्रित करण्याचा अधिकार आहे. याचा अर्थ असा की, होर्मुझ सामुद्रधुनीचा सर्वात अरुंद भाग संपूर्णपणे इराण आणि ओमानच्या क्षेत्रामध्ये येतो. त्यामुळे या सामुद्रधुनीवरील नियंत्रण आणि प्रवेशाबाबत इराण आणि ओमान यांच्याकडे मोठे अधिकार आहेत. याच गोष्टीमुळे इराणकडून वेळोवेळी या मार्गावरील वाहतूक थांबवण्याची धमकी दिली जाते. या सामुद्रधुनीअंतर्गत इराण त्यांच्या अखत्यारित येणा-या भागात कारवाई करू शकतो.

**होर्मुझच्या सामुद्रधुनीचे महत्त्व काय?**

होर्मुझ सामुद्रधुनीतून दररोज सुमारे २० ते २१ दशलक्ष बॅरल कच्चे तेल आणि उत्पादनांची वाहतूक केली जाते. अमेरिकेच्या उर्जा माहिती प्रशासनाच्या माहितीनुसार, २०२२ मध्ये या मार्गावरून दररोज सरासरी २१ दशलक्ष बॅरल तेल वाहून नेले गेले, जे जगातील एकूण कच्च्या तेलाच्या व्यापाराच्या सुमारे २१ टक्के आहे. ग्घ्क्ख् (ऑर्गनायझेशन ऑफ द पेट्रोलियम एक्स्पोर्टिंग कंट्रीज) सदस्य असलेल्या सौदी अरेबिया, इराण, संयुक्त अरब अमिराती, कुवैत आणि इराक हे देश बहुतांश याच सामुद्रधुनीतून आशियाकडे कच्च्या तेलाची निर्यात करतात. याशिवाय, जगभरात पुरवला जाणारा एकतृतीयांश द्रवित नैसर्गिक वायूचीदेखील याच जलमार्गातून निर्यात होते. म्हणूनच होर्मुझ सामुद्रधुनीला जगाचे तेलवाहतुकीचे हृदय असे म्हटले जाते.

## देशात अमरावतीचे सर्वाधिक

पासून वाढतच आहे. अमरावती व्यतिरिक्त अकोला ४२ अंश, यवतमाळ येथील तापमान ४० अंश सेल्सियस नोंदविण्यात आले आहे. पुढील दोन दिवस उष्णतेची लाट कायम राहण्याचा अंदाज आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच सूर्याच्या तीव्र किरणामुळे दिवसाचा पारा झपाट्याने वाढला आहे. यामुळे जनजीवन विस्कळित झाले आहे. काही ठिकाणी अवकाळी पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. गारपीट किंवा मुसळधार पाऊसही होऊ शकतो. उष्ण लाटेमुळे डीहायड्रेशन , हिट स्ट्रोक व इतर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. नागरिकांना अशात दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे टाळावे, पुरेसे पाणी प्यावे, हलके कपडे घालावेत आणि उष्णतेपासून स्वतःचे संरक्षण करण्याचे सांगितले आहे.

## उमरसरात जुन्या वादातून

सध्या मृतदेह श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ येथे ठेवण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार हा प्रकार जुन्या वादातून घडल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. वृत्त लिहीपर्यंत या प्रकरणी गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू होती. हल्लेखोरांची नावे अद्याप समोर आलेली नसून पोलिसांनी आरोपींच्या शोधासाठी पथके रवाना केली आहेत.दरम्यान, शहरात पुन्हा एकदा टोळीयुद्धाच्या पार्श्वभूमीवर घडलेल्या या घटनेमुळे कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून पोलिसांनी तात्काळ आरोपींना अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## अमरावतीत करण कोठारी

दैनंदिन वापरासाठी हलक्या वजनाचे दागिने आणि लग्नसराईसाठी खास एक्सक्लुझिव्ह ब्राइडल कलेक्शन उपलब्ध आहे. पारंपारिक कारागिरी आणि आधुनिक डिझाइन्सचा सुरेख संगम येथे पाहायला मिळेल.

या भव्य शोरूमचे उद्घाटन बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री डेझी शाह यांच्या हस्ते पार पडणार आहे. त्यांच्या उपस्थितीमुळे हा सोहळा अमरावतीकरांसाठी विशेष ठरणार आहे. उद्घाटनाच्या निमित्ताने ग्राहकांसाठी खास ऑफर ठेवण्यात आली असून ग्राहकांना सोन्याचे नाणे जिंकण्याची संधी मिळणार आहे.

हा कार्यक्रम १५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजून ३० मिनिटांनी जयस्तंभ चौक, एचडीएफसी बँकेजवळ, सहकार भवन समोर, अमरावती येथे होणार आहे. पिढ्यानपिढ्यांचा विश्वास हे ब्रीदवाक्य जपत करण कोठारी ज्वेलर्स आता अमरावतीकरांच्या सेवेत सज्ज झाले आहेत.

## गॅस दरवाढ व

यावेळी करण्यात आली. सामान्य माणसाला दोन वेळच्या अन्नासाठी आणि गॅससाठी वणवण फिरावे लागत आहे.उज्ज्वला योजनेचे फुगे हवेत विरले असून, रिकामे सिलिंडर आता केवळ शोभेच्या वस्तू बनले आहेत. केंद्रातील भाजप सरकार केवळ मूठभर उद्योगपतींचे हित जोपासत असून सामान्य माणसाच्या जगण्याशी त्यांना काहीही देणेघेणे उरलेले नाही असे मनात आंदोलन कार्यांनी सरकारच्या हुकूमशाही प्रवृत्तीचा जाहीर निषेध केला. जिल्हाध्यक्ष राहुल येवले व कार्याध्यक्ष अनिकेत ढेंगळे यांच्या नेतृत्वात झालेल्या आंदोलनात रितेश पांडव, परिक्षीत जगताप,उत्कर्ष देशमुख ,सागर कलाने, शहर अध्यक्ष निलेश गुहे, विधानसभा अध्यक्ष वैभव देशमुख, विधानसभा अध्यक्ष आशीष यादव,नितिन काले ,सागर इंगोले, भूषण मामर्डे, गोलू विधळे ,शुभम बंबल ,आकाश धूरत्कार,प्रियल मोहोड मयूर देशमुख ,गोविंद ठाकरे,राजू मेश्राम सह कार्यकर्त्यांचा सहभाग होता.

## छ्राहकांनी गॅस सिलिंडरसाठी

सिलिंडरचे वितरण करण्यात यावे. देशात जीवनावश्यक वस्तू कायदा लागू करण्यात आला आहे. त्यामुळे वितरकांनी याबाबत काळजी घ्यावी. सध्यास्थितीमध्ये आश्रमशाळा, रूग्णालय, वसतिगृहे यांना सुरळीत गॅस पुरवठा करण्याच्या सूचना आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. गॅस एजंसीधारकांसमोर ही परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे येणाऱ्या ग्राहकांना सौजन्यपूर्वक वागणूक द्यावी. जिल्हा प्रशासन निर्माण झालेली परिस्थिती हाताळण्यास सक्षम आहे. एजंसीच्या ठिकाणी आवश्यकता भासल्यास पोलिस संरक्षणाची मागणी करावी. तसेच शहराच्या लगत ग्रामीण भागात मागणीनुसार पुरवठा सुरळीत ठेवण्यात यावा. घरगुती सिलिंडरचा वापर व्यावसायिक कारणासाठी होत असल्यास त्यावर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी सांगितले.

## ४३ वर्षीय पुरुषाची

लक्षात आले. निलेश घरी आले असता समोरील दरवाजा बंद होता. मागून येत असलेल्या दुर्गंधीमुळे त्यांनी ११२ वर फोन करून पोलिसांना माहिती दिली. घटनेस्थळी पोलीस आणि नातेवाईकांनी दरवाजा उघडला असता सतीश काजे सिलिंग हुकला नायलॉनच्या दोरीने गळफास घेतल्याचे दिसून आले. पोलिसांनी पंचांच्या समक्ष मृतदेह खाली उतरवून इर्विन रुग्णालयात नेला, जिथे डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. निलेश काजे यांनी पोलिसांना दिलेल्या माहितीप्रमाणे, मृत्यूबाबत कोणावरही संशय नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून, पुढील तपास सुरू आहे.

## गर्भाशयाच्या मुखाच्या

आणि अफवांचे खंडन केले. त्यांनी स्पष्ट केले की, कोणतीही लस सर्वसामान्यांना देण्यापूर्वी तिच्या अनेक स्तरांवर कठोर वैद्यकीय चाचण्या घेतल्या जातात आणि ही लस सर्व निकषांवर यशस्वी ठरली आहे. त्यामुळे पालकांनी कोणत्याही निराधार अपप्रचाराला बळी न पडता आपल्या मुलींच्या सुरक्षित भविष्यासाठी या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

आरोग्य विभागातर्फे जिल्ह्यातील १४ ते १८ वर्षे वयोगटातील मुलींच्या पालकांसाठी ही एक सुवर्णसंधी असल्याचे सांगण्यात आले असून, ही लस गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगासारख्या जीवघेण्या आजारापासून कायमचे संरक्षण मिळवून देते. या कार्यक्रमाला तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण खराटे, प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. चैतन्य गजभिये, डॉ. निखिल उप्पलबार, डॉ. गीतांजली लखदिवे यांच्यासह जिल्हा व तालुकास्तरीय आरोग्य पथकातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जास्तीत जास्त मुलींनी या लसीकरणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## वृद्ध महिलेवर अत्याचार

यादव, विशाल यादव, निरंजन चव्हाण, सुनील राठोड, गोलू ठाकरे, केतन डेंडूले, प्रथमेश डहाके, योगेश पवार, गजानन गवळी, निखिल धोटे, प्रवीण राठोड, नामदेव जाधव, महेंद्र चव्हाण, राजेश चव्हाण, नरेश चव्हाण, अमोल चव्हाण, सदानंद राठोड, सुरज यादव आदि उपस्थित होते.

## एनएसयुआय व इतर

प्रतिष्ठित आमसभेदरम्यान घडलेली ही घटना अत्यंत गंभीर असून त्यामुळे विद्यापीठाच्या शिस्त व परंपरेला धक्का बसला आहे. या प्रकारामुळे विद्यार्थ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून विद्यापीठातील सुरक्षा व्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.NSUI तर्फे संबंधित ABVP कार्यकर्त्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करणे, विद्यापीठ परिसरात ABVP वर बंदी घालणे, सुरक्षा विभागातील Assistant Registrar यांच्यावर चौकशी करून कारवाई करणे तसेच सध्याचा सुरक्षा ठेका रद्द करून नवीन ठेका देण्याची मागणी करण्यात आली आहे.वरील मागण्या तात्काळ मान्य न झाल्यास निर्माण होणाऱ्या परिस्थितीस विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही NSUI च्या वतीने देण्यात आला आहे. यावेळेस युवक कॉंग्रेस शहर अध्यक्ष वैभव देशमुख, आशिष यादव, शहर अध्यक्ष NSUI संकेत साहू, आकाश गेडाम, कुणाल ज्योत, शुभम बांबल, मोहित भेंडे, प्रियल मोहोड, ओम कुबडे, जिगर शिंदे, लकी धनाडे, युवासेना प्रमुख अमरावती योगेन सोळंके, हर्ष धोटे, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस संकेत बोके, अथर्व चुनाडे, अभी लोयते, संचित खोंडे, प्रथमेश नवरखळे, प्रहार समर्थ डवरे, आधी ,विद्यार्थी प्रतिनिधी, पदाधिकारी उपस्थित होते.

## शहराचा पाणीपुरवठा सुरळीत

दिवस बंद राहणार असल्याची पोस्ट व्हाट्सअप वर फिरत होती. ही पोस्ट कुठलीही शहानिशा न करता वेगवेगळ्या ग्रुपमध्ये व्हायरल करण्यात येत आहे. सदर पोस्ट पूर्णपणे खोटी असून अफवा व अप्रचार प्रसार होणारी आहे. अमरावती पाणीपुरवठा योजनेद्वारे शहरात पाणीपुरवठा सुरळीत सुरू असून तो नेहमी प्रमाणे एक दिवस आड नियमितपणे सुरू राहणार आहे. नागरिकांनी अशा कोणत्याही खोट्या संदेशावर विश्वास ठेवू नये तसेच नागरिकांनी कोणतीही माहिती मिळते ती अधिकृत स्त्रोतांकडूनच पडताळून पाहावी आणि अफवा पसरवू नये असे आवाहन उपविभागीय अभियंता मजीप्रा यांनी केले आहे. नुकतीच शहर पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी देखील रमजान ईद आणि सणासुदीच्या काळात वीज पुरवठा खंडित होणार नाही आणि पाणी पुरवठा खंडित होणार नाही याची काळजी घेण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. सोशल मीडियावर प्रचारित होणाऱ्या खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन मजीप्राने केले आहे.

## जिल्हा न्यायालय परिसरातील

निर्देश दिले. तसेच नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छता राखणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.या पाहणीवेळी नगरसेवक ॲड. प्रशांत देशपांडे, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, राजु कुरील, स्वच्छता विभागाचे कर्मचारी तसेच स्थानिक प्रतिनिधी उपस्थित होते.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, १४ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## माहिती अधिकारातून अनियमितता उघड

# मालेगाव वनपरिक्षेत्र कार्यालयाच्या इमारतीवर संशयाचे सावट; चौकशीची मागणी

■ स्थानांतरणाचा शासन निर्णयच नाही
■ प्रशासकीय-तांत्रिक मंजुरीचा ठावठिकाणा नाही
■ निधी कुठून आला याचाही पत्ता नाही

**प्रशांत ठाकरे**

कारंजा : माहिती अधिकारातून मिळालेल्या धक्कादायक माहितीनंतर मालेगाव वनपरिक्षेत्र कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित कार्यालयाचे मालेगाव येथून मौजे ईराळा येथे झालेले स्थानांतरण कोणत्याही शासन निर्णयाविना करण्यात आल्याची बाब समोर आली असून, उभारण्यात आलेल्या भव्य प्रशासकीय इमारतीसाठी आवश्यक असलेली प्रशासकीय व तांत्रिक मान्यता तसेच निधीच्या स्त्रोताबाबतही कोणतीही अधिकृत कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणात मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त होत असून सखोल चौकशीची मागणी आता जोर धरू लागली आहे.

मालेगाव वनपरिक्षेत्र कार्यालय सुरुवातीला मालेगाव येथे कार्यरत होते. मात्र कार्यालयासाठी शासकीय जागा उपलब्ध नसल्याचे कारण देत हे कार्यालय मालेगावपासून जवळ असलेल्या मौजे ईराळा येथे हलविण्यात आले. या स्थानांतरणामागे शासनाचा कोणताही अधिकृत निर्णय किंवा आदेश आहे का, याबाबत माहिती अधिकाराच्या माध्यमातून चौकशी करण्यात आली. मात्र वनपरिक्षेत्र अधिकारी, मालेगाव तसेच उपवनसंरक्षक कार्यालय, वाशिम या दोन्ही कार्यालयांकडून अशा प्रकारचा कोणताही शासन निर्णय उपलब्ध नसल्याचे लेखी स्वरूपात स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे कार्यालयाचे हे स्थानांतरण वैध की अवैध, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

दरम्यान, मौजे ईराळा येथे 'वनपरिक्षेत्र अधिकारी, मालेगाव' या नावाने भव्य प्रशासकीय इमारत उभारण्यात आली आहे. मात्र या इमारतीच्या बांधकामासाठी आवश्यक असलेली प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मंजुरी तसेच निधीची तरतूद यासंदर्भातील कागदपत्रांची मागणी करण्यात आली असता संबंधित कार्यालयांकडे त्याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचे लेखी उत्तर देण्यात आले आहे. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे बांधकाम प्रक्रिया पारदर्शक होती का, यावरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. याहून धक्कादायक बाब म्हणजे ही प्रशासकीय इमारत शासनाच्या ई-क्लास जमिनीवर उभारण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. अशा प्रकारच्या जमिनीवर कोणतेही शासकीय बांधकाम करण्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी किंवा सचिवस्तरावरील आदेश आवश्यक असतो. मात्र माहिती अधिकारातून मिळालेल्या उत्तरांनुसार या संदर्भातील कोणताही शासन निर्णय अथवा आदेश उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे नियम धाब्यावर बसवून हे बांधकाम करण्यात आले का, असा संशय व्यक्त केला जात आहे.

या इमारतीच्या उभारणीसाठी नेमका निधी कुठून उपलब्ध झाला, हाही प्रश्न अनुत्तरितच आहे. कारण बांधकामासाठी खर्च झालेल्या निधीबाबत माहिती मागविण्यात आली असता त्यासंबंधीही कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचे संबंधित कार्यालयांकडून लेखी स्वरूपात सांगण्यात आले आहे. निधीचा स्त्रोतच अस्पष्ट असल्याने या संपूर्ण प्रक्रियेबाबत संशयाचे सावट अधिक गडद झाले आहे. माहिती अधिकारातून मिळालेल्या उत्तरांमुळे वनविभागाच्या कारभाराबाबत स्थानिक स्तरावर तीव्र चर्चा सुरू झाली आहे. आवश्यक प्रशासकीय मंजुरी, आर्थिक तरतूद, शासन आदेश आणि अधिकृत प्रक्रिया यांचा कोणताही ठावठिकाणा न लागणे हे गंभीर अनियमिततेचे द्योतक असल्याचे नागरिकांचे मत आहे. वनविभागाच्या प्रशासकीय वर्तुळातही या प्रकरणाबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे. तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांच्या कथित वरदहस्तामुळेच सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या उपवनसंरक्षक अधिकाऱ्यांच्या तोंडी आदेशावरून ही इमारत उभारण्यात आली असावी, अशी कुजबूज सुरू आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करणे आवश्यक असल्याची मागणी स्थानिक पातळीवरून होत आहे.

दरम्यान, संपूर्ण प्रकरणात शासनाने तातडीने हस्तक्षेप करून वस्तुस्थिती समोर आणावी, तसेच अनियमितता आढळल्यास संबंधित जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. माहिती अधिकारातून उघड झालेल्या या प्रकरणामुळे वनविभागाच्या कार्यपद्धतीवरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून पुढे शासन कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# हॉटेल-मंदिर चोरीचा २४ तासांत छडा



## मालेगाव पोलिसांची कारवाई

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शहरात घडलेल्या हॉटेल चोरी व मंदिरातील दानपेटी फोडून चोरीच्या दोन घटनांचा मालेगाव पोलिसांनी अवघ्या २४ तासांत छडा लावत दोन आरोपींना अटक केली. आरोपींकडून चोरीस गेलेला ८ हजार ६७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

मालेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. २१९/२०२६ अन्वये हॉटेल चोरीचा तर गुन्हा क्र. २२०/२०२६ अन्वये मंदिरातील दानपेटी चोरीचा गुन्हा नोंद करण्यात आला होता. ९ ते १० मार्चदरम्यान रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी मालनेश्वर हॉटेलमध्ये शिरून चांदीची दोन नाणी, सिगारेट पाकिटे, चिल्लर व जुन्या चलनी नोटा चोरून नेल्या. त्याचवेळी संत श्री गुणवंत बाबा मंदिरातील दानपेटी फोडून त्यातील रोकड लंपास करण्यात आली होती.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत संशयावरून मंगेश शेषराव बदर (२५, रा. गांधीनगर) व राहुल दौलत गायकवाड (३१, रा. चांडस ता. मालेगाव) यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी दोन्ही चोरीच्या घटनांची कबुली दिली. त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेला एकूण ८,६७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस निरीक्षक राजेश खेरडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक रवी सैबेवार व पथकाने केली. पोलिसांनी केलेल्या तातडीच्या कारवाईबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# एमपीडीएचा दणका : अकोल्यातील दोन कुख्यात गुंड वर्षभरासाठी कारागृहात स्थानबद्ध





## गुडीपाडवा-ईद-रामनवमीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील गुन्हेगारीला लगाम घालण्यासाठी अकोला पोलिसांनी कठोर पाऊल उचलत दोन कुख्यात गुंडांवर एमपीडीए (MPDA) कायद्यान्वये कारवाई केली आहे. खदान व जुने शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील या दोघांना एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले असून अकोला जिल्ह्यातील २०२६ मधील सहावा व सातवा धोकादायक गुन्हेगार म्हणून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

अकोला शहरातील झिराबावडी, सिंधी कॅम्प परिसरातील रहिवासी करीम खान उर्फ बबलू अन्वर खान (वय २९) हा कुख्यात गुंड म्हणून पोलिसांच्या रडारवर होता. त्याच्यावर इच्छापूर्वक दुखापत करणे, घातक शस्त्रांनी हल्ला करणे, घरात घुसून मारहाण करणे, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, अंमली पदार्थ (गांजा) विक्री, अश्लील कृत्य, धमकी देणे अशा गंभीर गुन्ह्यांची मालिका दाखल आहे.

तसेच जुने शहरातील गाडगे नगर परिसरातील शेख कासम उर्फ गुड्या शेख कबीर (वय २९) याच्यावरही घरफोडी, स्त्रीचा विनयभंग करण्याचा प्रयत्न, लैंगिक छळ, घातक शस्त्रांनी मारहाण, चोरी, धमकी, शांतताभंग, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे तसेच हद्दपारी आदेशाचे उल्लंघन अशा गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे.

दोन्ही आरोपींवर यापूर्वी विविध कलमान्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. मात्र त्याचा कोणताही परिणाम न झाल्याने ते सतत गुन्हेगारी कृत्ये करत राहिले.

त्यामुळे त्यांच्या वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दोघांना एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्ध करण्याचा प्रस्ताव जिल्हादंडाधिकारी वर्षा मीना यांच्याकडे सादर केला होता.

जिल्हादंडाधिकाऱ्यांनी सर्व कायदेशीर बाबींची तपासणी करून तसेच स्वतंत्र माहिती मिळवून दोन्ही आरोपी धोकादायक गुन्हेगार असल्याची खात्री झाल्यानंतर १३ मार्च २०२६ रोजी त्यांना एक वर्षासाठी अकोला जिल्हा कारागृहात स्थानबद्ध करण्याचा आदेश जारी केला. आदेश मिळताच पोलिसांनी तत्काळ कारवाई करत दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन जिल्हा कारागृहात दाखल केले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके तसेच खदान व जुने शहर पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे पार पाडली. दरम्यान, गुडीपाडवा, रमजान ईद आणि श्रीराम नवमी या सणांच्या पार्श्वभूमीवर अकोला जिल्ह्यात कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांनी कडक भूमिका घेतली आहे. सराईत गुन्हेगारांवर एमपीडीए व इतर कायद्यांन्वये कठोर कारवाई सुरूच राहील, असा इशारा जिल्हा पोलीस अधीक्षकांनी दिला आहे.

विशेष म्हणजे जानेवारी २०२६ पासून आतापर्यंत अकोला जिल्ह्यातील सात धोकादायक गुन्हेगारांना एमपीडीए कायद्यांतर्गत स्थानबद्ध करण्यात आले आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

## वकिली व समाजकारण यांचा समन्वय साधत विकासाचे कार्य करू -ॲड. गोखले

**अकोला :** वकिली व्यवसाय हा केवळ न्यायालयापुरता मर्यादित नसून समाजाशी घट्ट जोडलेला आहे. समाजातील प्रश्न, नागरिकांच्या अडचणी आणि सार्वजनिक व्यवस्थेतील त्रुटी यांची जाणीव वकिलांना असते. त्यामुळे वकील जेव्हा समाजकार णात प्रवेश करतात तेव्हा ते अधिक जबाबदारीने काम करतात. नगरसेवक म्हणून काम करताना वकिली व्यवसायाला सन्मान मिळेल, अशा प्रकारे काम करण्या चा प्रयत्न आम्ही सर्व नगरसेवक असलेले वकील मंडळी करू, अशी ग्वाही ॲड. गिरीश गोखले यांनी दिली. अकोला मनपा स्वीकृत सदस्यपदी निवड झालेले ॲड. गिरीश गोखले, ॲड. देवाशिष काकड आणि ॲड. गोटफोडे यांचा अकोला बार असो.तर्फे सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ॲड. गिरीश गोखले बोलत होते. कार्यक्रमाला अकोला बार असो चे अध्यक्ष अँड अजय वाघमारे, अँड विजय भारंबे यांच्यासह बार असो.चे पदाधिकारी, ज्येष्ठ वकील आणि अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते नगरसेवक म्हणून निवड झालेल्या तिन्ही वकिलांचा पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

## महिला दिनानिमित्त विद्यार्थिनी व महिलांसाठी आरोग्य व सक्षमीकरण मार्गदर्शन कार्यक्रम

**वाशिम :** महिला समुपदेशन केंद्र, शहर पोलीस स्टेशन वाशिम आणि सौ. सुशिलाबाई जाधव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात महिलांच्या हक्क, आरोग्य, सुरक्षा आणि सक्षमीकरणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

जागतिक महिला दिन हा महिलांच्या हक्कांचा, त्यांच्या कर्तृत्वाचा आणि समाजातील महत्त्वपूर्ण योगदानाचा सन्मान करणारा दिवस आहे. बदलत्या काळात महिला-पुरुष समानतेकडे समाजाची वाटचाल सुरू असून शिक्षण, विज्ञान, क्रीडा, प्रशासन ते अवकाशापर्यंत प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे.

# सर्वांगीण विकासासाठी शिक्षण आवश्यक -प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■



शिक्षणामुळे मनुष्याच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते. शिक्षणाचा मुख्य उद्देश सर्वगुणसंपन्न मानव निर्माण करणे हा आहे, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरुळपीर येथील प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे यांनी केले. ते श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालय, वनोजा ता. मंगरुळपीर येथे आयोजित पदवी वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती कमलाबाई राऊत होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. जयाप्रभा भगत, कला विभाग प्रमुख डॉ. ममता पाथ्रीकर तसेच कार्यक्रमाचे आयोजक डॉ. सचिन कडू उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन व विद्यापीठ गीताने करण्यात आली. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून देत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील उपलब्ध सोयी-सुविधांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन केले. यावेळी कला विभागातील पदवी वितरणाचे कार्य प्रा. डॉ. ममता पाथ्रीकर यांनी तर वाणिज्य विभागातील पदवी वितरणाचे कार्य डॉ. जयाप्रभा भगत यांनी केले. या कार्यक्रमात एकूण ८१ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राधिका सावके यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. सचिन कडू यांनी मानले. याप्रसंगी डॉ. गजानन घोंगटे, प्रा. दिपक भगत, डॉ. सुनील बोरचाटे, डॉ. जय कावरे, प्रा. रवि कुटे, प्रा. अन्वर गारवे, प्रा. स्वाती राठोड, गजानन बायस्कार, सचिन राणे, गणेश आडे, श्रीधर भिंगारे यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.


**(न्याय शाखा)**

बायपास रोड, कॅम्प, अमरावती. ४४४ ६०२
ई-मेल- addicommissioneramt@gmail.com

प्र.क्र.अ.आ./प्रस्तुत- ४ / अ. वा / न्याय शाखा / २०२६ दिनांक : १८/०२/२०२६

**जाहीर नोटीस**

प्रकरण क्र.६२४/आरटीएस-५९/ शेलगाव / वाशिम / २०२५

**अर्जदार -** १) सुधाकर तुकाराम घुगे, २) संजय तुकाराम घुगे, रा. दोन्ही, पार्डी आसरा, ता.जि.वाशिम

**- विरुद्ध -**

**उत्तरार्थी -** द्वारकाबाई जगन्नाथ भिसे, रा. बाबुल हॉटेलच्या मागे, गोरक्षण विहिर, वाशिम ता.जि.वाशिम

सदर नोटीसद्वारे प्रस्तुत प्रकरणातील गैरअर्जदार क्र. १ यांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी मौजे शेलगाव ता.जि.वाशिम येथील सर्वे न. ९/३ गट नं.५५ मधील क्षेत्र ९ एकर २० गुंठे जमीनीबाबत अपर जिल्हाधिकारी, वाशिम यांचे समोरील प्रकरण क्र.२३/आरटीएस-५९/२०१०-११/शेलगाव मधिल दिनांक २३/१०/२०१८ रोजीचे आदेश या न्यायालया समक्ष आव्हानीत केलेले आहेत.

सदरचे प्रकरण मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपुर यांचेकडील रिट याचिका क्र. १९४६/२०१९ मधील दिनांक ६/११/२०२५ रोजी निर्णयीत करणेत आले असून प्रकरण या न्यायालयामध्ये सुनावणीकामी परत पाठविणेत आलेले आहे. प्रकरणाशी संबंधीत गैरअर्जदार क्र. १ द्वारकाबाई जगन्नाथ भिसे रा. बाबुल हॉटेलच्या मागे, गोरक्षण विहिर, वाशिम ता.जि.वाशिम यांना सुनावणी बाबत नोटीस पाठविण्यात आलेल्या आहेत. तरी देखील नमुद गैरअर्जदार क्र. हे प्रकरणात गैरहजर आहेत. गैरअर्जदार क्र. १ यांना नोटीस पाठविण्यात आलेली असून सदरच्या नोटीस त्या ठिकाणी वास्तव्यास नाहीत त्या कारणास्तव परत आलेल्या आहेत. त्याकरिता आपणास नमुद पुनरिक्षण अर्जामध्ये सुनावणी कामी पुढील सुनावणी दिनांक २३/३/२०२६ रोजी हजर राहणेकरिता जाहीर नोटीस काढण्यात येत आहे. प्रकरणात सुनवणी करीता आपण स्वतः किंवा आपले अधिवक्ता मार्फत आवश्यक कागदपत्रे, युक्तीवादासह न चुकता उपस्थित रहावे. आपण प्रकरणात गैरहजर राहिल्यास उपलब्ध कागदपत्रांचे आधारे निर्णय घेण्यात येईल याची कृपया याबाबत नोंद घ्यावी. अर्जदार यांनी नमुद जाहीर नोटीस गैरअर्जदार क्र. १ यांना माहिती होईल अशा वृत्तपत्रांमध्ये अर्जदार यांनी द्यावी व त्याची प्रत प्रकरणात दाखल करावी.

शिक्का

**प्रस्तुतिकार-४**
**अपर आयुक्त,**
अमरावती विभाग अमरावती यांचे


# अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरू

## लेखी आश्वासनानंतर मुंडगाव येथील आमरण उपोषणाची सांगता

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील संत नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगाव येथे रस्त्यावरील अतिक्रमणे हटविणे व वणी-वारुळा ते वरवट या मार्गाचे काम अंदाजपत्रकानुसार तातडीने पूर्ण करण्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आमरण उपोषणाने अखेर प्रशासनाला जाग आली. सार्वजनिक बांधकाम विभागाने लेखी आश्वासन देत अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरू केल्यानंतर उपोषणाची सांगता करण्यात आली.

गेल्या काही दिवसांपासून मुंडगाव येथील श्रीकृष्ण वाघ, प्रभाकर भालेराव, संतोष सदार व योगेश गावंडे हे चौघे गावकऱ्यांच्या मागण्यांसाठी आमरण उपोषणावर ठाम बसले होते. रस्त्याच्या कामातील विलंब आणि वाढत्या अतिक्रमणांमुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी आंदोलनाला जोरदार पाठिंबा दिला होता. या आंदोलनाची वृत्तपत्रांमधून दखल घेतल्यानंतर प्रशासन हलले.

सार्वजनिक बांधकाम विभाग, तेल्हारा येथील उपविभागीय अभियंता धनंजय बर्डे यांनी उपोषणस्थळी भेट देत मागण्यांबाबत लेखी आश्वासन दिले. त्यानंतर रस्त्यालगत असलेली अतिक्रमणे हटविण्याची कारवाई सुरू करण्यात आली. प्रशासनाने रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी प्रत्येकी १२ मीटरपर्यंतचे अतिक्रमण काढण्यास सुरुवात केल्याची माहिती देण्यात आली.



याशिवाय ७ मीटर रुंदीपर्यंत डांबरीकरण, अडीच मीटरपर्यंत पेवर ब्लॉक बसविणे तसेच सुमारे ११ फुटांवर नाली बांधकाम करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. प्रवासी निवारे मूळ ठिकाणी कायम ठेवण्यात येतील, असेही प्रशासनाने सांगितले.

यानंतर अकोट ग्रामीण पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे, नायब तहसीलदार मनोज मानकर व ग्राम महसूल अधिकारी आशेर परमार्थ यांच्या उपस्थितीत उपविभागीय अभियंता धनंजय बर्डे यांनी उपोषणकर्त्यांना शरबत पाजून उपोषणाची सांगता केली.

यावेळी कार्यकारी अभियंता काकड, ज्ञानेश्वर दहिभाते, ॲड. देवानंद फुसे, उपसरपंच अनिल गाढे, ग्रामपंचायत सदस्य अरविंद फुसे, जुगलकिशोर चिंचोलकर, तुषार पाचकोरे, पोहोरकर, शेख अझीज, गवई, एकता ऑटो रिक्षा युनियनचे पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता. दरम्यान, प्रशासनाने दिलेल्या आश्वासनाची तातडीने अंमलबजावणी न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय


■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १०६ ■ शनिवार, १४ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## ९३ रुपयांसाठी बँकेचा कहर : ग्राहकाला थेट लोक अदालतची नोटीस

### लाखो थकबाकीदारांना अभय : सामान्य ग्राहकाला लोकअदालतची नोटीस

**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** मोठ्यांना माफी, छोट्यांवर कारवाई अशी संतापजनक परिस्थिती समोर आणणारी घटना सिंदी (रेल्वे) येथे उघड झाली आहे. अवघ्या ९३ रुपये ६३ पैशांच्या कथित थकबाकीसाठी बँकेने थेट लोकअदालतची नोटीस पाठविल्याने सामान्य नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. कोरोना काळात सरकार व बँकांनी मदतीच्या नावाखाली दिलेल्या कर्जयोजनांचा शेवट अशा प्रकारे होणार का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

येथील मोहन सुरकार हे इंडियन बँकेचे ग्राहक असून कोरोना महामारीच्या काळात प्रत्येक ग्राहकाला देण्यात आलेल्या सुमारे ९ हजार रुपयांच्या बिनव्याजी सीसी लिमिटचा त्यांनी लाभ घेतला होता. सुरकार यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी संपूर्ण रक्कम वेळेत परत केली. मात्र खात्यावर ९३ रुपये ६३ पैसे इतकी रक्कम थकीत दाखवण्यात आली. विशेष म्हणजे इतक्या किरकोळ रकमेसाठी बँकेकडून आजपर्यंत कोणतीही सूचना, फोन, संदेश किंवा नोटीस देण्यात आली नव्हती.



अचानक पोस्टाने आलेल्या लोकअदालतच्या नोटीसमुळे सुरकार यांना मोठा धक्का बसला. नोटीसमध्ये त्यांना सेलू येथील न्यायालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. एवढ्या नगण्य रकमेकरिता न्यायालयीन प्रक्रियेचा बडगा उगारल्याने बँकेच्या संवेदनशून्य कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की, लाखो-कोट्यवधी रुपयांचे कर्ज थकविणारे मोठे उद्योगपती किंवा प्रभावशाली कर्जदार यांच्यावर मात्र बँका इतक्या वेगाने कारवाई करताना दिसत नाहीत. उलट सामान्य माणसावर कठोर भूमिका घेतली जाते. मोठ्यांना सवलत, छोट्यांना शिक्षा हीच बँकिंग व्यवस्थेची खरी भूमिका का असा प्रश्न परिसरातून केला जात आहे.

कोरोना काळात अनेक कुटुंबांची आर्थिक घडी विस्कटली होती. त्यावेळी मदतीच्या नावाखाली दिलेल्या योजनांचे नंतर असे वसुलीचे रूप पाहून लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ९३ रुपये ६३ पैशांसाठी न्यायालयात हजर राहण्याची वेळ येणे ही सामान्य नागरिकासाठी केवळ आर्थिक नव्हे तर मानसिक छळाची बाब असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

सुरकार यांचे म्हणणे आहे की, बँकेने साधा फोन किंवा सूचना दिली असती तर त्यांनी तत्काळ रक्कम भरली असती. मात्र कोणतीही पूर्वकल्पना न देता थेट लोकअदालतची नोटीस पाठवणे म्हणजे अन्यायकारक वागणूक असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, या घटनेमुळे बँक व्यवस्थेच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून ही केवळ चूक की जाणीवपूर्वक कठोर कारवाई याबाबत चर्चा सुरू झाली आहे. सामान्य ग्राहकांचा विश्वास डळमळीत करणारी ही घटना असल्याचेही नागरिकांचे मत आहे.

अवघ्या ९३ रुपये ६३ पैशांसाठी न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्यास भाग पाडणारी ही घटना खरोखरच सामान्य माणसाच्या विवंचनेचे जिवंत उदाहरण ठरत असून ही तर मदतीच्या नावाखालील शोकांतिका अशी तीव्र प्रतिक्रिया सर्वत्र उमटत आहे.

## जनतेचा गॅस हॉटेलमध्ये जळतोय
## हिंगणघाटात प्रशासनाची धडक मोहीम; ७ सिलिंडर जप्त

### -एस्मा लागू असतानाही नियमांना हरताळ : व्यावसायिक वापर उघड; पाच ठिकाणांवर छापे

**हिंगणघाट जनमाध्यम :** गॅस सिलिंडरच्या तुटवड्याने नागरिक त्रस्त असताना काही व्यावसायिक मात्र घरगुती गॅसचा सर्रास वापर करून स्वतःचा धंदा फुलवत असल्याचा संतापजनक प्रकार हिंगणघाटात उघड झाला आहे. तालुकास्तरीय पथकाने शुक्रवारी अचानक धडक कारवाई करत पाच व्यावसायिक प्रतिष्ठानांवर छापे टाकून एकूण ७ घरगुती गॅस सिलिंडर जप्त केले. या कारवाईने शहरातील हॉटेल व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.



गॅस टंचाईमुळे जनतेचे हाल होऊ नयेत म्हणून केंद्र सरकारने व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठा बंद ठेवत आवश्यक सेवा देखभाल कायदा (एस्मा) लागू केला आहे. मात्र या कायद्याची पर्वा न करता अनेक ठिकाणी घरगुती गॅसच व्यावसायिक वापरासाठी वापरला जात असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले.

**पाच ठिकाणांवर सर्जिकल स्ट्राईक**

पथकाने शहरातील खाद्यपदार्थ विक्री केंद्रांवर अचानक धाड टाकली. त्यात अश्विन अमृततुल्य सेंटर ३ सिलिंडर, अजीत बिर्याणी सेंटर १ सिलिंडर, जय महाराष्ट्र पावभाजी सेंटर १ सिलिंडर, रवी नास्ता सेंटर १ सिलिंडर, गजानन हॉटेल १ सिलिंडर,

अशा प्रकारे एकूण सात सिलिंडर जप्त करण्यात आले. जप्त केलेले सिलिंडर पुरवठा विभागाच्या ताब्यात देण्यात आले असून पुढील कारवाई सुरू आहे.

**यापूर्वीही झाली कारवाई**

घरगुती गॅसचा गैरवापर रोखण्यासाठी प्रशासनाने जिल्हाभरात भरारी पथके तयार केली आहेत.

यापूर्वी ६ मार्च रोजी तालुका पुरवठा विभागाने ५ सिलिंडर जप्त केले होते. तसेच गुरुवार १२ रोजी देवळी येथे दहा आस्थापनांवर छापे टाकून तब्बल ११ सिलिंडर जप्त करण्यात आले होते.

**जनतेचा हक्क लाटणाऱ्यांना सोडणार नाही**

गॅस टंचाईच्या काळात घरगुती सिलिंडरचा व्यावसायिक वापर म्हणजे सामान्य नागरिकांच्या हक्कावर डल्ला असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. अशा प्रकारांवर पुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असून नियम मोडणाऱ्यांना कुठलीही सवलत दिली जाणार नाही, असा इशारा देण्यात आला आहे.

## काटोल स्फोट प्रकरण : उच्चस्तरीय चौकशीची मागणी

### -खासदार अमर काळे यांनी केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांची भेट घेऊन केली उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**वर्धा जनमाध्यम :** काटोल तालुक्यातील एस.बी.आय. एनर्जी लिमिटेड कंपनीत १ मार्च रोजी झालेल्या भीषण स्फोटात २२ मजुरांचा मृत्यू झाल्याच्या घटनेने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. मृतांमध्ये २० महिला मजुरांचा समावेश असल्याने शोककळा पसरली आहे. या पार्श्वभूमीवर खासदार अमर काळे यांनी केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांची भेट घेऊन उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली.



काटोल परिसरात स्फोटके तयार करणाऱ्या सुमारे २० कंपन्या कार्यरत असून गेल्या अडीच वर्षांत विविध स्फोटांत जवळपास ५० मजुरांचा बळी गेला आहे. संबंधित कंपनीत शेवटचे सुरक्षा लेखापरीक्षण जानेवारी २०२४ मध्ये झाले होते, त्यानंतर तपासणी न झाल्याचे समोर आले आहे.

काळे यांनी कंपनी प्रशासनासह संबंधित शासकीय यंत्रणांवरही जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली. मंत्री गोयल यांनी घटनेबद्दल दुःख व्यक्त करत दोषींवर कठोर कारवाईचे आश्वासन दिले.

## ऑटो रिक्षा, टॅक्सी परवान्यांच्या खुले धोरणास स्थगिती


**वर्धा जनमाध्यम :** राज्यातील विविध संघटनांकडून ऑटोरिक्षा, टॅक्सी परवान्यांचे खुले धोरण बंद करण्याबाबत परिवहन आयुक्त कार्यालयास विनंती करण्यात आली होती. त्याअनुषंगाने परिवहन मंत्री यांनी ९ मार्च रोजी बैठक घेऊन ऑटो रिक्षा, टॅक्सी परवान्याच्या खुले धोरणास स्थगिती दिली असल्यामुळे नवीन ऑटो रिक्षा, टॅक्सी मालकांनी परवाना मिळण्यासाठी अर्ज सादर करु नये. या संदर्भातील प्रलंबित अर्जाबाबतची कार्यवाही शासनाच्या पुढील निर्देशानुसार करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्नेहा मेढे यांनी कळविले आहे.

## इतवाऱ्यात बुलडोझरचा धडाका;
## मटन मार्केटमधील अतिक्रमण जमीनदोस्त

### नोटिसांना केराची टोपली : अखेर पालिकेचा पोलिस बंदोबस्तात निर्णायक प्रहार

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील इतवारा भागातील मटन मार्केट परिसरात रस्त्यावरच उभारण्यात आलेल्या बेकायदेशीर पक्क्या बांधकामांवर अखेर शुक्रवारी पालिका प्रशासनाने बुलडोझर फिरवून कठोर कारवाई केली. अतिक्रमणामुळे रस्ता इतका अरुंद झाला होता की, अग्निशमन दल किंवा रुग्णवाहिकेलाही मार्ग मिळणे कठीण झाले होते. संभाव्य मोठ्या दुर्घटनेचा धोका लक्षात घेता प्रशासनाने पोलिस बंदोबस्तात धडक मोहीम राबवून संपूर्ण परिसर मोकळा केला.

मटन मार्केट परिसरात सुमारे २० ते २२ जणांनी रस्त्यालगत पक्की बांधकामे करून सार्वजनिक जागेवर कब्जा केला होता. या अतिक्रमणामुळे वाहतुकीची कोंडी, नागरिकांची गैरसोय आणि सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. वारंवार तक्रारी आल्यानंतर पालिकेने संबंधितांना पूर्वीच नोटिसा बजावून स्वतः अतिक्रमण हटवण्याची संधी दिली होती. मात्र नोटिसांकडे सर्रास दुर्लक्ष करण्यात आले.



शेवटी प्रशासनाचा संयम सुटला आणि शुक्रवारी सकाळीच पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तात जेसीबी यंत्रे दाखल झाली. एकामागून एक पक्की बांधकामे पाडत रस्ता मोकळा करण्यात आला. अचानक सुरू झालेल्या या कारवाईमुळे परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते, मात्र कोणतीही अनुचित घटना घडली नाही.

ही संपूर्ण कारवाई मुख्याधिकारी विजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. बांधकाम विभागाचे अभियंता संदीप डोईजड, निखील लोहवे, गजानन पेटकर तसेच पालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिक्रमण हटवल्यानंतर रस्ता पूर्ववत रुंद झाल्याने स्थानिक नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. वर्षानुवर्षे अडकलेला प्रश्न अखेर मार्गी लागला, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली.

## गॅस नाही... तर मुलांचे जेवण कसे :
## सिलिंडर टंचाईने पोषण आहार योजना धोक्यात

### शिक्षकांची तारांबळ; चुलीवर जेवण शिजविण्याची आली वेळ जवळ

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील गॅस सिलिंडर टंचाईचा आता थेट फटका शाळकरी मुलांच्या ताटात बसू लागला आहे. पोषण आहारासाठी लागणारे भरलेले सिलिंडर वेळेवर मिळत नसल्याने शिक्षकांची अक्षरशः दमछाक होत असून परिस्थिती अशीच राहिली तर मुलांचा पोषण आहार चुलीवर शिजविण्याची नामुष्की ओढावणार, अशी धास्ती व्यक्त होत आहे.

जिल्ह्यातील एकूण १,२०७ शाळांपैकी १,०३८ शाळांमध्ये गॅसवर पोषण आहार शिजविला जातो. मात्र गॅस संपल्यानंतर रिफिल मिळविण्यासाठी शिक्षकांना एजन्सीच्या उंबरठ्यावर हेलपाटे घालावे लागत आहेत. सर्पण खरेदीसाठी कोणतीही आर्थिक तरतूद नसल्याने पर्यायही नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे.

इराण-इस्त्राईल-अमेरिका तणावाच्या पार्श्वभूमीवर इंधन पुरवठ्यावर परिणाम झाल्याचे सांगितले जात असून त्याचा परिणाम देशभरातील गॅस उपलब्धतेवर झाला आहे. तुटवडा वाढू नये म्हणून केंद्राने व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठा बंद केला, पण काही ठिकाणी घरगुती सिलिंडरचा व्यावसायिक वापर सुरू असल्याने परिस्थिती अधिक बिकट झाली आहे. जिल्हा प्रशासन शाळा, निवासी शाळा, वसतीगृह, कारागृह आणि रुग्णालयांना प्राधान्याने सिलिंडर देण्याचा प्रयत्न करीत असले तरी वितरणासाठीची प्रतीक्षा दिवसेंदिवस वाढत आहे. परिणामी कुपोषणमुक्त भारताच्या उद्दिष्टासाठी सुरू असलेली पोषण आहार योजना अडचणीत सापडली आहे.

**तक्रारींचा स्फोट; शिक्षण विभाग हादरला-** पोषण आहारासाठी लागणारे सिलिंडर सहज उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी शिक्षण विभागाकडे मोठ्या प्रमाणात येऊ लागल्या आहेत. वर्धा तालुक्यातील तरोडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सिलिंडर संपल्यानंतर रिफिल न मिळाल्याची तक्रार शिक्षकांनी केली आहे. परिस्थिती नियंत्रणात न आल्यास आगामी काळात समस्या आणखी विदारक होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**गॅस मिळाला नाही तर आहार कसा शिजवायचा शिक्षकांचा प्रश्न**

विद्यार्थ्यांना देण्यात येणारा पोषण आहार गॅसवरच शिजविला जातो. मात्र सध्याच्या टंचाईमुळे भरलेले सिलिंडर मिळणे कठीण झाले आहे. मार्च महिना सुरू असून अजून दीड महिना शाळा सुरू राहणार आहेत. रिफिल बुकिंगच्या नियमांत बदल झाल्याने अडचणी वाढल्या आहेत. गॅस उपलब्ध न झाल्यास तातडीने पर्यायी उपाययोजना करणे आवश्यक आहे, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी दिली.

## टँकरची भीषण धडक : पोलीस कर्मचारी गंभीर जखमी

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा–पुलगाव रोडवरील भोयर कॉलेजजवळ गुरुवारी दुपारी भीषण अपघात घडला. नायरा पेट्रोलियमच्या टँकरने दिलेल्या जोरदार धडकेत पोलीस कर्मचारी शरद पांडे हे गंभीर जखमी झाले. ते आपल्या दुचाकीने वर्ध्याकडे येत असताना मागून भरधाव येणाऱ्या टँकरने जोरदार धडक दिल्याने ते रस्त्यावर फेकले गेले.



अपघातानंतर परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

जखमी पांडे यांना तातडीने स्थानिकांच्या मदतीने सावंगी येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. संबंधित टँकर चालकाविरुद्ध कारवाईची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## ११२ वर गोळीबाराची खोटी माहिती; मद्यधुंद तरुण ताब्यात

### -देवळी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**वर्धा जनमाध्यम :** आपत्कालीन मदतीसाठी सुरू असलेल्या डायल ११२ या क्रमांकावर गोळीबार झाल्याची खोटी माहिती देणाऱ्या तरुणास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. महेश सतीश जुमळे (रा. कानगाव) असे आरोपीचे नाव असून त्याच्याविरुद्ध देवळी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



ही घटना १३ रोजी उघडकीस आली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जुमळे याने ११२ क्रमांकावर फोन करून देवळी–रत्नापूर मार्गावर तिघा बंदुकधाऱ्यांनी त्याच्या वाहनाला धडक देऊन गोळीबार केल्याचे सांगितले. एक गोळी झाडाला लागली असून आरोपी यवतमाळच्या दिशेने पळून गेल्याची माहिती त्याने दिली. या संदेशावरून देवळी व पुलगाव पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली.

मात्र तपासादरम्यान अशी कोणतीही घटना घडली नसल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी जुमळे याच्याशी संपर्क साधला असता त्याने घटनास्थळी येण्यास टाळाटाळ केली. चौकशीत तो मद्यधुंद अवस्थेत असल्याचेही निष्पन्न झाले.

त्यानंतर पोलिसांनी कानगाव येथून त्याला ताब्यात घेतले. आपत्कालीन सेवेचा गैरवापर केल्याप्रकरणी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून नागरिकांनी अशा सेवांचा जबाबदारीने वापर करावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## देवळी पालिका रणांगणात : अध्यक्ष-मुख्याधिकारी आमनेसामने

### कर्मचाऱ्यांचे लेखनीबंद आंदोलन; नगराध्यक्षांचा मुख्याधिकाऱ्यांवर आरोप

**देवळी जनमाध्यम :** नगराध्यक्ष विरुद्ध मुख्याधिकारी असा उघड सत्तासंघर्ष शुक्रवारी देवळी नगरपालिकेत भडकला आणि संपूर्ण प्रशासन अक्षरशः ठप्प झाले. नगराध्यक्षांकडून अपमानास्पद वागणूक दिली जात असल्याचा आरोप करीत कर्मचाऱ्यांनी १३ रोजी लेखनीबंद आंदोलन पुकारले, तर नगराध्यक्ष किरण ठाकरे यांनी पत्रकार परिषदेतून मुख्याधिकाऱ्यांच्या असहकार्य धोरणावर जोरदार हल्ला चढवत शहराच्या विकासाला मुद्दाम अडथळा आणला जात असल्याचा गंभीर आरोप केला. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरींनी पालिकेतील वातावरण अक्षरशः तापून निघाले.

देवळीकरांनी बहुमताने नगराध्यक्षपदी विराजमान केलेल्या किरण ठाकरे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर कागदपत्रांची छाननी केली असता अनेक नियमबाह्य कामे झाल्याचा दावा केला. नियम डावलून परवानग्या देणे, ठेकेदारांची देयके अदा करणे, नगर परिषद हायस्कूलच्या मैदानावर बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे, तसेच आर्थिक स्थिती नाजूक असतानाही पालिकेच्या खर्चातून चारचाकी वाहनाचा वापर करणे या गंभीर बाबी उघड झाल्याचा आरोप त्यांनी केला. मुख्याधिकाऱ्यांसाठी देवळीत अधिकृत निवासस्थान उपलब्ध असतानाही ते वर्धा येथे वास्तव्यास राहून भाड्याच्या वाहनाचा खर्च पालिकेवर टाकत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

मुख्याधिकारी हेकेखोर भूमिका घेत असून महत्त्वाच्या कामांची माहिती देणे टाळले जाते, इतर कर्मचाऱ्यांनाही माहिती न देण्यास प्रवृत्त केले जाते, त्यामुळे नगराध्यक्षांना जाणीवपूर्वक कोंडीत पकडले जात असल्याचा आरोप ठाकरे यांनी केला. असहकार्याच्या

## जाहीर नोटीस

आम जनतेला सूचित करण्यात येत आहे कि माझी पक्षकार मेहरुन्निसा अब्दुल सत्तार संय्यद हिने उप अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, वर्धा येथे अर्ज सादर करून, आपले मय्यत पति, सय्यद अब्दुल सत्तार सय्यद इब्राहीम, राहणार गोंड प्लॉट, सुभाष चौक, वर्धा, जे २० ऑगष्ट २००९ रोजी मरण पावले, त्यांचे मालकी व कब्ज्यातील एक राहते घर, जे सुभाष चौक, गोंड प्लाट, वर्धा, ज्याची नझूल शीट क. ५६, प्लॉट नं ४५८ घर नं ४५,४५./१, क्षेत्रफळ १६८ चौरस मीटर आहे, तो घर, सय्यद अब्दुल सत्तार सय्यद इब्राहीम, राहणार गोंड प्लॉट, सुभाष चौक, वर्धा यांची एकमेव वारसान असल्या कारणस्व, आपले नावावर चढविण्याची विनंती केली आहे.

सदर फेरफारची कार्यवाहीस जर कोणाला उजर असेल किंवा सदर मालमत्ते शी काही हितसंबध असेल तर त्यानी सदर नोटिस प्रकाशित झाल्याचे १५ दिवसाचे आत, उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय वर्धा, येथे जातिने किंवा अधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर रहावे व आपले उजर शी संबधित सर्व कागदपत्र सादर करावे, अन्यथा माझी पक्षकाराचा अर्ज स्वीकार करण्यात येणार व विनंती प्रमाणे फेरफार करण्यात येणार. मुदत संपल्यावर कोणतेही उजर नोंदविला जाणार नाही याची सर्वानी नोद घ्यावी.

वर्धा

दिनांक १२ मार्च २०२६

**एस,आर, तिवारी,**
**अधिवक्ता, वर्धा**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# एसटी महामंडळात 17 हजार पदांवर जम्बो भरती

**नागपूरः** राज्य सरकारने मेघभरतीची घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचाच भाग म्हणून आता पुन्हा एकदा १७ हजार पदांवर नवीन भरती होणार आहे. परिवहन महामंडळात (एसटी) लवकरच मोठ्या प्रमाणावर भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असून एकूण १७ हजार ४८२ पदांची महाभरती करण्यात



येणार असल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. या भरती प्रक्रियेत सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना प्राधान्याने संधी देण्याचा निर्णय घेतला जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, एसटी ही ग्रामीण भागातील जीवनरेखा आहे. त्यामुळे प्रवाशांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी चालक-वाहकांची भरती, नवीन बस खरेदी आणि व्यवस्थापन सुधारणा या सर्व उपाययोजना राबविण्यात येत आहेत, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले. मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, एसटी महामंडळात सध्या चालक व वाहकांच्या पदांवर मोठ्या प्रमाणात रिक्त जागा आहेत. त्यामुळे प्रवासी सेवा सुरळीत ठेवण्यासाठी आणि ग्रामीण भागातील वाहतूक व्यवस्था मजबूत करण्यासाठी ही भरती आवश्यक आहे. त्यासाठी चालक आणि वाहकांच्या भरतीचा प्रस्ताव शासनाच्या वित्त विभागाकडे पाठविण्यात आला असून मंजुरी मिळाल्यानंतर भरती प्रक्रिया सुरू केली जाईल, असे त्यांनी सांगितले. भविष्यात नियमित भरती प्रक्रियेत कंत्राटी कर्मचा-यांच्या अनुभवाचा विचार करून त्यांना प्राधान्य देण्याचा विचार शासन करीत आहे. एसटी महामंडळाची सेवा अधिक सक्षम करण्यासाठी सुमारे दरवर्षी पाच हजार नवीन बस खरेदी करण्याचा प्रस्तावही सरकारकडून तयार करण्यात आला आहे. त्यापैकी तीन हजार बसांच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून टाटा मोटर्सला सुमारे २१०० बस खरेदीचा आदेश देण्यात आला असल्याची माहितीही मंत्री सरनाईक यांनी दिली.

## गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा विभागामार्फत

# राज्यभर नियंत्रण कक्ष आणि जिल्हास्तरीय समित्या

- 6 महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध
- अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने
- राज्यात घरगुती एलपीजीचा तुटवडा नाही
- समाजमाध्यमांवरील खोट्या/बनावट बातम्यांवर कारवाई
- अफवांवर विश्वास न ठेवण्याचे नागरिकांना आवाहन



**मुंबई/प्रतिनिधी :** इराण - इस्राईल युध्दाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घरगुती व व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडर सुरळीत पुरवठयाबाबत राज्य शासन विविध उपाययोजना राबवत आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होउ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. संपूर्ण राज्यामध्ये एलपीजी सुरळीत ठेवण्याविषयी तसेच पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिले आहेत.

घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, याची नागरिकांनी निश्चिंतता बाळगावी, अशी ग्वाही अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.मार्च महिन्यामध्ये गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध असून युध्दाच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत राहील याची खबरदारी घेण्याच्या सूचना विभागामार्फत सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

**जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन-** घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होउ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि सर्व सरकारी गॅस कंपन्यांचे अधिकारी यांचा या समित्यांमध्ये समावेश असेल. गॅस पुरवठा साखळीवर देखरेख ठेवणे, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच दररोज परिस्थितीचा आढावा घेउन अहवाल सादर करणे ही समित्यांची प्रमुख जबाबदारी असेल. मुंबई-ठाणे रेशनिंग क्षेत्रात नियंत्रक, रेशनिंग यांच्या नियंत्रणाखाली स्थापन केलेल्या समितीत पोलीस उप आयुक्त आणि उपनियंत्रक (रेशनिंग) समितीत समावेश करण्यात येणार असून मुंबई आणि ठाणे शहरातील सर्व उपायुक्तांशी सह पोलीस आयुक्त(प्रशासन) समन्वय साधणार आहेत. पर्यायी इंधनाच्या वापराची शक्यता तपासण्याचे निर्देशही यंत्रणांना देण्यात आले आहेत. यामध्ये कोळसा, राकेल आदी पर्यायांचा विचार केला जाणार असला तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहणार आहे. तसेच जिल्हास्तरीय समित्यांनी हाटेल व रेस्टारंट संघटनांसोबत बैठक घेउन पर्यायी इंधनाच्या वापरासाठी प्रोत्साहन देण्याचे निर्देश दिले आहेत. रुग्णालये, शासकीय वसतिगृहे, शासकीय शाळा/महाविद्यालयांमधील मेस, मध्यान्ह भोजन योजना, शासकीय आश्रमशाळा आदी अत्यावश्यक सेवा देणा-या संस्थांना घरगुती/व्यावसायिक गॅसचा पुरवठा प्राधान्याने देण्यात येणार असून अशा संस्थांची यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने देण्यासाठी स्वतंत्र प्राधान्यक्रमही निश्चित केला जाणार आहे.गॅस पुरवठ्याबाबत अफवा पसरू नयेत, यासाठी दररोज रेडिओ, एफएम, दूरदर्शन तसेच मुद्रित माध्यमांद्वारे माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि जिल्हा समित्या यांसंदर्भातील जबाबदारी पार पाडतील. समाज माध्यमांवरील खोट्या/बनावट बातम्यांवरही कारवाई करण्यात येईल.गॅस बुकींग ॲप आणि मिस्ड क?ल सेवांमध्ये येणा-या तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्याचे निर्देश तेल कंपन्यांना देण्यात आले आहेत. तसेच राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुका स्तरावर नियंत्रण कक्ष तातडीने सुरू करून तक्रार निवारणासाठी व्हाट्सॲप सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.आगामी धार्मिक सण व उत्सवांचा विचार करून सार्वजनिक संस्थांना एलपीजी सिलिंडरचा पुरवठा अखंड ठेवण्यासाठी प्राधान्य राहील.गॅस सिलिंडर पुरवठ्या संदर्भात नागरिकांमध्ये घबराट निर्माण होउ नये, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायत सदस्यांची मदत घेण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. एलपीजी वाहतूक करणा-या वाहनांना तसेच गॅस एजन्सींना आवश्यक पोलीस संरक्षण देण्याची जबाबदारी पोलिस प्रशासनावर सोपविण्यात आली आहे.जिल्हा प्रशासन, रेशनिंग नियंत्रक आणि तेल कंपन्यांनी दररोज साठा स्थिती व अद्ययावत अहवाल राज्यस्तरीय नियंत्रण कक्षाला सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## लाल दहशतीचे काळे पर्व संपुष्टात!

# 'बुढापहाड'चा क्रुर 'मृत्युंजय' अखेर जेरबंद

**गडचिरोलीः** झारखंड, छत्तीसगड आणि बिहार सीमा भागातील नक्षलवाद्यांच्या हिंसक कारवायांचा अभेद्य गड मानल्या जाणा-या बुढापहाडचा शेवटचा क्रूर नक्षल नेता अखेर सुरक्षा दलांच्या जाळ्यात अडकला आहे. गेली दोन दशके हुलकावणी देणारा आणि सुरक्षा यंत्रणांच्या डोळ्यात धूळ फेकणारा जहाल नक्षलवादी कमांडर मृत्युंजय भुईया उर्फ फारेश (४०, रा. नवदीह छिप्पाडोहर, जि. लातेहार, झारखंड) याला १२ मार्च रोजी अटक करण्यात यश आले आहे. त्याच्या अटकेने केवळ झारखंडच नव्हे, तर छत्तीसगड आणि बिहारच्या सीमावर्ती भागातील दहशतीचा एक हिंसक अध्याय कायमचा बंद झाला आहे.



**शंभराहून अधिक गंभीर गुन्हे-**मृत्युंजय भुईया नावाची त्या परिसरात प्रचंड दहशत होती. २०१३ मध्ये गढवा जिल्ह्यात त्याने १३ जवानांना रात्रीच्या सुमारास जिवंत जाळले होते. ही त्याची क्रुरता पाहून नक्षलवादी संघटनेत त्याचे वजन वाढले आणि तो झोनल कमांडर बनला. तो केवळ बंदूक चालवण्यात तरबेज नव्हता, तर स्फोटक तज्ज्ञ म्हणून त्याची ओळख होती. त्याच्या हाताने पेरलेल्या सुरुंगांनी आजवर ५० हून अधिक जवानांचा बळी घेतला आहे. त्याच्यावर विविध राज्यात मिळून ५० लाखांहून अधिकचे बक्षीस होते. राष्ट्रीय तपास यंत्रणेसाठी (एनआयए) तो अत्यंत महत्त्वाचा आरोपी होता. खंडणी, हत्या आणि जवानांवरील हल्ल्यांसह शंभराहून अधिक गंभीर गुन्हे त्याच्या नावावर आहेत.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सरेंडर झालेत

## काँग्रेसचा मोदी सरकारवर हल्लाबोल

**मुंबई/प्रतिनिधी :** हास्टेल बंद पडत आहेत. लोकं २ हजार रुपये देत गॅस सिलिंडर विकत घेत आहेत. केंद्र सरकारला हे दिसत नाही का? देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सरेंडर झाले आहेत, असे म्हणत काँग्रेस नेते व विरोधकांनी केंद्र सरकारवर तीव्र संताप व्यक्त केला आहे.विजय वडेट्टीवार म्हणाले की, सामान्य माणसांना गॅस आणि तेलासाठी ज्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे याचे कारण देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आहेत. त्यांनी अमेरिकेसमोर गुडघे टेकले आहेत. अमेरिकेच्या इशा-यावर देश चालवणे योग्य आहे का? मोदी यांच्या इस्त्रायलसोबत आहोत या विधानामुळे आपल्याला इराणकडून मिळणारी साथ मिळत नाही. मंत्री सांगतात कसलीही कमतरता नाही, पण सिलिंडरसाठी दोन-दोन किमी रांगा लागताना दिसत आहेत. गॅस आणि पेट्रोल संदर्भात राज्याची स्थिती काय आहे यावर सरकारने बोलले पाहिजे. लोकं त्रस्त झाले आहेत, त्यावर निर्णय घेतला गेला पाहिजे.



**एपस्टीन फाइल्समुळे सरेंडर-**काँग्रेस नेते नाना पटोले म्हणाले की, एपस्टीन फाइल्समुळे सरेंडर झालेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळेच आज संपूर्ण देशात गॅस, पेट्रोल, डिझेलचा तुटवडा जाणवला आहे. हास्टेलमध्ये राहणारी मुले-मुलीसुद्धा जेवणाची व्यवस्था होत नाही म्हणून सगळे सोडून गावाकडे निघाले आहेत अशी परिस्थिती झाली आहे. अनेक हाटेल्स बंद झाले आहेत. घरगुती गॅस सिलिंडर बंद व्हायला सुरु वात झाली आहे. त्यासाठी लोकं लाईनमध्ये लागायला लागली आहेत.

**जनतेला वा-यावर सोडता येणार नाही-** नाना पटोले म्हणाले की, सरकारने कुणाच्या हातापाया पडायचे ते पडावे, यांच्या एपस्टीन फाइल्सच्या पापामुळे जनतेला त्रास होउ देउ नये. जनतेला वा-यावर सोडता येणार नाही ही आमची भूमिका आहे. सरकारने सिलिंडर द्यावे. वडेट्टीवार आणि नाना पटोले यांच्याकडून घोषणाबाजी करण्यात आली.

# किसान सन्मान निधी शेतक-यांना आर्थिक आधार देणारी महत्त्वाची योजना-प्रधानमंत्री

**प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा 22 वा हप्ता वितरित**



**महाराष्ट्रातील 91 लाख शेतक-यांना 1,837 कोटींचे वितरण**

**मुंबई/प्रतिनिधी :**सरकार शेतक-यांच्या कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य देत असून किसान सन्मान निधी योजना शेतक-यांना आर्थिक आधार देणारी महत्त्वाची योजना ठरली आहे. या योजनेमुळे शेतक-यांना बियाणे, खत आणि इतर शेतीसंबंधित खर्च भागविण्यास मदत होत आहे असे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले

गुवाहाटी येथील समारंभात 'प्रधानमंत्री किसान सन्मान निधी' चा २२ वा हप्त्याचे डीबीटी हस्तांतरण प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात मुंबई येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले. या कार्यक्रमाद्वारे देशभरातील सुमारे ९.३२ कोटी शेतकरी कुटुंबांच्या खात्यात १८,६४० कोटी रुपयांहून अधिक रक्कम थेट डीबीटी पद्धतीने जमा करण्यात आली. प्रत्येक पात्र शेतकरी कुटुंबाच्या बँक खात्यात २,००० रु पयांचा हप्ता जमा झाला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले की, २०१९ मध्ये सुरू झालेल्या या योजनेअंतर्गत आतापर्यंत ४.२७ लाख कोटी रु पयांपेक्षा अधिक रक्कम देशातील शेतक-यांच्या खात्यात थेट जमा करण्यात आली आहे. दरवर्षी पात्र शेतकरी कुटुंबांना ६,००० रु पयांची आर्थिक मदत तीन समान हप्त्यांमध्ये दिली जाते. या २२ व्या हप्त्यात २.१५ कोटीहून अधिक महिला शेतकरी लाभार्थ्यांनाही आर्थिक मदत मिळाली असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होणार असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. यावेळी आसाममधील गुवाहाटी कोकराझार येथे पंतप्रधानांच्या हस्ते १९,४८०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विविध विकासकामांचे उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात आली.



राज्यातील सुमारे ९१ लाख शेतक-यांच्या खात्यात एकूण ?१,८३७ कोटींची रक्कम थेट जमा होणार असून या निधीमुळे शेतक-यांना बियाणे, खते, औषधे तसेच इतर शेतीच्या आवश्यक खर्चांसाठी वेळेवर आर्थिक मदत उपलब्ध होईल. शेतीच्या उत्पादनक्षमतेत वाढ होण्यासाठी आणि शेतक-यांचे आर्थिक बळकटीकरण करण्यासाठी ही योजना अत्यंत महत्वाची ठरत आहे. थेट लाभ हस्तांतरणाच्या ई-वितरण पद्धतीमुळे (डीबीटी) माध्यमातून ही मदत शेतक-यांच्या बँक खात्यात जमा होत आहे. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे देखील त्यांच्या कार्यालयातून दूरदृश्यप्रणाली द्वारे सहभागी झाले होते.

# इंडिगोची आंतरराष्ट्रीय विमानसेवा 2300 पर्यंत महागली

**नवी दिल्ली-**इराण आणि अमेरिका-इस्त्रायल यांच्यातील सुरू असलेल्या युद्धाचा परिणाम आता तुमच्या हवाई प्रवासावरही होउ लागला आहे. देशातील सर्वात मोठी एअरलाइन कंपनी इंडिगोच्या विमानाने प्रवास १४ मार्चपासून महाग होणार आहे. एअरलाइनने देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमान तिकिटांवर ४२५ ते २३०० पर्यंत इंधन शुल्क (फ्यूल चार्ज) लावण्याचा निर्णय घेतला आहे.यानंतर, नवीन बुकिंग करणा-या प्रवाशांना तिकिटासोबत अतिरिक्त इंधन शुल्क भरावे लागेल. एअरलाइनचे म्हणणे आहे की, अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील सुरू असलेल्या युद्धामुळे जेट इंधनाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे, त्यामुळे हे पाउल उचलण्यात आले आहे. कंपनीनुसार, भारत आणि भारतीय उपखंडातील विमानांसाठी ४२५ इंधन शुल्क आकारले जाईल, तर मध्य पूर्वेकडील (मिडल ईस्ट) विमानांसाठी ९०० अतिरिक्त भरावे लागतील. त्याचबरोबर, दक्षिण-पूर्व आशिया, चीन, आफ्रिका आणि पश्चिम आशियाकडे जाणा-या विमानांवर १८०० आणि युरोपच्या विमानांवर २३०० इंधन शुल्क आकारले जाईल.



# महाराष्ट्रात मराठी शिकवावीच लागणार!

## अन्यथा मान्यता रद्द; शिक्षणमंत्री भुसेंची मोठी घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे हे सक्तीचे आहे, असा अध्यादेश ९ मार्च २०२० रोजी राज्य सरकारने काढला आहे, या आदेशाला काही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शाळांनी केराची टोपली दाखवली आहे. मराठी भाषा न शिकवणा-या शाळांवर यापुढे कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

विधिमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या आजच्या (ता. १३ मार्च) कामकाजात ठाकरेंच्या शिवसेनेचे आमदार हारून खान यांनी राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा करण्याबाबतचा प्रश्न प्रश्नोत्तराच्या माध्यमातून उपस्थित केला होता. यावर शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी सभागृहाला माहिती दिली. आमदार हारून खान त्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना भुसेंनी महत्त्वाची घोषणा केली आहे.मुंबईतील अनेक इंटरनॅशनल शाळांमध्ये मराठी शिकवले जात नसल्याचे हारूण खान यांनी सांगितले. याला उत्तर देताना शिक्षणमंत्र्यांनी ही माहिती दिली. 'यापुढे हिंदी, इंग्रजी, उर्दू, गुजराती व अन्य भाषांच्या शाळांमध्ये मराठीची अंमलबजावणी करण्यातच येईल, यासाठी सरकार दक्षता घेईल, ज्या शाळा किंवा संस्थां आदेश पाळणार नाहीत, त्यांची मान्यता रद्द करण्यात येईल,' असे भुसे यांनी सांगितले. दादा भुसे म्हणाले, 'राज्यातील प्रत्येक शाळेत मराठी भाषा शिकवणे बंधनकारक आहे. या कायद्याचे उल्लंघन करणा-या शाळांची गय केली जाणार नाही. आगामी शैक्षणिक वर्षात अशा शाळांची पुन्हा तपासणी केली जाणार आहे. त्यांना पहिल्यांदा मराठी शिकवण्याची समज देण्यात येईल. परंतु, तरी सुद्धा त्या शाळांमध्ये मराठी शिकवले गेले नाही तर त्या शाळांची किंवा संस्थांची मान्यता रद्द करण्यात येईल,'




# ॲट्रोसिटी कायद्यांतर्गत आता थेट अटक नाही -मंत्री शिरसाट

**मुंबई/प्रतिनिधी :**पूर्वी ॲट्रोसिटीचा गैरवापर केला जात असे. म्हणून आपण या कायद्यात बदल केले. आता ॲट्रोसिटीअंतर्गत एफआयआर दाखल झाल्यावरही समितीतर्फे चौकशी होते, गुन्हा सिद्ध झाला तरच अटक करण्यात येते अन्यथा एफआयआर रद्द होतो. कुणावरही विनाकारण अन्याय होउ नये, हा यामागील उद्देश आहे, अशी माहिती राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आज विधान परिषदेत एका प्रश्नाला उत्तर देताना दिली.

# एआय क्षेत्रात भविष्यासाठी महाराष्ट्र सज्ज; डेटा सेंटर क्षेत्रात राज्य आघाडीवर

**मुंबई/प्रतिनिधी :**देशाच्या डिजिटल आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रात महाराष्ट्र अग्रस्थानी असून डेटा सेंटर क्षेत्रात राज्याने भक्कम स्थान निर्माण केले आहे. पुढील तीन वर्षांत महाराष्ट्र जागतिक डेटा सेंटर उद्योगात आघाडीचे राज्य म्हणून उदयास येईल, असा विश्वास राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केला. मोठ्या प्रमाणावर होत असलेली आंतरराष्ट्रीय गुंतवणूक, नवीकरणीय उर्जेचा वाढता वापर आणि मजबूत डिजिटल पायाभूत सुविधा यामुळे राज्य डेटा सेंटर आणि एआय कंपन्यांचे प्रमुख केंद्र बनत असल्याचे त्यांनी सांगितले. बांद्रा कुर्ला संकुल येथे आयोजित पश्चिम विभागातील क?न्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) तर्फे आयोजित सातव्या डेटा सेंटर ब्लूप्रिंट परिषदेत मंत्री रावल बोलत होते. या परिषदेत धोरणनिर्माते, गुंतवणूकदार आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील अनेक नेते सहभागी झाले होते. मंत्री रावल म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्ता जागतिक अर्थव्यवस्थेचे स्वरूप वेगाने बदलत असून आरोग्य, वित्त, उत्पादन आणि शेतीसह अनेक क्षेत्रांत मोठे परिवर्तन घडवत आहे. सध्या भारतातील सुमारे ५० टक्के डेटा सेंटर महाराष्ट्रात आहे.. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुमारे ३० लाख कोटी रु पयांच्या गुंतवणुकीसाठी ८० सामंजस्य करार करण्यात आले असून त्यामुळे जागतिक गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण तयार झाले आहे. पंतप्रधान मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे भारत जगातील सर्वात वेगाने वाढणा-या अर्थव्यवस्थांपैकी एक बनला आहे मजबूत डिजिटल पायाभूत सुविधा, गतिमान स्टार्टअप परिसंस्था आणि कौशल्यसंपन्न मनुष्यबळामुळे भारत एआय क्षेत्रातील नवोन्मेषाचे नेतृत्व करण्यास सक्षम असल्याचे त्यांनी सांगितले.

# बालकांच्या डिजिटल सुरक्षिततेसाठी डिजिटल कवच आवश्यक -मंत्री तटकरे

**मुंबई/प्रतिनिधी :**तंत्रज्ञानाचा सुरक्षित आणि जबाबदार वापर सुनिश्चित करत बालकांसाठी सुरक्षित डिजिटल वातावरण निर्माण करण्यासाठी डिजिटल कवच उभारण्याची गरज असल्याचे मत महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केले. बालकांच्या सुरक्षिततेसह डिजिटल युगातील आव्हानांचा सामना करण्यासाठी महा-संकल्प : सुरक्षितता, शिक्षण आणि शाश्वत डिजिटल भारत या नेतृत्व संवादाचे आयोजन जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे करण्यात आले. महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग आणि चाइल्डफंड इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला आयोगाच्या अध्यक्षा नंदिनी आवडे, सचिव लक्ष्मण राउत, अवर सचिव वंदना जैन, चाइल्डफंड इंडियाचे कार्यकारी संचालक आनंद विश्वकर्मा तसेच विविध क?र्पोरेट संस्थांचे प्रतिनिधी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, वकील, प्राध्यापक, फिल्ममेकर आणि विविध क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी संदेशात नमूद केले की, भारतात सुमारे ४४ कोटी मुले १८ वर्षांखालील असून विकसित भारत @2047 या ध्येयाकडे वाटचाल करताना बालकांचा सर्वांगीण विकास केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे.

# सभागृहाचे नियम सर्व सदस्यांसाठी बंधनकारक, संसदीय संस्थांचा आदर करणे गरजेचे : लोकसभा अध्यक्ष

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** संसदेत अभिव्यक्ती स्वातंर्त्याची हमी आहे, मात्र ते संविधान आणि संसदीय कार्यपद्धतीचे नियमन करणारे नियम आणि स्थायी आदेशांच्या अधीन आहे, यावर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आज भर दिला. ते म्हणाले की, सभागृहात बोलताना सदस्यांनी कसे वागावे याबद्दलच्या नियमांतर्गत सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे अस्तित्वात आहेत.संसदेतील अभिव्यक्ती स्वातंर्त्यासंदर्भात घटनेच्या कलम १०५ मध्ये दिलेल्या संदर्भाबाबत अध्यक्षांनी स्पष्ट केले की, संविधान स्वताच हे स्वातंर्त्य संसदीय नियमांच्या चौकटीत ठेवते. आपल्याला पदावरून हटवण्याच्या ठरावावरील चर्चेच्या समाप्तीनंतर एक दिवसानंतर सभागृहाला संबोधित करताना ते म्हणाले की, गेल्या दोन दिवसांत सभागृहात बारा तासांहून अधिक काळ चर्चा झाली, या दरम्यान विविध पक्षांच्या सदस्यांनी आपली मते, युक्तिवाद आणि चिंता व्यक्त केल्या. चर्चेदरम्यान,बोलण्याच्या संधींबाबत उपस्थित केलेल्या मुद्द्यावर उत्तर देताना, सभापतींनी स्पष्ट केले की सर्व सदस्यांनी सभागृहाच्या नियमांमध्ये नमूद केलेल्या प्रक्रियांचे पालन केले पाहिजे. काही सदस्यांचा असा विश्वास आहे की विरोधी पक्षनेता कधीही उभे राहू शकतो आणि आपल्या आवडीच्या कोणत्याही विषयावर विशेषाधिकार म्हणून बोलू शकतो. मी हे स्पष्ट करू इच्छितो की सभागृहाने स्वताच तयार केलेल्या नियमांनुसार ते काम करते. हे नियम प्रत्येक सदस्याला एक समान लागू होतात, त्यांनी अधोरेखित केले.'या सभागृहातील कोणत्याही सन्माननीय सदस्याला या नियमांच्या चौकटीबाहेर बोलण्याचा विशेषाधिकार नाही,' त्यांनी नमूद केले. विरोधी पक्षांच्या सदस्यांचे माईक बंद करण्यासंदर्भातल्या आरोपावरही



त्यांनी उत्तर दिले. मी पुन्हा एकदा स्पष्ट करू इच्छितो की अध्यक्षांकडे मायक्रोफोन चालू अथवा बंद करण्यासाठी कोणतेही बटण नाही. सभागृहातील यंत्रणा केवळ ज्या सदस्याला बोलण्याची परवानगी देण्यात आली आहे, त्याचा मायक्रोफोन सक्रिय करते, त्यांनी स्पष्ट केले.सभापतींनी अधोरेखित केले की 'ही खुर्ची कोणत्याही व्यक्तीची नाही. ती भारताच्या लोकशाही परंपरांचे, संविधानाच्या आत्म्याचे आणि या महान संस्थेच्या प्रतिष्ठेचे प्रतीक आहे. महिला सदस्यांच्या आदराबाबत व्यक्त केलेल्या चिंतेचा उल्लेख करताना सभापतींनी सर्व महिला खासदारांबद्दलचा त्यांचा आदर पुन्हा व्यक्त केला. 'माझ्या कार्यकाळात प्रत्येक महिला सदस्याला - पहिल्यांदाच आलेल्या सदस्यांसह - त्यांचे विचार व्यक्त करण्याची संधी मिळाली आहे.' विरोधी सदस्यांना चर्चेत पुरेशी संधी दिली गेली नाही, या दाव्याचेही सभापतींनी खंडन केले.

सभागृहात गदारोळ करण्याच्या वर्तनावर सभापतींनी कडक टीका केली आणि म्हटले की घोषणाबाजी करणे, फलक दाखवणे, कागदपत्रे फाडणे आणि सभागृहाच्या हौद्याकडे जाणे हे प्रस्थापित संसदीय परंपरेच्या विरुद्ध आहे. 'या कृतींमुळे केवळ सभागृहाचे कामकाजच विस्कळीत होत नाही तर त्याची प्रतिष्ठाही कमी होते,' असे त्यांनी आवर्जून सांगितले. त्यांनी संसद सदस्यांना संसदीय लोकशाहीच्या सर्वोच्च परंपरा जपण्याचे आवाहन केले.सभापतींनी पुढे यावर भर दिला की, संसदेची प्रतिष्ठा आणि शिस्त जपणे ही सर्व सदस्यांची सामूहिक जबाबदारी आहे.आपल्या भाषणाचा समारोप करताना बिर्ला यांनी सर्वपक्षीय सदस्यांना आवाहन केले की, संसदेला अधिक बळकट करण्यासाठी तसेच लोकांचा विश्वास कायम राखण्यासाठी त्यांनी एकत्रितपणे कार्य करावे.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# कॉपीचे लोण आणि गुणवत्तेची बोंब

राज्यात सुरू असलेल्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेत झालेल्या कॉपी प्रकरणांत महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाला तब्बल ८१ जणांना निलंबित करावे लागले आहे. शरमेची बाब अशी, की या ८१ जणांतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारीच आहेत ! परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांची काठिण्य पातळी अगदी न्यूनतम केली, तरी परीक्षेतील कॉपीचे प्रकार थांबत नाहीत, हे लक्षात आल्यानंतर राज्य मंडळाने यावर्षी कॉपीविरोधी मोहीम अधिक कठोर करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी अर्थातच सीसीटीव्हीसारख्या आधुनिक तंत्राची मोठी मदत झाली. कॉपीविरोधी पथक, भरारी पथक, पर्यवेक्षकाची निगराणी असूनही यापूर्वी कॉपी सर्रास होत असे. ती पकडण्यासाठी कोणी फारसे तयार नसे. कारण, नंतर ती सिद्ध करणे बरेच कठीण जात असे. केवळ प्रासंगिक पुराव्यावर अवलंबून राहणे अशा प्रकरणात स्थानिक व्यक्तीसाठी मोठे जोखमीचे ठरत असे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी ही अडचण दूर केली आहे. गैरप्रकारांचे थेट चित्रणच पुरावा म्हणून हाती राहत असल्याने यापुढे मंडळाला कॉपीविरोधी अभियान अधिक प्रभावी करता येईल. पर्यवेक्षक आणि केंद्रप्रमुखांचीही मंडळाला साथ मिळेल. गेली अनेक वर्ष राज्यातील काही विभागांचा निकाल आश्चर्यकारकरीत्या सर्वोत्तम लागत असे. आपल्या विभागातील (आणि भागातीलही) विद्यार्थ्यांवर यामुळे अन्याय होतो, या भावनेने 'त्या' विभागांचे अनुकरण हळूहळू इतर विभागात; संपूर्ण महाराष्ट्रातच होऊ लागले. राज्याचा निकाल त्यामुळे 'अतिशय उत्तम' लागत असला, तरी त्यात किती फसवणूक आहे, याची कल्पना केवळ मंडळालाच नाही, तर शिक्षण क्षेत्रातील सर्वांनाच होती. आपल्या विभागाचा निकाल सर्वोत्तम असावा,या स्पर्धेतून कॉपीची साथ पूर्ण राज्यभर फैलावली आहे. लहान गावातील अनेक शाळा स्वतःहूनच त्यासाठी आपल्या विद्यार्थ्यांना मदत करताना दूरचित्र वाहिन्यांवर पाहायला मिळते. आधी दहावी; आणि त्यानंतर बारावीच्या परीक्षांतही हे लोण पसरले आहे. कारण, दहावीतून अशा पद्धतीने पुढे आलेल्या विद्यार्थ्यांना त्याच पद्धतीने आणखी 'पुढे ढकलण्या' शिवाय पर्याय नसतो. या प्रकाराने राज्याची शैक्षणिक गुणवत्ता उंचावलेली दिसली, तरी प्रत्यक्षात विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची बोंबच असते. राज्यातील विद्यार्थी उच्च शिक्षणात अपयशी ठरण्याचे, रोजगाराच्या क्षेत्रात मागे पडण्याचे, तरुणांच्या आत्महत्यांमध्ये वाढ होण्याचे प्रमाण याच कारणामुळे वाढले होते. ही स्वतःचीच फसवणूक रोखण्यासाठी शिक्षण विभागाने कठोर भूमिका घेतली आणि राज्य मंडळाला जे स्वातंत्र्य दिले, ते राज्यासाठी अंतिमतः उपकारकच ठरणार आहे. कॉपीला मदत केली किंवा त्यात सक्रिय सहभागी झाल्याच्या आरोपावरून मंडळाने ज्या ८१ जणांना निलंबित केले आहे, त्यातले सर्वाधिक २८ जण वाशिम जिल्ह्यातले आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या २१ आणि बीड जिल्ह्यातल्या १८ जणांचाही त्यात समावेश आहे. दहावीच्या परीक्षेतील प्रत्यक्ष कॉपीच्या प्रकरणात सर्वाधिक ५९ प्रकरणे अमरावती विभागात नोंदवली गेली आहेत. पुणे विभागात ४७ प्रकरणांची नोंद झाली असून छत्रपती संभाजीनगर विभागात या प्रकरणांची संख्या ४६ आहे. बारावीच्या परीक्षेवेळी झालेल्या कॉपीच्या गुन्ह्याच्या नोंद प्रकरणांची संख्या यावेळी ४९ वर गेली आहे. गेल्या वर्षी एकूण ९२ प्रकरणांची नोंद झाली होती. ही सविस्तर आकडेवारी सांगण्याचा उद्देश महाराष्ट्रात कॉपीचे जे 'हॉट स्पॉट' तयार झाले आहेत, त्याची कल्पना आपल्याला यावी यासाठी. कॉपीचे प्रकार याशिवाय अन्य भागांत नाहीत, असे नाही. कॉपीचा सुळसुळाट संपूर्ण महाराष्ट्रात झाला आहे. काही ठिकाणी तो कमी, काही ठिकाणी अति आहे, एवढंच. तपासणी आणि भरारी पथकांच्या कार्यक्षमता आणि इच्छाशक्तीचाही प्रकरणांच्या नोंदींवर परिणाम झाला असेल. पण, हा आजार महाराष्ट्रात फैलावलेला नाही, 'आमच्या भागात असे काहीही नाही' असे छातीठोक सांगणारे कोणी निघेल, असे वाटत नाही. कॉपीच्या या प्रकाराने भले विद्यार्थ्यांचा तात्पुरता फायदा होत असेल,खराब निकालाचे स्पष्टीकरण देण्यात शिक्षकांची सुटका होत असेल, शाळेचे नांवही मोठे होत असेल, संस्थाचालकांची प्रतिष्ठा वाढत असेल; पण हे सगळे खोटे आणि फसवे आहे, हे या सर्वांनीच लक्षात घेतले पाहिजे. त्यांच्याच शाळांतील प्रामाणिक अभ्यासू विद्यार्थ्यांवर, कष्टाळू शिक्षकांवर यामुळे अन्याय होतो. विद्यार्थी, शिक्षक, शिक्षण संस्था या सगळ्यांच्याच भल्यासाठी कॉपीचा हा रोग जिथल्या तिथे रोखायला हवा. त्यासाठी शिक्षण क्षेत्रातील सगळ्या घटकांनी एकत्रित आग्रह धरायला हवा. कॉपी प्रकरणात शिक्षकांवर कारवाई झाली, म्हणून निदर्शने होणे हे या दृष्टीने दुर्दैवी ठरते. यशाला 'शॉर्ट कट्' नसतात, हे विद्यार्थ्यांच्या मनावर लहानपणीच ठसवले जायला हवे. त्यांना परिश्रमाची, आपल्या परिश्रमाची किमत जोखण्याची, त्यातून अपयश आले, तर ते स्वीकारण्याची, त्यावर मात करण्याची, गुणवत्तेबाबत आदर जोपासण्याची सवय लहानपणापासूनच लागायला हवी. विद्यार्थ्यांवरील या संस्कारातूनच समाजाचे, देशाचे व्यक्तिमत्त्व घडत असते. समाजाचा दर्जा आणि धारणा ठरत असतात. देशात माजलेल्या भ्रष्टाचाराबद्दल एकजात सगळे सतत बोलतात; पण त्याचे मूळ जिथे आहे, अप्रामाणिकपणाचा संस्कार शालेय जीवनात जिथून सुरू होतो, त्याकडे कोणाचेच लक्ष नाही. राज्य प्राथमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या कारवाईचे मूल्य किती मोठे आहे, ते यावरून मोजायला हवे.

# बायोगॅस ठरू शकतो दीर्घकालीन उपाय

**ग्रामीण भागात स्वच्छ ऊर्जा, कचरा व्यवस्थापन आणि स्थानिक अर्थव्यवस्था यांना एकत्र जोडणारे एक प्रभावी मॉडेल म्हणजे बायोगॅस प्लांट. बायोगॅसवर आधारित विद्युत निर्मिती, बायो सीएनजी उत्पादन आणि ईव्ही चार्जिंग स्टेशन यांचे एकात्मिक ऊर्जा मॉडेल फायदेशीर आहे. या प्रणालीमध्ये शेती, पशुपालन, कचरा व्यवस्थापन आणि वाहतूक व्यवस्था यांचा परस्पर संबंध निर्माण होतो.**



सध्या सुरू असलेल्या अमेरिका-इराण संघर्षामुळे जागतिक ऊर्जा बाजारात मोठी अस्थिरता निर्माण झाली आहे. तेलाच्या किमतीतील अचानक वाढ, वाहतूक मार्गावरील असुरक्षितता आणि ऊर्जा पुरवठ्यावरील अनिश्चितता यामुळे अनेक देश आर्थिक आगि धोरणात्मक दडपणाखाली आले आहेत. भारत आपल्या एकूण कच्च्या तेलाच्या गरजापैकी सुमारे ८५ टक्के तेल आयात करतो, तर नैसर्गिक वायूच्या बाबतीतही मोठ्या प्रमाणात आयातीवर अवलंबित्व आहे. युद्धाचा थेट परिणाम भारताच्या ऊर्जा सुरक्षेवर झाला आहे. एलपीजी सिलिंडरच्या किमती वाढतात, वाहतुकीचा खर्च वाढतो, औद्योगिक उत्पादन महाग होते आणि शेवटी महागाईचा दबाव संपूर्ण अर्थव्यवस्थेवर जाणवतो. डिशेत, खत, वीज आणि वाहतूक खर्च वाढल्यामुळे शेतीचा खर्च या पार्श्वभूमीवर एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो, तो म्हणजे जर जागतिक ऊर्जा पुरवठा खंडित झाला तर भारताने आपल्या ऊर्जा गरजा कशा पूर्ण कराव्यात ? या प्रश्नाचे उत्तर आपल्या आसपास दडले आहे. आपल्या शेतात, गावात, शहरातील कचऱ्यात आणि पशुधनात असलेले जैविक संसाधन भारताला ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने नेऊ शकते. बायोगॅस, कॉम्प्रेस्ड बायोगॅस आणि हरित ऊर्जा तंत्रज्ञान ही केवळ पर्यावरणपूरक उपाययोजना नसून भविष्यातील ऊर्जा सुरक्षेची मजबूत पायाभरणी ठरू शकतात.

### भारतातील जैविक संपत्ती

- पशुधनाच्या संख्येच्या दृष्टीने भारत जगातील अग्रगण्य देशांपैकी एक आहे. देशात अंदाजे १९ कोटी गायी, ११ कोटी म्हशी आणि ८५ कोटींहून अधिक कुक्कुट पक्षी आहेत. या पशुधनातून दररोज प्रचंड प्रमाणात शेण आणि जैविक कचरा निर्माण होती. भारतात दरवर्षी जवळपास ५०० दशलक्ष टन शेती अवशेष तयार होतात. धान, गहू, ऊस, मका आणि इतर पिकांनंतर उरलेले अवशेष बहुतेक वेळा जाळले जातात किंवा वाया जातात. जर या अवशेषांचा योग्य पद्धतीने बापर केला गेला, तर ते मोठ्या प्रमाणावर बायोगॅस उत्पादनासाठी वापरता येऊ शकतात.
- भारतात दरवर्षी सुमारे ३५० दशलक्ष टन फळे आणि भाजीपाला उत्पादन होते. वाहतूक, साठवणूक आणि वितरण व्यवस्थेतील त्रुटींमुळे यापैकी ३० टक्के उत्पादन खराब होते किंवा वाया जाते. हा सगळा कचरा योग्य पद्धतीने गोळा करून बायोगॅस प्रकल्पांमध्ये वापरणे शक्य आहे.
- हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, औद्योगिक केंटीन, मोठ्या टाउनशिपमध्ये दररोज प्रचंड प्रमाणात अञ्कचरा तयार होतो. या कचऱ्याचा ५० टक्के भाग सेंद्रिय असतो. अनेक शहरांमध्ये हा कचरा थेट लैंडफिलमध्ये टाकला जातो. त्यामुळे मिथेन वायू वातावरणात जातो आणि प्रदूषण वाढते. हा कचरा बायोगॅस प्रकल्पांमध्ये वापरला गेला, कचरा व्यवस्थापन करणे शक्य आहे.

### ग्रामीण अर्थव्यवस्था आणि ऊर्जा पिके

- नेपिआर गवत जलद गरेर दे असल्यामुळे बायोगैस उत्पादनासाठी आदर्श मानते प्रति एकर मोठ्या प्रमाणात वैवभार मिजतो. यामधील सेंद्रिय पदार्थचि प्रमाण जास्त असल्यामुळे मिथेन उत्पादन चांगले होते. नेपिअर गवत लागवडीमुळे शेतकऱ्यांना एकरी साधारण ७०,०००,००० रुपये वार्षिक शाश्वत उत्पतिएखाद्या प्रकल्पाला दररोज मोठ्या प्रमाणावकका मात सागतो. परिसरातील शेतकरी ऊर्जा पिकांची लागवड करून हा कच्चा माल पुरवठा करतील.
- साखर कारखान्यात साखर उत्पादन प्रक्रियेम्यान बाँस, मोलॅसिस आणि प्रेमीप्रमुखाने तयार होतात, पापैकी प्रेसमड हा सेंद्रिय कबरा असून तो बायो-सीबीजी आणि बायोगॅस निर्मितीसाठी अत्यंत उपयुक्त कन्या मात आहे. भारतात दावों सुमारे १२ दशलक्ष टन प्रेसमड तयार होते, त्यापैकी सुमारे बार दशलक्ष टन प्रेसमड महाराष्ट्रात उपलब्धा होते. साधारणतः एक टन प्रेसमापासूर घनमीटर बायोगॅस तयार होऊ शकतो, याचे सुर्याकरण करून सीबीजी क्यार करता येते. त्यामुळे मह उपलब्ध असलेल्या प्रेमचा उपयोग केल्यास अनेक बायोसीएनजी प्रकल्प उभारणे शक्य आहे. पालून हजारो टन स्वच्छ इंधन उत्पादन होऊ शकते. यामुळे सर उद्योगातील कचऱ्याचा प्रभावी वापर होईल भागात रोजगारनिर्मिती चाल सेलि होईल आणि आपातीत नैसर्गिक वायूवरील अवलंबित्व कमी करण्यास मोठी मदत होईल.
- आज भारतातील वीजनिर्मितीचा मोठा हिस्सा हो कोळसा आधारित प्रकल्पांवर अवलंबून आहे.त्यामुळे इलो चाविसाठी वापरली जाणारी वीज कर कोजा प्रकल्पातूर येत असेल, तर कार्बन उत्सर्जनका एका ठिकाणाहून दुसन्या विकाणी हलते. मासाती बायोग सौर ऊर्जा आणि इतर हरित खोतांवर आधारित शी धार्जिण स्टेशन विकसित करणे अत्यंत महत्वाचे आहे.

### स्थानिक अर्थव्यवस्थेचे प्रभावी मॉडेल

ग्रामीण भागात स्वच्छ ऊर्जा, कचरा व्यवस्थापन आणि स्थानिक अर्थव्यवस्था यांना एकत्र जोडणारे एक प्रभावी मॉडल म्हणजे बायोगॅस प्लांट बायोगॅसवर आधारित विद्युत निर्मिती, बायो सीएनजी उत्पादन आणि बायोगॅसवर आधारित इव्ही चार्जिंग स्टेशन यांचे एकात्मिक ऊर्जा मॉडेल आहे. या प्रणालीमध्ये शेती, पशुपालन, कचरा व्यवस्थापन आणि वाहतूक व्यवस्था यांचा परस्पर संबंध निर्माण होतो. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेले सेंद्रिय कच्चे पदार्थ योग्य पद्धतीने वापरले तर त्यापासून स्वच्छ ऊर्जा तयार करून स्थानिक पातळीवर ऊर्जा स्वावलंबन साधता येते. या प्रक्रियेची सुरुवात कच्च्या मालाच्या संकलनापासून होते आणि शेवटी ऊर्जा उत्पादन, वाहतूक आणि सेंद्रिय खत निर्मितीपर्यंत एक संपूर्ण सर्क्युलर प्रणाली तयार होते.

- शेतीमधून निर्माण होणारा पेंढा, मका अवशेष, ऊस पाचट, कापूस किंवा इतर कृषी अवशेष हे बायोगॅस निर्मितीसाठी उपयुक्त असतात. त्याचप्रमाणे गायी-म्हशींचे शेण आणि पोल्ट्री लिटर उत्कृष्ट कच्चा माल आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील हटिल, कैंटीन, भाजी मंडई आणि घरगुती अन्नकचरा देखील मोठ्या प्रमाणावर बायोगॅस निर्मितीसाठी वापरता येतो, काही ठिकाणी नेपिअर गवत किंवा मका सायलेज बायोगॅस प्रकल्पांसाठी उपयुक्त आहे. हे घटक बायोगॅस प्रकल्पात आणले जातात. कचऱ्याचे संकलन करताना ओला आणि कोरडा कचरा वेगळा करणे अत्यंत महत्त्वाचे असते, कारण बायोगॅस निर्मितीसाठी केवळ सेंद्रिय कचरा वापरला जातो.
- बायोगॅस प्लांटमध्ये कच्चा माल घेट वापरत नाहीत. सर्वप्रथम कचऱ्याचे वर्गीकरण करून त्यातील प्लास्टिक, काच, धातू काढले जातात. त्यानंतर सेंद्रिय घटक श्रेडिंग किंवा क्रशिंग मशिनद्वारे लहान तुकड्यांमध्ये कापले जातात, ज्यामुळे सूक्ष्मजीवांना त्या पदार्थांचे विघटन करणे सोपे जाते. या कच्च्या पदार्थामध्ये पाणी मिसळून स्लरी तयार केली जाते. यानंतर स्लरी बायोगॅस प्लांटमधील डायजेस्टर टँकमध्ये टाकली जाते. या टाकीत ऑक्सिजन नसलेल्या वातावरणात सूक्ष्मजीव सेंद्रिय पदार्थांचे विघटन करतात. या जैविक प्रक्रियेत सेंद्रिय पदार्थांचे विविध टप्प्यांमध्ये विघटन होते आणि शेवटी मिथेनयुक्त गॅस तयार होतो. या प्रक्रियेस तीस ते चाळीस दिवसांचा कालावधी लागतो. या काळात सूक्ष्मजीव कार्बोहायड्रेट, प्रोटिन आणि इतर सेंद्रयि घटकांचे विघटन करून मिथेन आणि कार्बन डायऑक्साइड तयार करतात. परिणामी तयार होणारा बायोगॅस हा मुख्यतः मिथेन आणि कार्बन डायऑक्साइड यांचे मिश्रण असतो. याशिवाय या प्रक्रियेनंतर उरलेला पदार्थ म्हणजे डायजेस्टेड स्लरी ही उत्कृष्ट सेंद्रिय खत म्हणून वापरता येते.
- डायजेस्टरमध्ये तयार झालेला बायोगॅस प्रथम गॅस होल्डरमध्ये साठवला जातो. कच्च्या बायोगॅसमध्ये काही अशुद्ध घटक असतात, जसे की कार्बन डायऑक्साइड, हायड्रोजन सल्फाइड आणि पाण्याची वाफ, या अशुद्ध घटकांमुळे गॅसची गुणवत्ता कमी होते आणि उपकरणांवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे बायोगॅस शुद्धीकरणाची प्रक्रिया केली जाते. या प्रक्रियेत प्रथम हायड्रोजन सल्फाइड काढून टाकण्यासाठी विशेष फिल्टर किंवा स्क्रबर वापरले जातात. त्यानंतर गॅसमधील ओलावा काढण्यासाठी कुलिंग आणि मॉइश्चर ट्रॅप प्रणाली वापरली जाते. पुढील टप्प्यात कार्बन डायऑक्साईड वेगळे करण्यासाठी विविध तांत्रिक पद्धती वापरल्या जातात, जसे की प्रेशर स्विंग अडसॉर्प्शन, वॉटर स्क्रबिंग किंवा मेम्ब्रेन सेपरेशन, या प्रक्रियेनंतर गॅसमधील मिथेनचे प्रमाण वाढून सुमारे नव्वद ते पंच्याण्णव टक्क्यांपर्यंत पोहोचते.
- शुद्ध केलेल्या बायोगॅसपासून कॉम्प्रेस्ड बायोगॅस तयार केला जातो. साधारणपणे दोनशे ते अडीचशे बार दाबाने गॅस संकुचित केला जातो आणि सिलिंडर किंवा कॅस्केडमध्ये साठवला जातो. तयार झालेला सीबीजी हा गुणधर्मांच्यादृष्टीने सीएनजी सारखाच असतो आणि तो वाहनांसाठी इंधन म्हणून वापरता येतो. बस, ट्रक, ट्रॅक्टर आणि इतर वाहने सीबीजी वर चालवता येतात. त्यामुळे जीवाश्म इंधनावर अवलंबित्व कमी होते आणि कार्बन उत्सर्जनातही घट होते.
- बायोगॅस गॅस इंधन इंजिन जनरेटरमध्ये वापरून वीज तयार केली जाते. या प्रक्रियेत बायोगॅस गैस इंजिनमध्ये जाळला जातो आणि त्यातून तयार होणारी यांत्रिक ऊर्जा जनरेटरद्वारे विद्युत ऊर्जेत रूपांतरित केली जाते. तयार झालेली वीज डेअरी, पोल्ट्री मध्ये १० एचपी ते २०० एचपी क्षमता असलेली विद्युत उपकरणे चालवण्यासाठी, ग्रामीण वीजपुरवठ्यासाठी किंवा इव्ही चार्जिंग स्टेशनसाठी वापरली जाऊ शकते. त्यामुळे स्थानिक पातळीवरच ऊर्जा निर्मिती आणि वापर शक्य होतो. गाव पातळीवर आपण आयात केलेल्या सीएनजीला आपण पर्याय म्हणून बायो-सीएनजो किंवा कॉम्प्रेस्ड बायोगॅस चा वापर करू शकतो.
- डायजेस्टेड स्लरी ही अत्यंत उपयुक्त सेंद्रिय खत असते. त्यामुळे मातीची सुपीकता वाढते आणि रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी होते.

**गजानन पाटील**
मो.९९७००५८३७२

## संवाद

### गॅसटंचाईमुळे स्वयंपाकाचे नियोजन कोलमडले

अमेरिका, इस्रायल आणि इराणच्या युद्धामुळे उद्भवलेल्या आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे भारतात होणाऱ्या इंधन, कच्च्या तेलाच्या आणि गॅस पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. परिणामी देशातील एकूण गॅस पुरवठ्यापैकी ३० टक्के पुरवठा विस्कळीत झाला असून गेल्या काही दिवसांत राज्यातील गॅसचा पुरवठा घटल्याने राज्यात अनेक ठिकाणी घरगुती गॅसची टंचाई निर्माण झाली आहे. गॅस तुटवड्यामुळे राज्यात मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजी नगर, ठाणे, यासारख्या महत्त्वाच्या शहरांमध्ये गॅस सिलिंडरसाठी नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे वृत्तवाहिन्यांमधून दिसून येत आहे. गॅसटंचाई आणि त्यातून निर्माण झालेल्या गोंधळामुळे आणि वेळेवर सिलिंडर न मिळाल्यामुळे घरातील स्वयंपाकाचे नियोजन पूर्णपणे कोलमडले असून गृहिणींसाठी ती एक मोठी डोकेदुखी ठरत आहे. दुसरीकडे केंद्र सरकारने देशात इंधन आणि गॅसचा तुटवडा नसल्याचे जाहीर केले आहे. तसेच देशात जीवनाश्यक वस्तू कायदा 'एस्मा' लागू केला आहे आणि परिस्थिती लवकरच निवळेल आणि पूर्वपदावर येईल असा दिलासा जनतेला दिला आहे. मात्र गॅस सिलिंडरच्या तुटवड्यामुळे राज्यात सध्या जे गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे ते निवळण्यासाठी आणखी काही काळ वाट पाहावी लागणार आहे.

**-प्रदीप मोरे**

### महाराष्ट्राचे कर्ज ११ लाख कोटींवर

राज्याचा २०२६-२०२७ चा अर्थसंकल्प नुकताच विधानसभेत सादर करण्यात आला. त्यात एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. २०२१-२२ मध्ये महाराष्ट्रावर केवळ ५.७६ लाख कोटीचे कर्ज होते. ते वाढत वाढत आता २०२६ मध्ये तब्बल ११ लाख कोटी रुपयांहून अधिक झाले आहे. या कर्जामुळे आपण विकासावर जास्त खर्च करू शकत नाही हे वास्तव आहे. लोकोपयोगी योजना जाहीर करून लोकप्रियता मिळविणे व निवडणुका जिंकणे हेच काम आता देशातील सर्वच पक्ष करत आहेत. कालच पंजाबमध्ये लाडकी बहीण सारखी एक योजना जाहीर करण्यात आली त्यानुसार त्या राज्यातील महिलांना दरमहा रक्कम मिळणार आहे. पंजाब मध्ये निवडणूक लवकरच होणार आहेत त्याचे हे सूचक आहे काही दिवसापूर्वी सुप्रीम कोर्टाने या लोकप्रियतेच्या योजनेवर टीका केली होती. देशातील अनेक राज्ये निवडणुकांआगोदर लोकप्रियतेच्या योजना जाहीर करून मते मिळवीत आहेत. साहजिकच त्यामुळे राज्यावर कर्जाचा बोजा वाढत आहे. अशा लोकप्रिय योजनेमुळे लोकांची क्रयशक्ती कमी होत चालली आहे. विधानसभेत जयंत पाटील यांनी राज्याच्या कर्जावर टीका केली आहे. एकूणच हे कर्ज कसे कमी होणार? त्यासाठी सरकारची काय योजना आहे? हे प्रश्न सामान्य माणसाला पडत आहेत.

**शांताराम वाघ** पुणे

### स्फोटक कंपन्यांमधील सुरक्षा?

नुकतेच नागपूरजवळील राऊळगावात दारुगोळा बनवणाऱ्या कंपनीत झालेल्या सखी स्फोटाने अवघा महाराष्ट्र हादरून गेला गेला आहे. नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यातील एस बी एल एनर्जी लिमिटेड या कंपनीचा मालक संजय चौधरी आणि इतर संचालकांना या घटनेसाठी जबाबदार धरून अटक करण्यात आली. तसेच त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. मृतांच्या नातेवाईकांना सरकारकडून आर्थिक मदत देण्यात आली. पण कंपनी चालकांच्या अक्षम्य हलगर्जीपणामुळे बळी गेलेले हे तेवीस जीव पैशाने कधीही परत येणार नाहीत.तामिळनाडू राज्यातील शिवकाशी हे शहर फटाक्यांच्या उत्पादनासाठी देशात प्रसिद्ध आहे. तिथेही दरवर्षी अशा दुर्घटना घडत असतात. त्याबाबत काळजी घेण्याची तसेच आवश्यक उपाययोजना कारण्याबद्दलचे कोणी पाऊल उचलत नाही. राऊळगावातील या घटनेनंतरही प्रशासन अलर्ट होऊन काम करणार आहे का?घातक स्फोटके बनविणाऱ्या या कारखान्यात सुरक्षेचे किंवा वैद्यकीय उपचार, साधने, उपकरणे यांची काहीच व्यवस्था नव्हती. याचाच अर्थ नफेखोर कंपन्या केवळ कमाईचाच विचार करीत आहेत.

**प्रा. मधुकर चुटे**
मो.९४२०५६६४०४

### 'त्या'गावांची नावे केव्हा बदलणार ?

'छावा' चित्रपटाच्या माध्यमातून क्रूरकर्मा औरंगजेबाचा खरा चेहरा जगासमोर आला आहे. त्याची धर्मांधता आणि क्रूरता या चित्रपटाच्या माध्यमातून कोट्यवधी जनतेने पाहिली त्यामुळे त्याच्याविरोधात देशभरात जनक्षोभ उसळला आहे. स्वराज्याचे धाकले धनी स्वराज्यरक्षक धर्मवीर संभाजी महाराज यांची ज्या पद्धतीने हाल हाल करून हत्या करण्यात आली ते पाहता आजही या क्रूरकर्माचा अशाप्रकारे गौरव होत असेल तर ते भारतासाठी लज्जास्पद आहे. इतिहासकार आणि जाणकार यांच्या मते क्रूरकर्मा औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांचे जे हाल केले त्यातील केवळ ५ टक्केच छावा चित्रपटात दाखवण्यात आले आहेत यावरून त्याचे कौर्य लक्षात येते. शहरे, गावे, वसाहती आणि मार्गांना या क्रूरकर्माची नावे आजही शाबूत असणे म्हणजे त्याचे उदात्तीकरणच असून ती त्वरित बदलली पाहिजेत. महाराष्ट्रातील औरंगाबाद शहराचे नाव बदलून महाराष्ट्र सरकारने ऐतिहासिक निर्णय घेतला आता केंद्र सरकारने ही उर्वरित नावे बदलण्यासाठी पुढाकार घेऊन औरंगजेबाचे उदात्तीकरण थांबवावे!

**जगन घाणेकर**

### आंतरधर्मीय विवाह आणि वास्तव

नुकतीच समोर आलेली मीरा-भाईंदरमधील घटना.ती अनेक तरुण मुलींसाठी धोक्याची घंटा आहे. २०१६ मध्ये एका सौंदर्य स्पर्धेत सहभागी झालेल्या तरुणीने, कुटुंबाचा विरोध झुगारून एका उद्योजकाशी आंतरधर्मीय प्रेमविवाह केला. मात्र, लग्नानंतर धर्मांतर, चार अपत्ये आणि त्यानंतर सुरू झालेला असह्य शारीरिक व मानसिक छळ हा प्रवास अत्यंत विदारक आहे. अखेर तिने 'घरवापसी' करत आपली चूक जाहीरपणे कबूल केली आहे.मैत्री आणि प्रेमाच्या सुरुवातीच्या काळात सर्व काही विलोभनीय वाटते. लग्नानंतर जेव्हा धार्मिक कट्टरता, भिन्न रीतिरिवाज आणि विचारसरणीतील फरक समोर येतो, तेव्हा स्वातंत्र्याचा संकोच सुरू होतो. आपल्या संस्कृतीत स्त्रियांना जे स्वातंत्र्य मिळते, ते इतर अनेक ठिकाणी नाकारले जाते, हे या घटनेवरून स्पष्ट होते.'प्रेम आंधळे असावे, पण डोके शाबूत असावे,' हा मंत्र आजच्या काळात सर्वात महत्त्वाचा आहे. कोणावरही विश्वास ठेवण्यापूर्वी त्या व्यक्तीची पार्श्वभूमी, उद्देश आणि संस्कार डोळसपणे तपासा. आई-वडिलांचा अनुभव आणि त्यांचा विरोध हा तुमच्या सुखा साठीच असतो, हे विसरू नका. लक्षात ठेवा, वाघिणी सारखे जगण्याचे स्वातंत्र्य आपल्या संस्कृतीने दिले आहे; ते स्वातंत्र्य एखाद्या 'सोनेरी पिंजऱ्यात' कैद होऊ देऊ नका. स्वतःच्या अस्मितेचा आणि धर्माचा बळी देऊन मिळवलेले प्रेम कधीच सुखदायक नसते. अनुभवातून शिकण्यापेक्षा इतरांच्या अनुभवावरून सावध होणे, हीच खरी बुद्धिमत्ता आहे.

**अविनाश देशपांडे**

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सखा

# वादग्रस्त टोलनाक्याचे पोझिशनच चुकीचे; जिल्हाधिका-यांच्या बैठकीत उघड

## आंदोलनानंतर प्रशासनाची दखल, प्रस्ताव एनएचएआयकडे पाठविणार



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - दारव्हा ते कारंजा या मार्गावरील भांडेगाव–भुलाई दरम्यान उभारण्यात आलेल्या वादग्रस्त टोलनाक्याबाबत अखेर प्रशासनाला दखल घ्यावी लागली. काँग्रेससह विविध पक्षांच्या आक्रमक आंदोलनानंतर शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत या टोलनाक्याचे स्थान (पोझिशन) चुकीचे असल्याची बाब समोर आली.

दारव्हा–कारंजा मार्गावरील भुलाई ते भांडेगाव दरम्यान अकोला येथील केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिनस्त राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत टोलनाका उभारण्यात आला आहे. मात्र संबंधित रस्त्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नसताना येथून जाणाऱ्या वाहनांकडून टोलवसुली सुरू करण्यात आली होती. शिवाय टोल नाक्यावर आवश्यक सुविधा नसतानाही शेतकऱ्यांच्या मालवाहतूक वाहनांकडून अवास्तव टोल आकारला जात असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांकडून सातत्याने केली जात होती.या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे जिल्हा परिषद माजी अध्यक्ष व जिल्हा उपाध्यक्ष राहुल ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस, प्रहार जनशक्ती पक्ष व इतर मित्रपक्षांच्या पदाधिकारी–कार्यकर्त्यांनी ११ मार्च रोजी टोलनाक्यावर आंदोलन करत तोडफोड केली होती. या घटनेची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी विकास मीना यांनी शुक्रवारी संबंधित अधिकाऱ्यांची आणि आंदोलकांची संयुक्त बैठक बोलावली. या बैठकीला अपर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, अपर पोलीस अधीक्षक, दारव्हा उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पोलिस अधिकारी तसेच राहुल ठाकरे, प्रकाश नवरंगे, सैय्यद फारूक, संतोष ठाकरे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत राहुल ठाकरे यांनी टोलनाक्याबाबतच्या त्रुटी आणि नागरिकांच्या अडचणी प्रभावीपणे मांडल्या. दरम्यान निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी सांगितले की, या टोलनाक्याचे स्थान चुकीचे असल्याची बाब निदर्शनास आली असून यासंदर्भातील प्रस्ताव अकोला येथील सेंट्रल पीडब्ल्यूडी कार्यालयामार्फत राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे पाठविण्यात येणार आहे. तोपर्यंत व्यावसायिक वाहनांव्यतिरिक्त इतर वाहनांकडून टोल वसुली थांबविण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. दरम्यान, संबंधित विभागाने टोलनाका बंद केला नाही तर पुन्हा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा राहुल ठाकरे यांनी दिला आहे.

# पुसद येथे अवैध गॅस सिलेंडर साठा जप्त

## २.५ लाखांचा मुद्देमाल ताब्यात



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - पुसद शहरातील नूर कॉलनी परिसरात अवैधरित्या घरात गॅस सिलेंडर साठवून काळ्या बाजारात विक्री करणाऱ्या इसमावर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत सुमारे २ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

यवतमाळ जिल्ह्यात अवैध धंदे, गॅस सिलेंडर साठवणूक व तस्करीवर आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ पथकाने ही कारवाई केली. १३ मार्च रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पुसद येथील नूर कॉलनी, सुभाष वार्ड परिसरात राहणारा आरिफ मोहम्मद कच्ची हा अवैध गॅस सिलेंडर साठवून जादा दराने विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांसह संबंधित ठिकाणी छापा टाकला. तपासणीदरम्यान भारत, एचपी व इंडेन कंपनीचे एकूण ४० गॅस सिलेंडर तसेच २३ रेग्युलेटर असा मोठा साठा आढळून आला. या सर्व मुद्देमालाची किंमत सुमारे २.५ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले. याप्रकरणी आरिफ मोहम्मद कच्ची (रा. नूर कॉलनी, पुसद) याच्याविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियमांतर्गत पुसद शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बी. जे. यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

# बोरगडी येथील दलित वस्तीच्या जमिनीवर जमीनदाराचे अतिक्रम

## ग्रामस्थाचे एसडीओ यांना निवेदन; न्याय न मिळाल्यास आत्मदहनाचा इशारा!



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - तालुक्यातील मौजा बोरगडी (जुनी) येथील दलित वस्तीतील ग्रामस्थांनी स्थानिक जमीनदारांकडून सरकारी जमिनीवर अतिक्रमण करून ती बळकावण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. या संदर्भात शेकडो महिला-पुरुष ग्रामस्थांनी आज एकत्र येत आज दि.१३ मार्च रोजी उपविभागीय अधिकारी पुसद यांना निवेदन सादर केले. निवेदनात ग्रामस्थांनी नमूद केले आहे की, सन १९८२ मध्ये धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी तत्कालीन प्रशासनाने शेत सर्वे क्रमांक १ व ३४ दरम्यान बोरगडी जुनी वस्तीचे पुनर्निर्माण केले व आम्हाला तिथे वसविले होते. या ठिकाणी अंदाजे दीड एकर गावठाण,५६ आर स्मशानभूमी (सर्वे नं. ३५), तसेच सुमारे ६६ फूट रुंदीचा पांदण रस्ता आणि इतर सरकारी जागा मिळून सुमारे चार एकर जमीन आहे.

सदर जमीन शहरालगत असल्यामुळे सध्या तिची किंमत कोट्यवधी रुपयांची आहे. त्यामुळे काही बलाढ्य जमीनदारांनी नियोजित पणे अतिक्रमण करून जमीन नागरून रस्ते बंद करणे,आया बहिणी सरकारी जागेत संडासला गेल्यास माणसांकडून खुर्ची टाकून लाईट लावून बसण, घरकुल बांधकामांना अडथळे निर्माण करणे, तसेच ग्रामस्थांना मानसिक व सामाजिक त्रास देण्याचे प्रकार सुरू असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या त्रासामुळे ग्रामस्थांनी गाव सोडावे आणि जमीन त्यांच्या ताब्यात जावी,असा हेतू असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. ग्रामस्थांनी उपविभागीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून अतिक्रमण हटवावे, बंद झालेले रस्ते मोकळे करावेत, गावठाण, गायरान व स्मशानभूमीची जागा स्पष्ट करावी तसेच ग्रामपंचायतीला कायमस्वरूपी डिमार्केशन करण्याचे आदेश द्यावेत,अशी मागणी केली आहे. तसेच घरकुल बांधकामे पुन्हा सुरू होण्यासाठी प्रशासनाने मदत करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, दोन वर्षांपूर्वी याठिकाणी परिसरात याच कारणावरून जातीय तणाव निर्माण होऊन कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता व त्यावेळी गुन्हेही दाखल झाल्याचे ग्रामस्थांनी निवेदनात नमूद केले आहे. त्यावेळी प्रत्यक्ष जागेची मोजणी झाली होती आता पुन्हा करण्याची गरज असल्यास आम्ही वर्गणी करून पैसे देऊ असे निवेदनात म्हटले आहे. प्रशासनाने १९ मार्च २०२६ पर्यंत प्रत्यक्ष पाहणी करून योग्य तो निर्णय घ्यावा,अन्यथा त्रस्त झालेल्या ग्रामस्थांना उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर सामूहिक आत्मदहन करण्याशिवाय पर्याय उरणार नाही, असा नम्रतापूर्वक निर्वाणीचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती महसूल मंत्री, जिल्हाधिकारी यवतमाळ, तहसीलदार पुसद तसेच शहर पोलीस स्टेशन पुसद यांना देण्यात आल्या आहेत. निवेदन सादर करताना बोरगडी येथील शेकडो महिला व पुरुष ग्रामस्थ उपस्थित होते.पांदण रस्ते आणि सरकारी जागा मोकळ्या करण्याचा सध्या सरकारचा उपक्रम चालू आहे.परंतु कायदा व संस्थेचा प्रश्न निर्माण होणे आधी सदर विषयाबाबत कर्तव्यदक्ष उपविभागीय अधिकारी यावर काय निर्णय घेतात याकडे सर्व तालुक्याचे लक्ष लागले आहे.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/२२०/२०२५
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- १२/०३/२०२६

## जाहीरनामा

उपरोक्त विषयाचे संदर्भीय शासन निर्णय व पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, अर्जदार **शेख जब्बार शेख सत्तार रा. उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ** यांनी अर्ज सादर केला की, त्यांचा स्व:ताचा जन्म दिनांक ०१/०४/१९६८ रोजी मौजा उमरखेड येथे झाला आहे. जन्म अनुउपलब्धता उपलब्ध नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना **जन्मनोंद** आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक २५/०३/२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कायालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा.
तालुका दंडाधिकारी
उमरखेड

# महागावमध्ये सार्वजनिक ओपन स्पेसवर अतिक्रमणाचा प्रयण्न; नागरिकांची कारवाईची मागणी



**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - शहरातील वॉर्ड क्रमांक १६ मधील नगरपंचायतीच्या मालकीच्या सार्वजनिक खुल्या जागेवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न झाल्याची घटना समोर आल्याने परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या प्रकरणी स्थानिक महिला व नागरिकांनी स्वाक्षरी मोहिम राबवत नगराध्यक्ष रंजना दीपक आडे, उपनगराध्यक्ष शाखा भरवाडे तसेच मुख्याधिकारी अजय कुरवाडे यांना निवेदन देऊन तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

नागरिकांनी दिलेल्या निवेदनानुसार, वॉर्ड क्र. १६ मध्ये नगरपंचायतीच्या नोंदीत गार्डनसाठी राखीव असलेली सार्वजनिक ओपन स्पेस आहे. या जागेला लागून जामा मशिद असल्याने ११ मार्च २०२६ रोजी दुपारच्या सुमारास काही स्थानिकांनी ही जागा धार्मिक स्थळाची असल्याचा दावा करत त्यावर ताबा मिळवण्याचा प्रयत्न केल्याचे सांगण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र स्थानिक नागरिक आणि प्रशासनाच्या समन्वयामुळे परिस्थिती नियंत्रणात राहिली.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम (एमआरटीपी ॲक्ट) नुसार 'ओपन स्पेस' ही सार्वजनिक मालमत्ता असून ती कोणत्याही व्यक्ती किंवा धार्मिक संस्थेच्या खाजगी वापरासाठी देता येत नाही. त्यामुळे संबंधित जागेची तात्काळ मोजणी करून हद्द निश्चित करावी, तसेच त्या ठिकाणी "नगरपंचायत महागाव सार्वजनिक मालमत्ता" असा फलक लावून संरक्षण भिंत किंवा कुंपण उभारावे, अशी मागणी करण्यात आली आहे. भविष्यात शहरात कोणताही जातीय वाद निर्माण होऊ नये आणि सामाजिक सलोखा कायम राहावा यासाठी दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करावी, अशीही मागणी नागरिकांनी केली आहे. या निवेदनावर नगरसेवक शैलेश कोपरकर यांच्यासह वॉर्ड क्र. १६ मधील शेकडो महिला व नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, तहसीलदार व महागाव पोलीस स्टेशनला देण्यात आल्या आहेत.

# मोरचंडीतील खचकड परिवाराचा नवा पायंडा!

## बंजारा समाजात वधूपित्याला मदतीची अनोखी परंपरा



**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - महाराष्ट्रातील विविध समाजांमध्ये विवाहासंबंधी वेगवेगळ्या चालीरीती व परंपरा आढळतात. उमरखेड तालुक्यातील बंजारा समाजातही पारंपरिक रुढी प्रचलित असल्या तरी मोरचंडी येथील खचकड परिवाराने विवाह सोहळ्यातून समाजाला एक सकारात्मक संदेश देत नवा पायंडा पाडला आहे. विवाहाच्या निमित्ताने वधूपित्याला आर्थिक मदत करण्याची अनोखी पद्धत येथे रूढ होत असल्याचे पाहायला मिळत आहे.

उमरखेड तालुक्यात बंजारा समाजाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असून हा समाज प्रामुख्याने तांडे व खेड्यापाड्यांवर वास्तव्यास आहे. पारंपरिकरित्या पशुपालन हा त्यांचा प्रमुख व्यवसाय राहिला असून शिक्षणाचा प्रसार अद्याप मर्यादित आहे. अशा परिस्थितीत विवाहसमारंभातील खर्च कमी करण्यासाठी समाजबांधवांकडून वधूपित्याला भेटवस्तूऐवजी रोख रक्कम देण्याची प्रथा रूढ झाली आहे. त्यामुळे विवाहातील मोठा आर्थिक भार समाजातील नातेवाईक व बांधव मिळून उचलतात आणि वधूपित्याला दिलासा मिळतो.

दरम्यान, मोरचंडी येथील सेवानिवृत्त शिक्षक रावसिंग खचकड यांनी आपल्या मुलाच्या विवाहानिमित्त आणखी एक आदर्श पुढे ठेवला. आर्थिक परिस्थिती चांगली असूनही शहरात मोठा स्वागत समारंभ न करता त्यांनी स्वतःच्या गावातच कार्यक्रम आयोजित केला. मुलगा व मुलगी दोघेही डॉक्टर झाल्याचा अभिमान असतानाही त्यांनी आपल्या जन्मगावातील नागरिकांसोबत हा आनंद साजरा करण्याचा निर्णय घेतला. या कार्यक्रमात संपूर्ण गावासाठी चुलबंद जेवणाचे आयोजन करण्यात आले. दुर्गम भागातील मोरचंडी गावात रस्त्यांची सोय मर्यादित असतानाही गावकऱ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. खचकड परिवाराच्या या उपक्रमामुळे बंजारा समाजात सामाजिक एकोप्याचा व परस्पर सहकार्याचा आदर्श निर्माण झाला असल्याची भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/२००/२०२५
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- २६/०२/२०२६

## जाहीरनामा

उपरोक्त विषयाचे संदर्भीय शासन निर्णय व पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, अर्जदार **शेख तसलीम शेख शमशु रा. उमरखेड यांनी** त्यांचे मुलाचे नामे शेख तौसीफ शेख तसलीम मौजा उमरखेड **ता. उमरखेड येथे दिनांक** १५.०१.२००५ रोजी झालेला आहे. जन्म अनुउपलब्धता उपलब्ध नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना **जन्मनोंद** आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक १०/०३/२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कायालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर करावयात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा.
तालुका दंडाधिकारी
उमरखेड

# विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - नगर परिषद महिला व बालकल्याण समितीच्या वतीने ८ व ९ मार्च २०२६ रोजी स्थानिक शहीद नागेश्वर जिद्देवार सांस्कृतिक भवन येथे "उत्सव आपुलकीचा" हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. शहरातील महिला व युवतींसाठी आयोजित या कार्यक्रमात विविध स्पर्धा व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्ष आतिश लक्ष्मण बोरेले व उपनगराध्यक्ष अतिश तानाजी चव्हाण यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी अर्चनाताई राजू तोडसाम होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रा. अन्नपूर्णा चौधरी व डॉ. सुप्रभा यादगीरवार उपस्थित होत्या. यावेळी नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांनी जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देत शहरात महिलांसाठी योगा भवन उभारण्याचे आश्वासन दिले. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व रोपटे देऊन सन्मान करण्यात आला. योग शिक्षिका मंदा वाढई, सामाजिक कार्यकर्त्या वाणी तोडसे, क्रीडा क्षेत्रातील भूमी गेडाम, इस्रो परीक्षा पात्र दुर्वा बानाईत, सेवा क्षेत्रातील प्रेमा यादव, भाजी विक्रेती माला कशाळकर, हार विक्रेती काशीबाई किरमे आदींसह अनेक महिलांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमात रांगोळी, समूह भजन व समूह नृत्य स्पर्धांसह आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये शहरातील ३०० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन मुख्याधिकारी पंकज गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषदेच्या कर्मचारी व शहरस्तरीय संघाच्या सदस्यांनी केले.

# दिग्रस शहरात घरगुती गॅस सिलेंडरचा अवैध वापर!



**जनमाध्यम प्रतिनिधी**

दिग्रस : शहरात घरगुती गॅस सिलेंडरचा अवैध वापर वाढल्याने सिलेंडरचा कृत्रिम तुटवडा निर्माण झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. काही ठिकाणी घरगुती सिलेंडरचा वापर तीनचाकी व चारचाकी वाहनांमध्ये तसेच हॉटेल व ढाब्यांमध्ये होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

**कृत्रिम तुटवड्याची नागरिकांत चर्चा**

घरगुती सिलेंडर कमी दरात उपलब्ध असल्यामुळे अनेक व्यावसायिकांकडून त्याचाच वापर केला जात असल्याचे बोलले जात आहे. परिणामी सर्वसामान्य नागरिकांना वेळेवर सिलेंडर मिळण्यात अडचणी निर्माण होत आहेत. काही ठिकाणी सिलेंडरचा काळाबाजार होत असल्याचीही चर्चा आहे. शहरात हॉटेल व ढाब्यांची संख्या मोठी असताना व्यावसायिक सिलेंडरचा वापर मात्र अत्यल्प असल्याचे चित्र दिसून येते. त्यामुळे घरगुती सिलेंडर व्यावसायिक कामांसाठी वळवले जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकारामुळे गृहिणींना मोठा त्रास सहन करावा लागत असून प्रशासनाने याकडे लक्ष देऊन चौकशी करावी व दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# राजुरवाडी शाळेत माजी विद्यार्थींनी वैष्णवी किनाकेचा सत्कार



**जनमाध्यम प्रतिनिधी**

घाटंजी - जि.प. उच्च प्राथमिक शाळेत सन्मान कर्तुत्वाचा उपक्रमांतर्गत राजूरवाडी गावाचे भूषण ठरलेली विद्यार्थिनी कु. वैष्णवी सरिता विष्णू किनाके हिचा सत्कार करण्यात आला.वैष्णवीने अत्यंत खडतर असे इंडो-तिब्बेत सीमा पोलीस फोर्स निमसेनेचे प्रशिक्षण नुकतेच पूर्ण करून गावात आली.

पंचक्रोशित तिच्या यशाचे कौतुक होत आहे. जि.प. शाळा राजुरवाडी येथे गौरव समारंभ आयोजित करण्यात आला. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दीपक तेलतुमडे माजी अध्यक्ष विनोद मडावी, शंकर येलादी, मुकेश हांडे, उमेश कुडमते, सौरभ पाटील भोयर, लक्ष्मण उईके, मुख्याध्यापक राजेंद्र गिरी व सर्व सदस्य उपस्थित होते. ग्रामिण भागातील खडतर प्रवास करून यशाला गवसणी घालणाऱ्या वैष्णवीचे अभिनंदन करून भावी कारकिर्दीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. आपल्या मनोगतात वैष्णवीने विद्यार्थीना मार्गदर्शन करतांना अभ्यासासोबतच व्यायाम देखील महत्वाचे असल्याचे सांगितले. शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी वैष्णवीचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन अभ्यासासह नियमित व्यायाम करावा.

असे मान्यवरांनी विचार मांडले. वैष्णवीने आपल्या आवडत्या शाळेसाठी १० हजार रुपयाचे कपाट गिफ्ट देऊन शाळेप्रती आपली सामाजिक बांधिलकी असल्याचे सांगितले. कार्यक्रमाची प्रस्तावना मुख्याध्यापक राजेंद्र गिरी सर यांनी केली, सूत्रसंचालन आकाश ठाकरे सर यांनी केले तर रामलाल राठोड सर यांनी आभार मानले.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/२०३/२०२५
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- २६/०२/२०२६

## जाहीरनामा

उपरोक्त विषयाचे संदर्भीय शासन निर्णय व पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, अर्जदार **शेख तसलीम शेख शमशु रा. उमरखेड यांनी** त्यांचे मुलीचे नामे फरहत जहॉ शेख तसलीम मौजा उमरखेड **ता. उमरखेड येथे दिनांक** ०७.०६.२००३ रोजी झालेला आहे. जन्म अनुउपलब्धता उपलब्ध नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना **जन्मनोंद** आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक १०/०३/२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कायालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा.
तालुका दंडाधिकारी
उमरखेड

# कुलूप ठोकण्याच्या इशाऱ्यानंतर घरकुलाचा निधी वितरित

**जनमाध्यम प्रतिनिधी**

बाभूळगाव - तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना मंजूर झालेल्या घरकुलाचा हप्ता वेळेत मिळत नसल्यामुळे निर्माण झालेल्या समस्येवर अखेर तोडगा निघाला आहे. पंचायत समिती कार्यालयाला कुलूप ठोकण्याचा इशारा देण्यात आल्यानंतर अवघ्या आठवडाभरात घरकुलाचा निधी लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आल्याने लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

बाभूळगाव पंचायत समिती अंतर्गत मंजूर झालेल्या अनेक घरकुलांचे हप्ते लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झाले नव्हते. त्यामुळे अनेकांचे घरकुल बांधकाम रखडले होते. यामुळे संतप्त झालेल्या लाभार्थ्यांसह उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख गजानन पांडे यांनी पंचायत समिती कार्यालयात येऊन आंदोलनाचा इशारा दिला होता. हप्ते तात्काळ जमा न झाल्यास पंचायत समितीला कुलूप ठोकण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला होता. घरकुल मंजूर झाल्यानंतर अनेक लाभार्थ्यांनी जुनी घरे काढून बांधकाम सुरू करण्याची तयारी केली होती. काहींनी उधारीवर बांधकाम साहित्यही आणले होते. मात्र हप्ते खात्यात जमा न झाल्याने बांधकाम थांबले होते. उधारीवर साहित्य देणारे व्यापारीही लाभार्थ्यांच्या घरी चकरा मारत असल्याने लाभार्थ्यांवर मोठा आर्थिक ताण निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी लाभार्थ्यांना सोबत घेऊन पंचायत समिती कार्यालय गाठले आणि गटविकास अधिकारी उज्ज्वला ढोले यांच्याकडे लाभार्थ्यांची समस्या मांडली. त्यानंतर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करत घरकुलाचा निधी वळता केला. दरम्यान, निधी मिळाल्यामुळे आता लाभार्थ्यांचे घरकुल बांधकाम पावसाळ्यापूर्वी पूर्ण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# तुपटाकळी येथील स्वस्त धान्य दुकानदारांवर कारवाईची मागणी

## "गटाचे आधी पैसे भरा नंतर धान्य मीळेल अशी अपमानास्पद वागणूक



**जनमाध्यम प्रतिनिधी**

दिग्रस - स्वस्त धान्य डीलर महीला सौ.वेदकुमारी पु. ठाकरे यांनी आधी गटाचे पैसे भर नंतर च तुला राशन मीळेल असे मुजोरगीरी करीत सौ.नेहा प्रविण रोडे या महीलेला राशन न देता घरी पाठवले यामुळे प्रमोद गजानन रोडे यांनी पुरवठा विभागीय अधिकारी दिग्रस यांच्या कडे लेखी तक्रार केली आहे.

१२ मार्च रोजी १० ते ११ वाजताच्या सुमारास सौ नेहा प्रमोद रोडे राशन आणण्यासाठी स्वस्त धान्य दुकानात गेली असता स्वस्त धान्य दुकान डीलर महीलेने "गटाचे पैसे आधी भर नंतर धान्य मीळेल नाही तर धान्य मिळणार नाही" असे टणकावून सांगितले तेव्हा नेहा रोडे यांनी सांगितले "माझे पती घरी नाही ते आल्यावर गटाच्या पैस्याच बोला पण मला राशन द्या" परंतु स्वस्त धान्य दुकान डीलर महीला ऐकुण घेण्यास तयार नव्हती. त्यामुळे नेहा रोडे ही महीला राशन न घेता रडत घरी आली यावेळी दुकानात इतर गावातील महिला व पुरुष ग्राहक हजर होते एवढ्या लोकांसमोर अपमानास्पद केला गेला तसेच राशन आणि गटाच्या पैस्याचे सरासरी काही संबंध नसताना केवळ मुजोरगीर दाखवत हुकुमशाही पद्धतीने ग्राहकांना वागणुक मिळत आहे १० ते ४ वाजताचा धान्य वाटपाचा वेळ असताना धान्य वेळेवर वाटप केले जात नसल्याची ही चर्चा सुरू आहे स्वस्त धान्य डीलर चालकांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी प्रमोद रोडे व पत्नी सौ स्नेहा रोडे यांनी लेखी तक्रार पुरवठा विभागीय अधिकारी दिग्रस यांच्याकडे दाखल केली आहे.

# घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर; ग्राहकांना सिलेंडरसाठी १०–१२ दिवस प्रतीक्षा




**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - शहरात घरगुती गॅस सिलेंडरचा मोठ्या प्रमाणात व्यावसायिक वापर होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. विशेषतः छोटे-मोठे हॉटेल, चहा-कटिंग सेंटर, मिठाई दुकाने तसेच इतर खाद्य व्यवसायात घरगुती सिलेंडरचा सर्रास वापर केला जात असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे.


सध्या गॅसचा पुरवठा मर्यादित असल्याने सामान्य ग्राहकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.अनेक ग्राहकांनी सिलेंडर बुक करून १० ते १२ दिवस उलटूनही त्यांना गॅस मिळत नसल्याचे सांगितले.परिणामी गॅस एजन्सीसमोर सिलेंडरसाठी रांगा लागत असून काही ठिकाणी वादाची परिस्थितीही निर्माण होत आहे.

अशा परिस्थितीतही काही व्यावसायिकांकडून घरगुती गॅस सिलेंडरचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू असल्याचे दिसून येत आहे.

त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांना गॅस मिळणे आणखी कठीण होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर अन्न व नागरी पुरवठा विभागाने अशा व्यावसायिकांवर तातडीने कारवाई करून घरगुती गॅसचा गैरवापर थांबवावा,अशी मागणी सामान्य नागरिकांकडून होत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### जिल्हाधिकारी कार्यालयात यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

**अमरावती-**आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आणि राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी गोविंद दानेज यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, अधीक्षक निलेश खटके यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी आदी यावेळी उपस्थित होते. उपस्थितांनीही दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.



### विद्यापीठात यशवंतराव चव्हाण जयंती

**अमरावती-**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, उपकुलसचिव साक्षी ठाकुर, प्रशासन विभागाचे अधीक्षक डॉ. धनंजय पाटील तसेच अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. संचालन व यशवंतराव चव्हाण यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.



### मनपात माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण जयंती

**अमरावती-**महाराष्ट्राचे पहिले माजी मुख्यमंत्री आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त अमरावती महानगरपालिकेत हारार्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.महापौर श्रीचंद तेजवाणी यांच्या हस्ते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, सभागृह नेते चेतन गावंडे, सन्माननीय नगरसेवक मिलिंद चिमोटे,नगरसेविका सुरेखा लुंगारे, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त योगेश पिठे, मुख्य लेखापरीक्षक श्यामसुंदर देव, मुख्य लेखाधिकारी दत्तात्रय फिस्के, सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर, प्रमोद मोहोड, भूषण खडेकार, शिवा फुटाणे तसेच महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### महिला नगरसेविकांचा गौरव सोहळा उद्या

**अमरावती-**समाजात महिलांचे योगदान अधोरेखित करत स्त्रीशक्तीचा गौरव करण्यासाठी आरोग्यम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट येथे 'स्त्रीशक्ती सन्मान सोहळ्याचे' आयोजन रविवार, १५ मार्च रोजी दुपारी ४ वाजता अमरावती बडनेरा मार्गावरील सातुर्णा परिसरातील डीपीएस मार्गावर असलेले आरोग्यम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे करण्यात आले आहे. या सोहळ्यात शहरातील ४७ नवनिर्वाचित महिला नगरसेविकांचा विशेष सन्मान करण्यात येणार असून हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरणार आहे.कार्यक्रमाला माजी खासदार नवनीत राणा, आमदार सुलभाताई खोडके,महानगरपालिकेचे आयुक्त सौम्य चांडक तसेच माजी मंत्री यशोमती ठाकूर यांना सोहळ्याचे प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे. त्यांच्या हस्ते अमरावती महानगर पालिकेतील ४७ नवनिर्वाचित महिला नगरसेविकांचा सन्मान व सत्कार करण्यात येणार आहे. समाजातील मातृशक्ती व स्त्रीशक्तीचा गौरव करण्याच्या उद्देशाने आयोजित या सन्मान सोहळ्याला अमरावतीकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महिलांच्या कार्याचा गौरव करावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### शहरात १०० मुलांच्या शासकीय वसतिगृहासाठी इमारतीची आवश्यकता

**अमरावती-**महाराष्ट्र राज्य इतर मागास बहुजन कल्याण विभागाद्वारे अमरावती येथे विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील १०० विद्यार्थ्यांसाठी नवीन मुलांचे वसतिगृह सुरू करण्यात येत आहे. या वसतिगृहासाठी सर्व सोयी-सुविधांनी युक्त अशी अंदाजे ९२०० चौरस फूट बांधकाम असलेली इमारत भाड्याने हवी असून, इच्छुक इमारत मालकांनी १५ दिवसांच्या आत अर्ज सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभाग, सहायक संचालक सरीता बोबडे यांनी केले आहे.शहरातील स्थानिक इच्छुक इमारत मालकांनी विहित नमुन्यातील अर्ज 'सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, अमरावती, सामाजिक न्याय भवन, पोलीस आयुक्तालयाच्या मागे, चांदूर रेल्वे रोड, अमरावती' या कार्यालयात सादर करावयाचे आहेत. या कार्यालयाचा ईमेल आयडी adobbwoamravati@gmail.com हा आहे.बातमी प्रसिद्ध झाल्यापासून पुढील १५ दिवसांपर्यंत कार्यालयीन वेळेत हे अर्ज स्वीकारले जातील. अर्जाचा नमुना आणि इतर सर्व अटी व शर्तीची सविस्तर माहिती वरील कार्यालयात उपलब्ध आहे. समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधेसाठी हक्काचे निवासस्थान उपलब्ध व्हावे, या उद्देशाने प्रशासनाने ही प्रक्रिया गतिमान केली आहे.

### राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार वितरण आज

**अमरावती-**जिल्ह्यात राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान गतिमान करून रोजगार निर्मितीसाठी वलगाव येथील सिकची रिसॉर्ट येथे शनिवार १४ मार्च रोजी सकाळी ९ ते ५ पर्यंत कृषी निसर्गोपचार मार्गदर्शन शिबिराचे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज लोक विद्यापिठ आणि प्रेमकुमार सिकची चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आलेले आहे.निसर्गाच्या सहवासात असलेल्या औषधी बाबतचे मार्गदर्शन मुंबईचे सुप्रसिद्ध डॉ. प्रशांत मुळीक आणि त्यांचे सहकारी करणार आहेत.

# अवैध वृक्षतोड प्रकरणी महावितरण कार्यालयाला दंड

## उपविभागीय अधिका-यांनी अवैध वृक्षतोड कारवाईबाबत मागितला अहवाल

**अचलपूर/ वार्ताहर**

गेल्या १९ फेब्रुवारी रोजी महावितरण कंपनी अचलपूर यांनी ऑक्सिजन पार्क येथील ४३ झाडे अर्ध्यातून तोडल्याने न.प अचलपूर ने महावितरण विभागीय कार्यालय अचलपूरचे कार्यकारी अभियंता यांना नोटीसच्या माध्यातून ९० हजार रुपयाचा दंड ठोठावला आहे.



यापूर्वीही यासंदर्भात अचलपूर नगर परिषद प्रशासनाने महावितरण विभागीय कार्यालय अचलपूर कार्यालयाला कारणे दाखवा नोटीस दिली होती तर अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांनी सुद्धा वनविभाग येथील वनपरिक्षेत्र अधिकारी यांना अवैध वृक्षतोड प्रति कारवाई करून अहवाल सादर करण्यासाठी निर्देश दिले होते. आदिवासी पर्यावरण सामाजिक विकास संघटनचे पदाधिकारी योगेश खानजोडे, सुरेश प्रजापती, प्यारेलाल प्रजापती, संजय डोंगरे, राजेंद्र मुंदे, ममता डहाके यांनी हा मुद्दा रेटून पाठपुरावा केला आहे. अचलपूर नगर परिषदे चे मुख्याधिकारी तथा वृक्ष प्राधिकरण समितीचे अध्यक्ष धीरजकुमार गोहाड यांनी महावितरणला कारणे दाखवा नोटीसचा जवाब न दिल्याने नागरी क्षेत्र झाडाचे जतन व संरक्षण अधिनियम १९७५ कलम २१ नुसार प्राणवायू स्त्रोत ४३ हिरवेगार झाडे अर्ध्यातून तोडल्याने तर उन्हाळ्यात १८ झाडे आता मृत्यू अवस्थेत असल्याने ९०,००० हजार रुपयाचा दंड नगर परिषद अचलपूर कडून महावितरण कंपनी अचलपूरला ठोठावला आहे.यामुळे आता महावितरण विभागीय कार्यालय अचलपूर कडून कोणती भूमिका घेतली जाणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या प्रकारांची सर्वीकडे मोठी चर्चा झाली .या कारवाई मुळे भविष्यात अवैध वृक्ष तोडीचे प्रकार थांबणार अशी

झाडाच्या फांद्या तोडलेल्या आहे.सार्वजनिक काम आहे .या संदर्भात स्पष्टीकरण देऊ आणि अचलपूर नगर परिषद प्रशासनाने आकारलेला दंड माफ करण्याची मागणी करणार आहे.

**प्रदीप अंधारे,**
कार्यकारी अभियंता,
महावितरण विभागीय कार्यालय, अचलपूर.

प्रतिक्रिया आदिवासी पर्यावरण संघटनेचे अध्यक्ष योगेश खानझोडे यांनी दिली .आणि या कारवाई चे स्वागत प्यारेलाल प्रजापती, सुरेश प्रजापती, संजय डोंगरे यांनी मानले आहे.

## भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरीत

**अमरावती/ का.प्र.**

भारतीय विद्या मंदिर, अमरावती द्वारा संचालित भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय परतवाडा येथे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी २०२५ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांसाठी आयोजित पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ संपन्न झाला. अध्यक्षस्थानी भारतीय विद्या मंदिर, अमरावतीचे उपाध्यक्ष डॉ. रमेश बिजवे प्रमुख अतिथी म्हणून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. महेंद्रजी ढोरे उपस्थित होते.



तसेच भारतीय विद्या मंदिर, अमरावतीचे सरचिटणीस डॉ. प्रशांत भागवतकर व सलील चिंचमलातपूरे यांनीही उपस्थिती दर्शविली.

यावेळी डिंपल अंभोरे यांनी गुणानुक्रमे महाविद्यालयात प्रथम क्रमांक प्राप्त केला असून तसेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात तृतीय क्रमांकाने मेरिट मिळविल्याबद्दल स्वर्गीय श्रीधर बाबुराव चिंचमलातपुरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ चिंचमलातपुरे परिवारामार्फत गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक,संचालन प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन समितीने केले. समारंभाला महाविद्यालयातील विद्यार्थी, पालक तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिलेंडर दरवाढी विरोधात चूल मांडून महिला काँग्रेसचे आंदोलन

**तिवसा/ वार्ताहर**

सिलेंडर दरवाढी विरोधात आज तिवसा येथे महिलांनी आक्रमक पवित्रा घेत चूल मांडून तिवसा तहसीलवर आंदोलन केले व शासनाचे लक्ष वेधले.तिवसा येथे महिला काँग्रेस व तालुका काँग्रेसने या आंदोलनातून केंद्र सरकारचा निषेध नोंदविला.



आखाती देशामध्ये सुरू असलेल्या विद्यार्थ्यांना पूर्व जिल्ह्यामध्ये व ग्रामीण भागात एलपीजी सिलेंडर मध्ये मोठ्या प्रमाणात कपात झाल्याने भविष्यात उद्भवणाऱ्या संभाव्य टंचाई सदृश्य परिस्थितीचा नागरिकांना व महिलांना सामना करावा लागत आहे याचा जास्त फटका लाडक्या बहिणींना व ग्रामीण भागातील शेतकरी महिलांना होतो आहे. केंद्र व राज्य सरकार याबाबत उदासीन धोरण ठेवत असून जीवनावश्यक वस्तूत मोडणाऱ्या एलपीजी गॅस सिलेंडरचे वाढलेले भाव आणि वाढती महागाई म्हणजे लाडक्या बहिणींचा केलेला घात आहे.त्यामुळे इंधन दरवाढ तातडीने कमी करून सुरळीत एलपीजी पुरवठा करण्यात यावा. या मागणीसाठी तिवसा तालुका व शहर महिला काँग्रेस व तिवसा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने लक्षवेधी आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधत तहसील कार्यालय येथे धरणे आंदोलन करून निषेध व्यक्त करण्यात आला.रिकामे सिलेंडर व चूल मांडून तहसीलदार यांना निवेदन देत शासनाचा निषेध नोंदविला. आंदोलनात प्रकाश माहोरे, दिलीप काळबांडे, सतीश पारधी, सेतू देशमुख, प्रफुल देशमूख, प्रदीप बोके, मोहन वानखडे,भारत ढोणे, नगराध्यक्ष प्रतिभा गौरखेडे, उपनगराद्यक्ष प्रिया विघ्ने, सभापती रवींद्र राऊत, महिला कॉंग्रेस अध्यक्ष रूपाली काळे, मा.सभापती कल्पना दिवे,वृंदा काळमेघ, जयश्री वै.वानखडे, पूनम काळमेघ, सुरेखा देशमुख, ललिता बोराळकर, वंदना देशमुख, मंजुषा गवड, दर्शना कडव, सुरेखा काळे, अपर्णा पारधी, मंगला बाखडे, वंदना बोरले, अर्चना थोरात, शिल्पा डाखोळे, सुमित्रा कुकडे, बेबी बाखडे, मयुरी डांगे, सौ. सांभारे, वंदना भोयर, चित्रा गवई, अश्विनी मेहरे, पल्लवी थोरात, माधुरी टेंभरे, लता पारवे, प्रणाली खोब्रागडे, रंजना झाडे, कुमुद गावखरे, रामराव तांबेकर, दिलीप वानखडे, लुकेश केने,साहेबराव ठाकरे, नगरसेवक योगेश वानखडे, नगरसेवक नरेश लांडगे, किशोर गेडाम,अमोल पन्नासे, राजेश थोरात,नारायण गोहत्रे, मुकुंद पुनसे, दीपक पडळकर,अक्षय पवार, अनिकेत बादशे, रवींद्र हांडे, विश्वजित बाखडे, संजय इंगळे, छत्रपती डोंगरे, नरेंद्र विघ्ने, राजेंद्र वानखडे, गौतम ढोणे, अतुल गवड, राजू वेरुळकर, जानराव मारोडकर, रमेश हिवसे, गजानन भोंबे, प्रणव गौरखेडे, संजय चौधरी, गौरव चौधरी, आकाश मकेश्वर, अनिकेत तालन, अनंत शेंद्रे, यश करडे,गजानन पवार, अतुल राऊत,जनार्दन लांडगे, जनार्दन चव्हाण,अजय बाखडे, श्रीधर अर्मळ, सुनील सांभारे, प्रभाकर मडावी, सतीश धुर्वे, अक्षय माहोरे, सुनिल बाखडे, अक्षय माहोरे, आशिष ताथोडे, मोठ्या संख्येने महिला पदाधिकारी उपस्थित होते.

## खेळाडूंसाठी 'क्रीडा ई-प्रमाण' प्रणाली कार्यान्वित

**अमरावती-**महाराष्ट्र राज्यातील गुणवंत खेळाडूंना शासकीय आणि निमशासकीय सेवांमध्ये ५ टक्के आरक्षणाचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक आणि जलद गतीने मिळवून देण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने 'क्रीडा ई-प्रमाण' ही अद्ययावत प्रणाली कार्यान्वित केली आहे. ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित या प्रणालीमुळे आता खेळाडूंना त्यांचे आरक्षण प्रमाणपत्र घरबसल्या प्राप्त करता येणार असून, यामुळे बोगस प्रमाणपत्रांच्या प्रकारांना पूर्णपणे आळा बसेल, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी दिली आहे.या सुविधेचा लाभ घेण्यासाठी खेळाडूंनी क्रीडा विभागाच्या अधिकृत संकेतस्थळाला (https://sports.maharashtra.gov.in) भेट देऊन 'Our Services' मधील '5% Reservation' या टॅबमध्ये नोंदणी करावी. नोंदणीसाठी आधार-संलग्न मोबाईल क्रमांक, वैध ई-मेल आयडी, आधार कार्ड आणि क्रीडा स्पर्धेत प्राप्त प्रावीण्य प्रमाणपत्र (इ३इ स्वरूपात) आवश्यक आहे. ज्या खेळाडूंची माहिती किंवा प्रमाणपत्रे तांत्रिक कारणास्तव प्रणालीवर दिसत नसतील, त्यांनी support@kridaepramaan.org या ई-मेलवर आपली तक्रार नोंदवावी. सध्या कबड्डी, फेन्सिंग, ट्रायथलॉन (२०२५), ज्युडो (२०२४) आणि कुराश (२०१७-१८ व २०२४-२५) या स्पर्धांचे अभिलेख ऑनलाईन उपलब्ध असून इतर खेळांचे अभिलेख अपलोड करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## जि.प.शाळेची श्रद्धा गवईची 'बेंगलोर विमानवारी'साठी निवड

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

जिद्द, चिकाटी आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर ग्रामीण भागातील विद्यार्थीही यशाची उत्तुंग शिखरे सर करू शकतात, याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे. निमखेड बाजार येथील जिल्हा परिषद शाळेची विद्यार्थिनी श्रद्धा गवई हिची 'प्रज्ञावंत विद्यार्थी' म्हणून बेंगलोर विमानवारीसाठी निवड झाली आहे. अमरावती जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्रा यांच्या संकल्पनेतून राबवल्या जाणाऱ्या विशेष उपक्रमांतर्गत श्रद्धाला ही सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे.



जिल्हा परिषद शाळांमधील गुणवंत आणि प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रशासनाच्या वतीने विविध उपक्रम राबवले जातात. ग्रामीण भागातील मुलांच्या स्वप्नांना पंख मिळावेत आणि त्यांना आधुनिक जगाचे दर्शन व्हावे, या उद्देशाने संजिता महापात्रा मॅडम यांनी 'विमानवारी'चा हा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील निवडक प्रज्ञावंत विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा घेतल्या गेल्या आणि त्यातून विजेत्या स्पर्धकांची बेंगलोर येथील शैक्षणिक सहलीसाठी निवड करण्यात आली आहे.

श्रद्धा गवई हिने आपल्या अभ्यासातील सातत्य आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर या निवडीसाठी आवश्यक निकष पूर्ण केले. एका गरीब कुटुंबातील आणि जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या मुलीची थेट विमान प्रवासासाठी झालेली निवड, ही संपूर्ण निमखेड बाजार गावासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. श्रद्धाच्या या यशामुळे जिल्हा परिषद शाळांच्या गुणवत्तेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

श्रद्धाच्या या यशाबद्दल अंजनगाव पं स च्या गटविकास अधिकारी कल्पना जायभाये, गटशिक्षणाधिकारी शीला आठवले, विस्तार अधिकारी गजानन बोरोडे, केंद्रप्रमुख प्रमोद दखणे , संजय चिखले,संजय वाटाणे,निलेश उमक,राहुल रोकडे,संदिप खंडारे, मनोज बारब्दे, शा व्य समिती अध्यक्ष धर्मेश गवई, उपाध्यक्ष वनिता मेश्राम,शाळेच्या मुख्याध्यापिका माला देशमुख तिच्या वर्गशिक्षिका वैशाली सरोदे शाळेचे शिक्षक वृंद गणेश टिपरे,वंदना घाटोळ, नम्रता लाडोळे,ज्योत्स्ना नवलकर, शालेय व्यवस्थापन समिती सर्व सदस्य आणि ग्रामस्थांनी तिचे जंगी स्वागत व अभिनंदन केले आहे.

## पशु वैद्यकीय चिकित्सालयात चोरी

**अंजनगाव बारी/ वार्ताहर**

पशु वैद्यकीय चिकित्सालयात २ व ६ मार्च या कालावधीत दोनदा चोरी झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत येथील पशुवैद्यकीय अधिकारी स्नेहल बनसोड पशुधन विकास अधिकारी, श्रेणी-१ यांनी संबंधित बडनेरा पोलीस स्टेशनला प्रत्यक्ष लेखी तक्रार दिली असता याबाबत झालेल्या चौकशीत योग्य ती कारवाई होत नसल्याचे लक्षात येत आहे. अंजनगाव बारी येथे नव्याने पशु चिकित्सालाच्या इमारतीचे भव्य काम झाल्याने ही इमारत कार्यरत नसून जुन्याच इमारतीत पशु चिकित्सलयाचा कारभार चालू आहे तेव्हा जुन्या इमारतींचे काही अल्पवयीन मुलांनी निर्जिव झालेले दार तोडून



सामानाची व साहित्याची नासधूस करुन महत्त्वाच्या फायली व कागदपत्रे फाडून तसेच टेबलाच्या ड्रॉवर मधील रोख रक्कम चोरी केल्याचा प्रकार उघडकीस आला. याबाबत संशय स्नेहल बनसोड यांना तेव्हा आला, जेंव्हा त्या चिकित्सालयात येत असताना त्यांना काही संशयीत मुले नेहमीप्रमाणे पडतात दिसली यावरूनच वैद्यकीय अधिकारी यांनी संबंधित पोलिस स्टेशनमला याबाबत सुचना देऊन संबंधित बालगुन्हेगारांवर कार्यवाही करण्यात मागणी केली आहे.

# डिजिटल व तत्पर वीज बिल भरण्याचा फायद

## अमरावती परिमंडळातील ग्राहकांनी कमावले ७ कोटी रूपये


**अमरावती/ का.प्र.**

वीज ग्राहकांना सोयीस्कर सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महावितरणने वीज विषयक सर्व सेवा डिजिटल माध्यमातून उपलब्ध करून दिल्या आहेत. या सेवांचा अधिकाधिक वापर व्हावा यासाठी देण्यात येणाऱ्या विविध सवलतींचा लाभ घेत अमरावती परिमंडळातील वीज ग्राहकांनी चालू आर्थिक (२०२५-२६) वर्षात तब्बल ६ कोटी ७६ लाख रुपयाची सवलत मिळवली आहे.

महावितरणकडून ग्राहकांना वीज बिल वेळेत भरण्यासाठी तसेच डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध सवलती दिल्या जातात. बिल जारी झाल्यानंतर सात दिवसांच्या आत वीज बिल भरल्यास बिल रकमेच्या (कर व शुल्क वगळून) १ टक्के तत्पर बिल भरणा सूट दिली जाते. तसेच नेटबँकिंग, क्रेडिट/डेबिट कार्ड, मोबाईल वॉलेट, कॅश कार्ड किंवा यूपीआय यांसारख्या डिजिटल माध्यमातून बिल भरल्यास ०.२५ टक्के डिजिटल बिल भरणा सूट दिल्या जाते. याशिवाय पर्यावरण पुरक 'गो ग्रीन' सेवेचा पर्याय स्वीकारून छापील बिलाऐवजी ई-मेलवर वीज बिल घेतल्यास दरमहा प्रति बिल १० रुपयांची सूट दिली जाते. अमरावती परिमंडळातील २ लाख ६४ हजार ८२२ ग्राहकांनी चालू आर्थिक वर्षात तत्पर बिल भरणा सूट म्हणून ३ कोटी ६९ लाख ५ हजार रुपयाची सवलत मिळवली आहे, डिजिटल बिल भरण्याचा पर्याय स्विकारत परिमंडळातील २ लाख ५८ हजार ३४० ग्राहकांनी १ कोटी ५३ हजार २८४ रूपयाची सुट मिळवली आहे. तसेच १ लाख ४६ हजार ९९६ ग्राहकांनी गो ग्रीन पर्यायातून २ कोटी ६ लाख ४५ हजार ३०० रूपयाची सवलत मिळविली आहे.

परिमंडळातील जिल्हानिहाय आकडेवारी पाहता अमरावती जिल्ह्यातील १ लाख ७१ हजार ७३ ग्राहकांनी प्रॉम्प्ट पेमेंट (तत्पर बिल )भरण्याचा लाभ घेत २ कोटी ४८ लाख ८६ हजार रूपयाची सवलत मिळविली, १ लाख ५८ हजार ५५५ ग्राहक डिजिटली बिल भरत असल्यामुळे त्यांना ०.२५ टक्के प्रमाणे ६७ लाख ७५६ रूपयाची सवलत घेतली आहे. त्याचबरोबर गो ग्रीन योजनेतून ८६ हजार ४२८ ग्राहकांना १ कोटी २० लाख ६२ हजार रूपये कमावले आहे.

यवतमाळ जिल्ह्यात तत्पर बिल भरून प्रति बिल १ टक्का सुट मिळविणारे ग्राहक ९३ हजार ७४९ असून त्यांना चालू आर्थीक वर्षात १ कोटी २० लाख १८ हजार ६३७ रूपयाची सवलत घेतली आहे. गो ग्रीन योजनेत सहभागी झालेल्या ६० हजार ५६८ ग्राहकांना ८५ लाख ८३ हजार २५० रूपयाची सवलत घेतली आहे, तर डिजिटली बिल भरून जिल्ह्यातील ९९ हजार ७८५ ग्राहकांना ३३ लाख ५२ हजार ५२८ रूपयाचा लाभ झाला आहे. महावितरणच्या संकेतस्थळावर तसेच महावितरण ग्राहक मोबाईल ॲपद्वारे वीज बिल पाहणे व भरणे, तक्रार नोंदविणे, नवीन वीज जोडणीसाठी अर्ज करणे, वीज भार व नाव बदलणे यांसारख्या सर्व सेवा सुरक्षित,



जलद व पारदर्शक पद्धतीने उपलब्ध आहेत. त्यामुळे ग्राहकांच्या वेळ, श्रम आणि पैशांची बचत होत आहे. त्यामुळे ग्राहकांनी डिजिटल सेवांचा अधिकाधिक वापर करून वेळेत ऑनलाईन वीज बिल भरावे तसेच 'गो ग्रीन' पर्याय स्वीकारावा, असे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे.

# उच्च शिक्षणातील भरती प्रक्रिया:आश्वासनांपलीकडील वास्तव

महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळात १० मार्च २०२६ रोजी विधानसभेत आणि विधान परिषदेत राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांमधील प्राध्यापक भरती संदर्भात आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील आणि अभिजित वंजारी यांनी सभागृहात प्रश्न उपस्थित केला. तेव्हा नवीन शैक्षणिक वर्ष जून महिन्यात सुरू होत असल्यामुळे त्यापूर्वी भरती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सर्व कुलगुरूंना सूचना देण्यात आल्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सभागृहात उत्तर देतांना सांगितले. राज्यभरात मोठ्या प्रमाणावर तासिका तत्वावर काम करणारे प्राध्यापक असले तरी त्यांना कोणतीही सवलत किंवा कोटा देता येणार नाही आणि त्यांना नियमित भरती प्रक्रियेत सहभागी व्हावे लागेल, असेही चंद्रकांत पाटील स्पष्ट केले.

यापूर्वी २६ फेब्रुवारी २०२६ रोजी पत्रकारांशी बोलताना मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शालेय शिक्षण विभागातील शिक्षक भरतीसाठी वापरल्या जाणाऱ्या पवित्र पोर्टलप्रमाणे उच्च शिक्षण क्षेत्रातही एखादी डिजिटल प्रणाली निर्माण करण्याबाबत शासन सकारात्मक विचार करेल, असे सांगितले होते. सध्या प्राध्यापक भरतीसाठी आठ सदस्यांचे मुलाखत पॅनल असते आणि त्याद्वारे उमेदवारांना गुण दिले जातात. त्यानंतर विद्यापीठाकडून अंतिम मान्यता दिली जाते. मात्र या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणण्यासाठी सुधारित प्रणालीची आवश्यकता असल्याचे सरकारने मान्य केले आहे.महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी मंजूर असलेल्या एकूण ३१,१८५ पदांपैकी १९,२६७ पदे भरलेली असून, राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांच्या रिक्त पदांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. उपलब्ध माहितीनुसार सहायक प्राध्यापक संवर्गातील सुमारे ११,९१८ पदे रिक्त आहेत,परंतु प्रत्यक्षात १३००० पेक्षा जागा रिक्त आहे अशी चर्चा आहे. त्यापैकी ५,०१२ पदांच्या भरतीला मान्यता देण्यात आली असून १५ विद्यापीठांमधील २,६०० मंजूर पदांपैकी १,४९७ पदे रिक्त आहेत. सरकारने त्यापैकी ६८७ पदांच्या भरतीला परवानगी दिली आहे. सुमारे साडेपाच हजार प्राध्यापकांची भरती करण्यासाठी वित्त विभागानेही मान्यता दिल्याची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे जूनपूर्वी भरती प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

परंतु प्रत्यक्ष परिस्थितीकडे पाहिले असता चित्र इतके सोपे दिसत नाही. मागील दोन ते तीन वर्षांपासून राज्यात प्राध्यापक भरतीबाबत सातत्याने आश्वासने दिली जात आहेत. ‘लवकरच भरती होणार’ अशी घोषणा वारंवार केली जाते; परंतु प्रत्यक्षात भरती प्रक्रियेची गती अत्यंत मंद आहे. दरम्यान रिक्त पदांची संख्या वाढतच आहे. परिणामी विद्यापीठे आणि महाविद्यालये मोठ्या प्रमाणावर तासिका तत्वावरील प्राध्यापकांवर अवलंबून राहिली आहेत. दुसरीकडे हजारो पात्र तरुण मागील सात ते आठ वर्षांपासून नेट, सेट आणि पीएच.डी. पात्रता घेऊनही रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत. ही परिस्थिती उच्च शिक्षण व्यवस्थेसाठी चिंताजनक आहे.

या पार्श्वभूमीवर ११ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्य सरकारने सार्वजनिक विद्यापीठांमधील अध्यापक भरती प्रक्रियेसाठी सुधारित शासन निर्णय जाहीर केला. शासनाच्या मते, या निर्णयामुळे भरती प्रक्रियेत पारदर्शकता वाढेल आणि गुणवत्ताधारित निवड होईल. परंतु या निर्णयातील काही तरतुदी वादग्रस्त ठरल्या आहेत. विशेषतः National Institutional Ranking Framework (NIRF) रँकिंग असलेल्या विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांना भरती प्रक्रियेत अधिक गुण देण्याची तरतूद अनेक प्रश्न निर्माण करणारी आहे.

एखाद्या विद्यापीठाला मिळालेले रँकिंग हे त्या संस्थेच्या पायाभूत सुविधा, संशोधन निधी, उद्योगसंलग्नता आणि इतर प्रशासकीय घटकांवर आधारित असते. परंतु ते त्या विद्यापीठातील प्रत्येक विद्यार्थ्याच्या गुणवत्तेचे प्रतिनिधित्व करत नाही. महाराष्ट्रातील अनेक ग्रामीण आणि प्रादेशिक विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी मर्यादित साधनसंपत्तीमध्ये शिक्षण घेत असतात. संसाधनांच्या अभावातही ते प्रचंड मेहनतीने आणि जिद्दीने यश संपादन करतात. अशा परिस्थितीत केवळ संस्थेच्या रँकिंगच्या आधारावर विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण देणे हे शैक्षणिक न्यायाच्या तत्त्वांशी विसंगत ठरते.याच निर्णयामध्ये परदेशी किंवा खाजगी विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना तुलनेने अधिक प्राधान्य देण्याची तरतूदही करण्यात आली आहे. वरकरणी पाहता ही तरतूद जागतिक दर्जाच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी असल्याचे सांगितले जाते. परंतु प्रत्यक्षात ही व्यवस्था आर्थिक विषमता वाढविणारी ठरू शकते. परदेशात शिक्षण घेणे ही अत्यंत खर्चिक प्रक्रिया आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक संसाधने आवश्यक असतात. भारतातील अनेक खाजगी विद्यापीठांमध्येही शिक्षणाचा खर्च अत्यंत जास्त असतो. त्यामुळे अशा संस्थांमध्ये शिक्षण घेण्याची संधी प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबांतील विद्यार्थ्यांनाच मिळते.जर भरती प्रक्रियेमध्ये अशा विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले गेले, तर सार्वजनिक विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय होण्याची शक्यता निर्माण होते. सार्वजनिक विद्यापीठे ही समाजातील सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची महत्त्वाची संधी असतात. त्यामुळे भरती प्रक्रियेमध्ये त्यांना दुय्यम स्थान देणे ही सामाजिक न्यायाच्या दृष्टीने चिंताजनक बाब ठरते.

सोबतच संशोधनासाठी आवश्यक आर्थिक पाठबळाचा प्रश्नही गंभीर आहे. २०१४ पूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे संशोधन, ग्रंथालये, वसतिगृहे आणि पायाभूत सुविधांसाठी विविध प्रकारचे अनुदान उपलब्ध होते. परंतु २०१५ नंतर अनेक योजनांवर निर्बंध आले. परिणामी संशोधनाची गुणवत्ता वाढविण्याची जबाबदारी संस्थांवर टाकण्यात आली; परंतु त्यासाठी आवश्यक आर्थिक साधने मात्र उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत. एका बाजूला संशोधनाला प्रोत्साहन देण्याच्या घोषणा केल्या जातात आणि दुसऱ्या बाजूला निधी कमी केला जातो, ही परिस्थिती विसंगती निर्माण करणारी आहे.राज्यातील अनेक महाविद्यालयांसमोर राष्ट्रीय मूल्यांकन व मान्यता परिषद (‘नॅक’) मूल्यांकनाचा प्रश्नही गंभीर आहे. ‘नॅक’ कडून मूल्यांकन घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र काही काळापासून ‘नॅक’ च्या विंडो बंद असल्यामुळे अनेक महाविद्यालयांना अर्ज करता आलेला नाही. अशा परिस्थितीत ‘नॅक’ मानांकन नसलेल्या महाविद्यालयांमध्ये भरती होणार नाही असे सांगणे म्हणजे भरती प्रक्रिया पुढे ढकलण्याचा अप्रत्यक्ष मार्ग ठरू शकतो.या सर्व घडामोडींमुळे एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो, पारदर्शकतेच्या नावाखाली नवीन प्रकारचा असमतोल निर्माण होत आहे का?पारदर्शकता म्हणजे अशी प्रणाली तयार करणे ज्यामध्ये प्रत्येक उमेदवाराला समान संधी मिळते आणि गुणवत्ता हेच मुख्य निकष असतात. जर भरती प्रक्रियेमध्ये काही विशिष्ट विद्यापीठांना किंवा आर्थिकदृष्ट्या सक्षम घटकांना प्राधान्य दिले गेले, तर ती व्यवस्था न्याय्य ठरणार नाही.

महाराष्ट्रातील विद्यापीठीय परंपरा ही विविधतेवर आधारित आहे. ग्रामीण, आदिवासी, प्रादेशिक आणि शहरी पार्श्वभूमीतील विद्यार्थी उच्च शिक्षण व्यवस्थेला समृद्ध करतात. ही विविधता टिकवून ठेवणे हेच शिक्षणाचे खरे बळ आहे. म्हणूनच भरती प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणताना सामाजिक न्याय, संधींची समानता आणि शैक्षणिक गुणवत्ता या तिन्ही मूल्यांचा समतोल राखणे आवश्यक आहे.सरकारने प्राध्यापक भरतीबाबत दिलेली आश्वासने प्रत्यक्षात उतरविणे ही आजची सर्वात मोठी गरज आहे. रिक्त पदे वेळेवर भरली नाहीत, तर उच्च शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता गंभीरपणे प्रभावित होऊ शकते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करायची असेल, तर सर्वप्रथम विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये शिक्षकांची भरती करणे हा सर्वात महत्त्वाचा टप्पा ठरेल. अन्यथा धोरणे कागदावरच राहतील आणि प्रत्यक्ष शिक्षण व्यवस्थेला त्याचा अपेक्षित लाभ मिळणार नाही.उच्च शिक्षणातील पदभरती हा केवळ प्रशासकीय निर्णय न राहता राज्याच्या शैक्षणिक भवितव्याशी निगडित प्रश्न म्हणून गांभीर्याने हाताळला जाणे आवश्यक आहे. वेळेवर, न्याय्य आणि पारदर्शक भरती प्रक्रिया राबविणे हेच महाराष्ट्राच्या समृद्ध शिक्षण परंपरेला न्याय देणारे ठरेल हे मात्र निश्चित !

**डॉ. प्रशांत विघे**
मो. ९३२६८७७७४९

## उष्णतेची तीव्रता वाढली;काळजी घ्या

अमरावती-शहरात मागील काही दिवसांपासून तापमानात सातत्याने वाढ होत असून उष्णतेची तीव्रता जाणवत आहे. वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचा धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी स्वतःच्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी केले आहे.

सध्या उन्हाळ्याचा कडाका वाढत असून दुपारच्या वेळेत सूर्याची तीव्रता अधिक असते. त्यामुळे दुपारी १२ ते ३ या वेळेत शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे, असे प्रशासनाने सांगितले आहे. अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर जाणे टाळावे. जर बाहेर जाणे आवश्यक असेल तर डोके झाकण्यासाठी टोपी, कॅप, गॉगल किंवा ओढणीचा वापर करावा. तसेच हलक्या रंगाचे आणि सैल सूती कपडे परिधान केल्यास शरीरावर उष्णतेचा परिणाम कमी होण्यास मदत होते.

नागरिकांनी दिवसाभरात पुरेशा प्रमाणात पाणी पिणे अत्यंत गरजेचे आहे. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास थकवा, चक्कर येणे, मळमळ, डोकेदुखी यांसारखी लक्षणे दिसू शकतात. त्यामुळे नियमित अंतराने पाणी पिणे, तसेच ओआरएस, लस्सी, ताक, लिंबूपाणी, नारळपाणी यांसारखे द्रव पदार्थ सेवन करणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. मद्यपान, जास्त प्रमाणात चहा-कॉफी तसेच कार्बोनेटेड पेये यांचे सेवन टाळावे, कारण यामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होण्याची शक्यता असते.

उन्हात काम करणाऱ्या मजुरांनी, बांधकाम कामगारांनी तसेच रस्त्यावर काम करणाऱ्या व्यक्तींनी वेळोवेळी सावलीत विश्रांती घ्यावी. दीर्घकाळ थेट उन्हात काम करणे टाळावे. कामाच्या दरम्यान डोके व चेहरा ओल्या कापडाने झाकल्यास उष्णतेपासून काही प्रमाणात संरक्षण मिळू शकते. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला तसेच आधीपासून आजार असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी. उष्माघाताची काही लक्षणे दिसल्यास त्वरित सावधगिरी बाळगणे आवश्यक आहेपरिस्थिती गंभीर वाटल्यास संबंधित व्यक्तीस तातडीने जवळच्या शासकीय किंवा खासगी आरोग्य केंद्रात दाखल करावे, जेणेकरून वेळेत वैद्यकीय उपचार मिळू शकतील. उष्णतेमुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सतर्क राहणे आवश्यक आहे.

## ‘ईशान्येची भटकंती’डोळ्यांनी पाहिलेला प्रदेश

काही प्रवास केवळ फिरण्याने होत नाहीत ते शब्दांतून अनुभवता येतात. ईशान्य भारताचा माझा प्रवासही असाच झाला. प्रसाद बरवेंनी लिहिलेले आणि लाखे प्रकाशन ने प्रकाशित केलेले ‘ईशान्येची भटकंती’ हे पुस्तक हातात पडले आणि लेखकाच्या डोळ्यांनी पाहिलेला प्रदेश त्याच्या लेखणीतून माझ्यापर्यंत पोहोचत गेला.


ईशान्य भारताबद्दल आपली कल्पना साधारण सारखीच असते - डोंगर,धुके, चहाचे मळे, वेगळी चेहरेपट्टी असलेली माणसे आणि कधीतरी बातम्यांमध्ये दिसणारे संघर्ष, नकाशावर भारताचा जो बारीकसा हात दिसतो,तोच म्हणजे ईशान्य एवढेच आपल्याला माहीत असते. पण ‘ईशान्येची भटकंती’ हे पुस्तक वाचताना लक्षात येते की हा प्रदेश केवळ भौगोलिक नाही,तर भावनिकदृष्ट्याही आपल्यापासून दूर राहिलेला भारत आहे.

हे पुस्तक हातात घेतले की ते साधे प्रवासवर्णन वाटते.रेल्वे, विमान,रस्ते,मुक्काम,मंदिरे,गावे, उत्सव-नेहमीचे घटक.पण काही पाने पुढे गेल्यावर जाणवते की लेखक फक्त प्रवास करत नाही, तो शोध घेत आहे ईशान्य भारताचा आणि त्यामधून भारताचाच.

या पुस्तकाची खासियत म्हणजे त्याची साधी आणि प्रामाणिक शैली.लेखक कुठेही साहित्यिक कसरती करत नाही. तो जे पाहतो ते सांगतो.कधी एखाद्या छोट्या गावातली शांतता, कधी आदिवासी उत्सवातील सामूहिक आनंद,कधी मंदिरात भेटलेले लोक,तर कधी सीमाभागातील अस्वस्थ वास्तव - सगळे जसे आहे ज्या प्रमाणात आहे अगदी तसेच मांडलेले आहे.

त्रिपुरासुंदरीच्या मंदिरापासून मिझोरामच्या डोंगराळ गावांपर्यंत, मणिपूरच्या ऐतिहासिक ठिकाणांपासून नागालँडच्या सांस्कृतिक गावांपर्यंत हा प्रवास चालू राहतो.मध्येच लेखकाला भेटणारी माणसे-ट्रक्सी ड्रायव्हर, स्थानिक कुटुंब,कार्यकर्ते हीच या पुस्तकाची खरी पात्रे आहेत. त्यामुळे हा प्रवास पर्यटनापेक्षा अधिक मानवी वाटतो.

पुस्तक वाचताना एक गोष्ट वारंवार जाणवते.ईशान्य भारत हा वेगळा नाही,पण वेगळा करून ठेवला गेलेला आहे.तिथल्या लोकांशी संवाद साधताना, त्यांच्या श्रद्धा आणि परंपरा समजून घेताना लेखकाला ज्या गोष्टी दिसतात त्या वाचकाला विचार करायला लावतात. अनेक ठिकाणी स्थानिक संस्कृती आणि भारतीय परंपरेचे धागे दिसतात. काही ठिकाणी बदलही दिसतात. पण त्या बदलांकडे पाहण्याची लेखकाची नजर भावनिक असली तरी संयमी आहे.




या पुस्तकातील आणखी एक वेगळी गोष्ट म्हणजे लोकजीवनाचे वर्णन, उत्सव, लोकनृत्य, परंपरा, सामूहिक पूजा या सगळ्यांमधून ईशान्य भारतातील समाजाची एक वेगळीच झलक दिसते. विशेषतः सामूहिकतेची भावना अनेक ठिकाणी जाणवते.शहरात राहणाऱ्या माणसाला ती थोडी अनोळखी वाटावी अशी.

**प्रवासवर्णन**

विशेष म्हणजे लेखकाचा प्रवास हा केवळ निसर्गाच्या सौंदर्यापाशी थांबत नाही.तो माणसांच्या जीवनात शिरतो. एखाद्या छोट्या गावातील कुटुंबाशी झालेला संवाद, त्यांच्या साध्या राहणीतील समाधान, शहराच्या गोंगाटापासून दूर असलेली शांतता या गोष्टी वाचताना जाणवते की प्रवास म्हणजे फक्त स्थळदर्शन नसते; तो स्वतःकडे पाहण्याचाही एक मार्ग असतो.

काही ठिकाणी लेखकाने लोककथा, स्थानिक श्रद्धा आणि इतिहास यांचाही उल्लेख केला आहे. या कथा कदाचित शास्त्रीय इतिहास नसतील, पण त्या त्या प्रदेशाच्या स्मृती आहेत. अशा कथांमुळे प्रदेश अधिक जिवंत वाटतो. प्रवास फक्त भौगोलिक राहत नाही; तो सांस्कृतिक आणि भावनिक बनतो.

पुस्तकात काही ठिकाणी संघकार्य,स्थानिक सामाजिक कार्य आणि सांस्कृतिक प्रयत्नांचा उल्लेख येतो.ते पुस्तकाच्या विषयाचा भाग म्हणून येतात आणि त्यामुळे ईशान्य भारताशी जोडलेले आणखी काही अदृश्य धागे समोर येतात.

तांत्रिकदृष्ट्याही पुस्तक उपयुक्त आहे. कोणत्या महिन्यात जावे, कुठे परवानगी लागते, कसे फिरावे, किती वेळ लागतो अशा सूचना दिलेल्या आहेत. त्यामुळे हे पुस्तक केवळ वाचनापुरते राहत नाही; ते प्रवासाला प्रवृत्त करते.

या पुस्तकाची महत्वाची विशेषता म्हणजे लेखक श्री प्रसाद बर्वे या भागात संघाचे प्रचारक होते, तिथली संस्कृती, तिथले लोक तिथला भूगोल त्यांनी जवळून अनुभवला आहे, जगला आहे. त्यांची या विषयाची आपुलकी आपल्याला पुस्तकाच्या पानापानावर जाणवते.

लेखकाने ईशान्य भारताचा व्यापक परिचय करून देण्याचा प्रयत्न वेधक आहे. वेगवेगळ्या राज्यांची भौगोलिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक माहिती वाचताना जाणवते की हा प्रदेश किती बहुरंगी आहे. एका राज्यातून दुसऱ्या राज्यात गेल्यावर भाषा, पोशाख, अन्नसंस्कृती, श्रद्धा सगळंच बदलते. तरीही या विविधतेतून एक अदृश्य भारतीयत्व जाणवत राहते.

पण या पुस्तकाचा खरा परिणाम शेवटी जाणवतो. पुस्तक संपल्यावर असे वाटते आपण भारतात राहतो, पण भारताला पूर्ण ओळखत नाही. ईशान्य भारत हा भारताच्या टोकावर नाही, तर आपल्या दुर्लक्षाच्या टोकावर आहे.

आणि कदाचित म्हणूनच हे पुस्तक वाचून एक साधी इच्छा मनात निर्माण होते. ईशान्य भारत बघायला जावे म्हणून नाही, तर आपलाच भारत थोडा अधिक समजून घ्यावा म्हणून.

**चैतन्य देशपांडे**

‘ईशान्येची भटकंती’
लेखक - श्री. प्रसाद बरवे
प्रकाशक - लाखे प्रकाशन नागपूर
पृष्ठ क्रमांक – ९४२
किंमत - २९०

# भूत झोंबले तात्याला

**एक टक नाटक**
**समीक्षण**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अंतर्गत ७१ वा प्राथमिक नाट्य महोत्सव स्पर्धा स्व.भाऊसाहेब लिमये सभागृह सिपना कॉलेज, अमरावती येथे आयोजित ११ वे नाटक ‘भूत झोंबले तात्याला’ सादर झाले.

डॉ. ललिता घोडे लिखित नाटकाचे दिग्दर्शन अशोक आष्टीकर यांनी केले.पुणेरी पगडीत घरातील खुर्चीवर विराजमान गृहस्थ रंगीत प्रकाश झोतात पडदा उघडताच आपला परिचय देताना मुंशीपार्टीतील रिटायर जज् म्हणून पुढे येतो. नटसम्राट मधील सरकार हे या नाटकात कमिशनर म्हणून आपल्या बायकोला संबोधून चहा मागतो.सुंदर रुपाने भरलेली पातळ परिधान केलेली जाडजुड कायाधारी बायको टोमण्यांचा वर्षाव करीत एक ताट तांदूळ निवडीच्या मोबदल्यात चहा प्राशान योग लाभलेले गृहस्थ म्हणजे तात्या सावंत.आपल्या आयुष्यातील स्वगत सांगत असताना विठू नावाचा शेजारी येतो.त्याला अतिथी सन्मानार्थ चहा मिळतो.

धमाल विनोदी नाटकाचा परिचय देत या नाटकात मुद्दाम चौथी भिंत तोडून प्रवेश साकारले गेले.कारण अशोक लाईट दे.. स्पॉट दे ब्लॉक आऊट कर... रंग दे रे बाबा.. उत्पल नको तिथे नको वाजवू. अशा सूचना चौथ्या भिंती बाहेर येतात.तात्या



सावंत हे चारित्र्य ह्या नाटकात सूत्रधार पासून तर विनोद निर्मितीत भर घालण्यापर्यंत काम करते. नाटकाचे कथानक निवृत्त झाल्यावर घरचे आपला कसा वापर करून घेतात याचा परिचय देत असते.त्यातून आपली सुटका व्हावी म्हणून कुणी तरी चमत्कार अथवा सिद्धीचा आधार मिळावा या भूमिकेत असणारे ज्येष्ठ नागरिकत्व कसे असत याची सांगड घालून कल्पित प्रहसन लांबवून केलेला दोन अंकी नाट्य प्रयोग म्हणजे भूत झोंबले तात्याला.

तात्या घरी बायको व मुला(श्री)च्या अवहेलनेमुळे त्रस्त होऊन एक दिवस स्मशानात निघून जातो.तिथे चमेलीच्या प्रेमात अर्ध्यावर प्रवास सूटलेला भूत(खविश) तात्याला भेटतो. तात्या खात्री करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कमरेच्या तलवारीची मागणी करतो.भूत लगेच तलवार भेट देतो.तात्याला खात्री पटल्यावर भूत एक करार करतो. मार्गशिष ते श्रावण सोमवार पर्यंत तात्या सोबत राहून मुक्ती मिळवण्याचा. त्या मोबदल्यात तात्याला पाहिजे ते देण्यास भूत तयार होतो.

भूत तात्याविणे कुणाला दिसणार नाही.त्यामुळे तात्या करार कबुल करून घेतो.भुताला पांडुरंग म्हणून संबोधन.घरी रात्री दोन वाजता तात्या परत येऊन दिमाखात तलवार दाखवून रुबाब उभा करतं नाटकातील गमती जमती सुरू होतात.तात्या आता सिद्धपुरुष तात्या महाराज म्हणून वावरू लागतात. शेजारच्या विठूची कुसला उर्फ सुमनला गावगुंड बॉबीचा(लाइन मारणे)छळ विठू व्यक्त करतो.त्यावर आता तात्या निर्धास्त रहा विठू ! आता पांडुरंग साथी म्हणून धीर देतो सुमन चे श्याम सोबत लग्न लावून ही देतो.

घरात दरबार ही भरतो.तात्या सर्वांस सरळ करत स्वतःचे श्रावण महिन्यात अधःपतन करून भुताच्या संगतीत चमेलीच्या गुलाबाला तात्या आहारी जातात.भुताची बाधा त्याला ही जाणवते.भूत बाहेर निघावे म्हणून तो श्री च्या दुर्गंधित मोज्यांचा वापर करतो.मात्र भूत श्री (तात्या सावंतचे चिरंजीव)च्या मुलाच्या रूपाने तात्याच्या नातवाचे नात घेऊन जन्माला येत.ही सर्व कथा पांडगो इलो रे बाय गो या मच्छिंद्र कांबळे लिखित मालवणी भाषेतील नाटकाची अॅज इट इज डुप्लिकेट लेखिकेने केल्याचे दिसून आले.

फर्सिकल किंवा विनोदी नाटकाचे सादरीकरण करताना रंग,उजेड व्यवस्थित असले तरी संगीत मोजकेच असल्याने विनोद कुठेच बाहेर येताना दिसला नाही. काळा कुट्ट ढगांचा आभाळात घेरा बंबाड पाऊस पडेल, असा अपेक्षेत असलेल्या पावसात भिजण्याची इच्छा धरलेल्या हौशाची हौस पावसाचे नुसते थेंब पडून फिटत नाही. तशीच गत धम्माल विनोदी नाटक म्हणताना रसिक बघत असताना झाली.

तात्या विनोद करताना, हलके फुलके जाणवत नव्हते.त्यांच्यात मुरब्बी अभिनय जड झाला.भूत मात्र पूर्ण प्रयत्न करीत होते.पण त्याला भूत सारखे दाखवण्यात वेशभूषाकार कमी होते.कोटात पांडुरंग भूत आणि चमेलीच्या प्रेमातले त्यानुसार त्याचा पोशाख हवा होता.अभिनय गुप्त होता पण त्याचा वावर होता. बॉबीचे वेळी तो लुप्त होता.थोडी विसंगत झळकली.फारसिकल नाटकात प्रायोगिक स्तर जास्त होता. विनोदाला प्रत्येक ग्राऊंडवर लवचिकपनाने चेंडूच्या पटपट टप्प्यात खेळावे तसे नाटक झाले नाही.नाटकाचा शिखर गाठताना पांडुरंग गेला व नातवाच्या रुपे आला.इथे बाळाचा आवाज ऐकला नाही.

थोडक्यात नाटक अभिनय दर्जा पाठांतर पकडीमुळे रंगमंच सांभाळत राहिले.मात्र तात्या विनोद ताठ करून राहिल्याने हास्य पिकले नाही. संगीताची इथे रेलचेल करण्याचे प्रसंग सुद्धा ओढवून घेतले नाही.रंग संगत उजेडाच्या आधाराने थोडीफार बरी होती.त्यातल्या त्यात नेपथ्य खूप छान साकारले. लावणी ऐवजी ग्लॅमर गीताने चमेलीची गुलाब आणि मुंबई चे तात्या यात भुताची एन्ट्री विनोदाची तोड असती.बऱ्याच गॅप दिसतात.म्हणून फर्सिकल नाटक दिग्दर्शक बसवताना दर्शकांना फसवू शकत नाही अशी प्रतिक्रिया ही शिल्लक राहते.

रंगभूषा, वेष भुसा सुंदर,उजेड दाखवणारे दर्शकाच्या नजरेत अशोक व संगीताचे उत्पल म्हणून नावे दिग्दर्शकने जाहीर केले. नाटकात विठोबा अमित राऊत,पांडुरंग लखन सोनुले,कमिश्नर डॉ.ललिता घोडे,बॉबी सचिन वानखेडे छान परफॉर्मन्स,चमेलीची लेक गुलाब दिव्या टेंभुर्णे ह्यांना तात्या अशोक आष्टीकर यांनी दिग्दर्शन करून नाटकात सामील केले.एक टक नाटक बघताना प्रेक्षकांना हसायला जागा मिळाल्या नाही, एवढेच फर्सिकलचे नावे खेळ होता...

**कबीरफादर**
मो. ७७९८६४५५६५



# कास्तकार व शासनामधील दुवा म्हणजे राष्ट्रवादी किसान सभा - वसंतराव मनकर

■ प्रतिनिधी | अकोला ■

*राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षातील किसान सभा हा शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा विभाग असून कास्तकार व शासन यांच्यामधील दुवा म्हणून काम करत असल्याचे मत किसान सभेचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मनकर यांनी व्यक्त केले. शासनाच्या कृषी योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे आणि शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्या शासनापर्यंत पोहोचविणे हे किसान सभेचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.*



शुक्रवारी अकोला येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी पक्षाच्या कृषी धोरणाची भूमिका स्पष्ट करत किसान सभेला सेवाभावी संघटना म्हणून अधिक व्यापक करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यकर्त्यांसाठी निवासी कार्यशाळा आयोजित करून त्यांना सेंद्रिय शेती, कृषी संशोधन तसेच खरीप-रब्बी पिकांबाबत तज्ज्ञांकडून प्रशिक्षण देण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. भारत-अमेरिका कृषी कराराच्या संदर्भात बोलताना मनकर म्हणाले की, भारतीय शेतकऱ्यांची तुलना पाश्चात्त्य देशांतील शेतकऱ्यांशी करणे योग्य नाही. या कराराच्या पाठपुराव्यात आपण कमी पडलो असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांना उत्पादनावर आधारित हमीभाव देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसकडून सातत्याने करण्यात आली, मात्र ती पुढे सरकली नसल्याचे त्यांनी नमूद केले. विरोधी पक्षदेखील या मुद्द्यावर ठोस भूमिका घेत नसल्याची टीकाही त्यांनी केली.

शेतकऱ्यांच्या समस्या केवळ कर्जमाफीने सुटणार नाहीत, असे सांगत मनकर म्हणाले की, कर्जमाफीच सर्व समस्यांचे उत्तर असते तर शेतकरी आत्महत्या थांबल्या असत्या. त्यामुळे सर्वसमावेशक पिक विमा योजना सुरू करण्याची मागणी पुढेही जोरदारपणे मांडणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी किसान सभेचे जिल्हाध्यक्ष अरविंद पाटील यांनी जिल्हा कार्यकारिणी जाहीर केली. या कार्यकारिणीत संजय नेमाडे, पवन कडू, राम मंगळे, गणेश माळी, तेजस दाभाडे, गणेश वानखडे, विशाल मोरखडे, राजाराम डाखोरे, प्रशांत तायडे, विनायक लोनाग्रे, कल्याणी सोनवणे, अजय बोदडे, अतुल वसतकर, काझी रफत अली, शाहरुख देशमुख, पंडित तानकर, मंगेश इंगळे, मंगेश उगले, कपिल पटोकार, पांडुरंग धावट आदींची नियुक्ती करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला किसान सभेचे प्रदेश सरचिटणीस डॉ. गणेश डोंगरे, जगदीश जुनगडे, बबनराव तिकांडे, प्रभाकरराव गावंडे, महिला अध्यक्षा प्रतिभाताई अवचार, युवक आघाडी अध्यक्ष अमोल काळणे, महासचिव विकास पवार, सेवादल अध्यक्ष विनोद कोगदे, महासचिव निशा ठाकरे, तालुकाध्यक्ष गणेश थोरात, जिल्हा उपाध्यक्ष गणेश माळी, बाळापूर तालुकाध्यक्ष संजय बढे आदी उपस्थित होते.

# उष्मालाट दक्षतेबाबत व्यापक जनजागृती करा - जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | अकोला ■



तापमानाची वाढती तीव्रता लक्षात घेऊन प्राथमिक आरोग्य केंद्रांसह सर्व आरोग्य संस्थांमध्ये पुरेशी औषधे, उपचार साहित्य उपलब्ध ठेवावे. उष्मालाटेपासून बचावासाठी आवश्यक दक्षतेबाबत व्यापक प्रमाणावर जनजागृती करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.

जिल्हा संसर्गजन्य आजार प्रतिबंध समिती, नियमित लसीकरण कार्यक्रम, प्राणीजन्य आजार प्रतिबंध समिती, हवामान बदल व मानवी आरोग्य कार्यक्रम टास्क फोर्स आदी विविध बैठका जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत त्यांच्या दालनात झाल्या, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. विनोद करंजीकर, डॉ. मेश्राम, महिला व बालविकास अधिकारी राजश्री कोलखेडे आदी उपस्थित होते.

जिल्ह्यात गतवर्षी एप्रिल महिन्यात ४५.२. से. इतके उच्चांकी तापमान नोंदवले गेले. उष्माघातापासून दक्षता पाळण्याबाबत शेतकरी बांधव, नागरिकांना व्यापक प्रमाणावर संपर्क साधून जागृती करावी, असे निर्देश जिल्हाधिका-यांनी यावेळी दिले. प्रत्येक आरोग्य संस्थेत उष्माघात कक्ष स्थापण्यात आला असून, उपचार साहित्य, औषधे, आयव्ही फ्लुईड, ओआरएस साठा उपलब्ध आहे.


उष्माघात उपचाराच्या अनुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे ३० खाटा, प्रत्येक प्रा. आ. केंद्रात २ खाटा, प्रत्येक ग्रामीण रूग्णालय ५ खाटा, उपजिल्हा रूग्णालयात १० खाटा राखीव आहेत.

**Change In Name**

I have change my name From
**SHAIKH MOHAMMED SHAIKH YASIN**
(As per Old Passport Name / Wrong Name)
-To-
**SHAIKH MOHAMMAD KARIM SHAIKH YASIN**
(New Name as per on Two Photo ID)
Passport No. S-317710 (If as per Old Passport or if change then per Aadhar)
Name of Wife : **SHAFIQUNNISA SHAIKH MOHAMMAD KARIM**
Address: Mohta Mill Road, Nazuk Nagar, VTC Akola - 444 001.

# घरगुती गॅस सिलेंडरच्या काळाबाजाराविरुद्ध प्रशासनाची धडक मोहीम

## ९ पथके गठीत, ८ सिलेंडर जप्त



■ प्रतिनिधी | अकोला ■

घरगुती गॅस सिलेंडरचा काळाबाजार रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कडक पावले उचलत जिल्हास्तर व तालुकास्तरावर मिळून एकूण ९ तपासणी पथके गठीत केली आहेत. या पथकांमार्फत जिल्ह्यातील सर्व गॅस एजन्सींची तपासणी करून घरगुती गॅस सिलेंडरचा गैरवापर रोखणे तसेच नागरिकांना गॅसचा सुरळीत पुरवठा होण्यासाठी नियोजन करण्यात येत असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

या मोहिमेअंतर्गत अकोला जिल्ह्यातील ३४ गॅस एजन्सींची तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले असून पथके विविध व्यावसायिक आस्थापनांवर अचानक भेटी देऊन तपासणी करीत आहेत. दरम्यान, आज पथकांनी जिल्ह्यातील २५ व्यावसायिक प्रतिष्ठानांची तपासणी केली. तपासणीदरम्यान काही ठिकाणी घरगुती वापरासाठी असलेले गॅस सिलेंडर व्यावसायिक वापरासाठी वापरले जात असल्याचे आढळून आले. त्यामुळे प्रशासनाने धडक कारवाई करत ६ ठिकाणांहून एकूण ८ घरगुती गॅस सिलेंडर जप्त केले.

जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले की, अकोला जिल्ह्यात घरगुती गॅस सिलेंडरचा साठा पुरेसा उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच अनावश्यकपणे गॅस एजन्सींवर गर्दी करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक वापर किंवा काळाबाजार आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

# अकोला शहरात पाणीपुरवठा आता चौथ्या दिवशी

## धरणातील साठा घटल्याने मनपाचा निर्णय

■ प्रतिनिधी | अकोला ■

वाढत्या उन्हामुळे धरणातील पाणीसाठ्यात घट होत असल्याने अकोला शहरातील पाणीपुरवठ्यावर परिणाम झाला असून आता नागरिकांना चौथ्या दिवशी पाणी मिळणार आहे. अकोला महानगरपालिकेने हा निर्णय जाहीर केला आहे.

महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा योजनेसाठी मुख्य जलस्त्रोत असलेल्या काटेपूर्णा प्रकल्पात सध्या केवळ ३९.०४९ दलघमी पाणीसाठा उपलब्ध आहे. उन्हाळ्याची तीव्रता वाढत असल्याने शहरात पाण्याची मागणी वाढली असून धरणातील पाण्याचे वाष्पीभवनही मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे साठ्यात सातत्याने घट होत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

या पार्श्वभूमीवर अकोला महानगरपालिकेने सध्या सुरू असलेला दोन दिवसाआड पाणीपुरवठा बंद करून आता तीन दिवसाआड, म्हणजेच चौथ्या दिवशी पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय १३ मार्चपासून लागू करण्यात आला आहे.

या बदलामुळे महाजनी, मोठी उमरी, गुडधी, नेहरू पार्क, तोष्णीवाल, आदर्श कॉलनी, केशव नगर, रेल्वे स्टेशन, गंगा नगर, अकोट फैल, जोगळेकर प्लॉट आणि लोकमान्य नगर येथील जलकुंभांवरून होणारा पाणीपुरवठा चौथ्या दिवशी करण्यात येणार आहे.

दरम्यान, शहरातील नागरिकांनी पाण्याची साठवणूक करून अपव्यय टाळावा आणि मनपा प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल डोईफोडे यांनी केले आहे. गरमीच्या झळा वाढत असताना पाणीपुरवठ्याचा कालावधी वाढल्याने नागरिकांना मात्र पाणीटंचाईची झळ बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# एचपीव्ही लसीकरणाबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

■ प्रतिनिधी | अकोला ■

एचपीव्ही लस सर्व्हायकल कॅन्सर (गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग) टाळण्यासाठी अत्यंत प्रभावी आहे, या लसीकरणाचे कोणतेही दुष्परिणाम नसून, लस अत्यंत सुरक्षित आहे. लसीकरणाविषयीचे गैरसमज दूर व्हावेत यासाठी व्यापक जनजागृती करून लसीकरण कार्यक्रम यशस्वीपणे राबवावा, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.

एचपीव्ही लसीकरणाच्या अनुषंगाने बैठक जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत त्यांच्या दालनात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. विनोद करंजीकर, डॉ. मेश्राम, महिला व बालविकास अधिकारी राजश्री कोलखेडे आदी उपस्थित होते. एचपीव्ही लस ही चौदा वर्षे वय पूर्ण झालेल्या व पंधरा वर्षांआतील मुलींना दिली जाणार आहे. जिल्ह्यात ९ हजार २९ विद्यार्थीनी पात्र आहेत. आरोग्य संस्थांच्या माध्यमातून लसीकरण होणार आहे.

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- २२/२०२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक-** त्रिमूर्ती तथागत फुले शाहू आंबेडकर विहार चॅरिटेबल ट्रस्ट, जुनीवस्ती, कुरणखेड, ता. जि. अकोला

**अर्जदार :-** श्री. धर्मेश सुभाष वाघ रा.मु.पो.वार्ड नं.१, जुनी वस्ती, कुरणखेड, ता. जि. अकोला

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन) :-** रोख रक्कम रु.१००१/- श्री. धर्मेश सुभाष वाघ यांचे ताब्यात आहे.

**आ) स्थावर मिळकत (वर्णन) :-** काही नाही.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियतही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशारितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियती चा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियतन आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला. १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक- ०६/०३/२०२६ रोजी दिली.

(शिक्का)

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १०१**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापूर**
**दयानंद मारूती वाघमारे यांचे न्यायालयात**
**सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर बाळापुर, बाळापुर, अकोला.**
**सुट समंस**

नियमित दिवाणी दावा / २५/२००७
सौ. सयाबाई पुंडलीक गवई वि. श्रीमती गयाबाई जयराम उमाळे
पुढिल तारिख : २१-०४-२०२६

**बनाम-** प्रतिवादी क. ८ (अ)
जावेद मोहम्मद हुसेन रा. बडा मोमीनपुरा बाळापूर ता.बाळापूर जि. अकोला

ज्याअर्थी, वादी यांनी या न्यायालयात दावा दाखल केला आहे. त्याअर्थी, तुमच्या विरुध्द सोबतचे वादा नुसार वाद दाखल केला आहे म्हणूण सदर दाव्याच्या संदर्भात आपले म्हणणे मांडण्यासाठी दिनांक २१ माहे एप्रिल सन २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात आपण जातीने किंवा ज्यास यथायोग्य सूचना दिलेल्या असून जो वादासंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरेदेऊ शकेल अशा किंवा अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकणारी व्यक्ति त्याच्याबरोबर असेल अशा वकिलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलविण्यात येत आहे व तुमच्या हजरेसाठी ठरवलेला दिवस वादाच्या अंतिम निर्णयासाठी नेमलेला दिवस असल्यामुळे, तुमच्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही ज्या साक्षीदारांच्या साक्षीचा व ज्या दस्तऐवजांचा आधार घेउन इच्छितो ते सर्व साक्षीदार व सर्वदस्तऐवज त्या दिवशी हजर करण्याची तुम्हाला तयारी ठेवावी लागेल. तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिवशी हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत वादाची सुनावणी होउन निर्णय दिल्या जाईल याची दखल घ्यावी. तसेच तुम्हाला अशीही नाटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पूर्वी तुम्ही बजावणी साठी पत्ता दाखल न केल्यास तुमचा बचाव रद्द होण्यास पात्र ठरेल. दिनांक १० माहे ०३ सन २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

(शिक्का)

**आदेशान्वये,**
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क. स्तर, बाळापुर.

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३९९/२०२६ — प्रोसेस नं.३५५७/२०२६
चौ.ता. २८/०४/२०२६ — दिनांक : १३/०३/२०२६

**अर्जदार :** १. सुनिल हेमनदास जिवतरामानी रा. झुलेलाल मंदिर जवळ, सिंधी कॅम्प, कच्ची खोली, अकोला. ता. जि. अकोला. २. अनिल हेमनदास जिवतरामानी रा. आदर्श कॉलनी, पोहरे यांच्या घराजवळ, संभाजी नगर, अकोला. ता. जि. अकोला. ३. काजल शंकरलाल झमतानी रा. ११०–१११, कल्पतरू कॉलनी, कामटी, नागपूर. ४. भाविका मुकेश ओछानी रा. डी-१४/१०२, क्लिफ्टॉन, गौरीपाडा, कल्याण, जि. ठाणे. ५. कन्हैया हेमनदास जिवतरामानी रा. आदर्श कॉलनी, पोहरे यांच्या घराजवळ, संभाजी नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : १. हेमनदास मनुमल जिवतरामानी २. श्रीमती पुष्पा हेमनदास जिवतरामानी

**पत्ता :-** रा.झुलेलाल मंदिर जवळ, सिंधी कॅम्प, कच्ची खोली, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत हेमनदास मनुमल जिवतरामानी यांचे दि. २१/०१/२०२६ रोजी राहते घरी कच्ची खोली, सिंधी कॅम्प, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे व तसेच मयत श्रीमती पुष्पा हेमनदास जिवतरामानी यांचे राहते घरी कच्ची खोली, सिंधी कॅम्प, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १३/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४५०/२०२५ — प्रोसेस नं.१३३९५/२०२५
चौ.ता. १८/०४/२०२६ — दिनांक : ०८/०८/२०२५

**अर्जदार :** १. मिरा महादेव बोराखडे लग्नाअगोदरचे नाव मिरा गजानन पांडव रा. मेहेरे नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. २. रूपाली सुरेंद्र वानखडे लग्नाअगोदरचे नाव रूपाली गजानन पांडव रा. शिवाजी नगर, साई बाबा व्यायाम शाळेजवळ, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** १ आशाताई गजानन पांडव रा. कापशी रोड, ता. जि. अकोला. २. प्रणिता रामेश्वर गासे लग्नाअगोदरचे नाव प्रणिता गजानन पांडव रा. साई नगर, डाबकी रोड, अकोला, ता. जि. अकोला. ३. प्रतिभा मनोज बोराखडे लग्नाअगोदरचे नाव प्रतिभा गजानन पांडव रा. रेखा प्लॉट, खामगांव ता. खामगांव, जि. बुलढाणा ४. श्रीराम गजानन पांडव रा. कापशी रोड, ता. जि. अकोला.

**मयताचा पत्ता :-** मयत : गजानन किसन पांडव

**पत्ता :-** रा. कापशी रोड, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गजानन किसन पांडव यांचे दि. ०२/०२/२०२४ रोजी कापशी रोड, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. १८/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०८/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# बार्शिटाकळी नगरपंचायत

## बार्शिटाकळी जि. अकोला

दुरध्वनी क्रं२५२८२५-०७२५५.
Email: nagarpanchayat.barshitakali@gmail.com

जाक्र/नपबा/साप्र/वार्षिक निविदा/२०२६/३८४ — दिनांक-१३/०२/२०२६

## - जाहीर निविदा सुचना -

बार्शिटाकळी नगरपंचायत कार्यालयाकरीता सन- २०२६ - २७ या आर्थिक वर्षाकरीता नगर पंचायतच्या विविध विभागासाठी खालील साहित्य पुरवठा करणे व सेवा पुरविणे याकरीता कामाचे दर द्विलीफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहेत. सक्षम पुरवठाधारक किंवा कंत्राटदार यांनी आपल्या दराचे सीलबंद पाकीट निविदा प्रसिद्ध झाल्यापासून दिनांक-२०/०३/२०२६ ला दुपारी ०४:०० पर्यंत बार्शिटाकळी नगरपंचायत कार्यालयाच्या आवक जावक विभागात सादर कराव्यात.निविदा फॉर्म नगरपंचायत कार्यालयात कर विभागात रोखीने शुल्क भरून दिनांक-१४/०३/२०२६ ते दिनांक-२०/०३/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत ०५:०० वाजेपर्यंत संबंधीत विभागात मिळेल.

| अ. क्र. | निविदेचा तपशील | अनामत रक्कम | निविदा प्रपत्र शुल्क |
|---|---|---|---|
| | **सामान्य प्रशासन विभाग** | | |
| १ | सन २०२६-२७ करीता कार्यालयीन कामाकरिता मनुष्यबळ पुरवठा करणे. | ३०००/- | ५००/- |
| २ | विविध शासकीय कामाकरिता बिछायत साहित्य व लाउड स्पीकरचा पुरवठा करणे. | ३०००/- | ५००/- |
| ३ | कार्यालयीन कामाकरिता आवश्यक तो छापील साहित्याचा पुरवठा करणे. | ३०००/- | ५००/- |
| ४ | कार्यालयीन कामाकरिता आवश्यक तो झेरॉक्स साहित्याचा पुरवठा करणे. | ३०००/- | ५००/- |
| ५ | कार्यालयीन कामाकरिता आवश्यक तो स्टेशनरी व छापील स्टेशनरी साहित्याचा पुरवठा करणे. | ३०००/- | ५००/- |
| ६ | कार्यालयात आवश्यकतेनुसार संगणक, प्रिंटर व तत्सम साहित्याचा पुरवठा करणे | ३०००/- | ५००/- |
| ७ | कार्यालयात आवश्यकतेनुसार संगणक, प्रिंटर व तत्सम साहित्य दुरुस्ती करणे कामी साहित्य पुरवठा करणे. | ३०००/- | ५००/- |
| ८ | कार्यालयीन कामाकरिता लागणाऱ्या फर्निचर साहित्याचा पुरवठा करणे. | ३०००/- | ५००/- |
| ९ | कार्यालयाकरीता व विविध कार्यक्रमाकरीता पिण्याचे शुद्ध पाणी पुरवठा करणे. | ३०००/- | ५००/- |
| १० | विविध सभाचे तसेच महत्वाच्या शासकीय कार्यक्रमाचे व्हिडीओ चित्रीकरण करणे. | ३०००/- | ५००/- |
| ११ | नगर पंचायत कार्यालयातील CCTV कॅमेऱ्याची देखभाल व दुरुस्ती करणे. | ३०००/- | ५००/- |
| | **आरोग्य विभाग** | | |
| १ | आरोग्य विभागाकरीता दैनंदिन स्वच्छतेच्या कामाकरिता आवश्यक ते साहित्य पुरवठा करणे. | ३०००/- | ५००/- |
| २ | आरोग्य विभागाअंतर्गत नगर पंचायत हद्दीतील सार्वजनिक शौचालय यांची देखभाल व दुरुस्ती करणे. | ३०००/- | ५००/- |
| | **विद्युत विभाग** | | |
| १ | विद्युत विभागाकरीता पथदिवे व हायमास्ट दुरुस्ती करीता आवश्यक तो साहित्य पुरवठा करणे. | ३०००/- | ५००/- |
| २ | विद्युत विभागाकरीता पथदिवे व हायमास्ट दुरुस्ती करणे. | ३०००/- | ५००/- |
| | **पाणी पुरवठा विभाग** | | |
| १ | पाणी पुरवठा विभागाकरीता हातपंप व मोटार दुरुस्ती करीता आवश्यक ते साहित्य पुरवठा करणे | ३०००/- | ५००/- |
| २ | पाणी पुरवठा विभागाकरीता हातपंप व मोटार दुरुस्ती करणे. | | |
| ३ | पाणी पुरवठा विभागाकरीता ब्लिचिंग पावडर व तत्सम साहित्य पुरवठा करणे. | | |

**अटी व शर्ती :-**
अटी व शर्ती तसेच साहित्य यादीचे विवरण कार्यालयीन वेळेत संबंधीत विभागात पाहावयास मिळतील.

स्वा/-
**अख्तर खातून अलीमोद्दिन**
नगराध्यक्ष

स्वा/-
**श्री. सैय्यद अबरार सैय्यद मीर**
उपनगराध्यक्ष

स्वा/-
**श्री. राहुल कंकाळ**
मुख्याधिकारी

**बार्शिटाकळी नगर पंचायत, बार्शिटाकळी. जि. अकोला.**

### देवळीत धाडसत्र!

# व्यावसायिक दुकानांत घरगुती गॅसचा गैरवापर उघड

## पुरवठा विभागाची कारवाई; १२ सिलेंडर जप्त

**देवळी/जनमाध्यम**

गॅस टंचाईमुळे सर्वसामान्य नागरिक सिलेंडरसाठी रांगा लावत असतानाच देवळी शहरात काही व्यावसायिकांकडून घरगुती गॅस सिलेंडरचा सर्रास वापर होत असल्याचे उघड झाले आहे. शासनाच्या आदेशानुसार गठीत करण्यात आलेल्या तालुका पातळीवरील पथकाने पहिल्याच दिवशी धाडसत्र राबवून १२ घरगुती गॅस सिलेंडर जप्त केले.

देवळी शहर व परिसरातील हॉटेल, चहा कॅन्टीन, चायनीज सेंटर तसेच इतर व्यावसायिक प्रतिष्ठानांवर ही अचानक तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान घरगुती वापरासाठी असलेले सिलेंडर व्यावसायिक कामासाठी वापरले जात असल्याचे निदर्शनास आले. या कारवाईत देवळी शहरातून ७, भिडी येथून २ तर हुस्नापूर टोल परिसरातून ३ असे एकूण १२ सिलेंडर जप्त करण्यात आले.गॅसचा काळाबाजार रोखण्यासाठी जिल्ह्यात एकूण ९ पथके तयार करण्यात आली असून घरगुती सिलेंडरचा व्यावसायिक वापर आढळल्यास कठोर कारवाई करण्याचे निर्देश प्रशासनाने दिले आहेत. या पार्श्वभूमीवर देवळी तालुक्यात पहिल्याच दिवशी करण्यात आलेल्या धाडीत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार समोर आला.ही कारवाई देवळीचे तहसीलदार समर्थ क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तालुका पुरवठा निरीक्षक अधिकारी चांदनी शिवरकर यांच्या नेतृत्वात तहसील कार्यालयातील लिपिक अजिंक्य गोठाणे व इतर कर्मचाऱ्यांच्या पथकाने शहरातील विविध व्यावसायिक ठिकाणांची तपासणी केली. जप्त केलेले सिलेंडर ताब्यात घेऊन संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात आली.दरम्यान, सध्या गॅसचा पुरवठा मर्यादित असल्याने सरकारने घरगुती ग्राहकांना प्राधान्य दिले आहे. त्यामुळे व्यावसायिक सिलेंडर मिळण्यात अडचणी निर्माण होत असून हॉटेल, कॅटरिंग, चहा कॅन्टीन



व चायनीज व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांवर त्याचा परिणाम होत आहे. मात्र प्रशासनाच्या या धाडीनंतर घरगुती गॅसचा गैरवापर करणाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

# वर्धा येथे पोलीस भरती लेखी परीक्षा रविवारी

## इलेक्ट्रॉनिक साधनांवर बंदी

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्हा पोलीस दलातर्फे १३४ पोलीस शिपाई पदांच्या भरतीसाठी लेखी परीक्षा रविवार, १५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ ते १२.३० या वेळेत आयोजित केली आहे. उमेदवारांनी सर्व नियम पाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

परीक्षा सावंगी (मेघे) येथील दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च, फॅकल्टी ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी कॉलेज येथे होणार आहे. या परीक्षेसाठी १,२६३ पुरुष आणि ४४८ महिला उमेदवार पात्र आहेत.परीक्षेदरम्यान मोबाईल फोन, स्मार्ट वॉच, डिजिटल घड्याळ, कॅल्क्युलेटर, ब्लूटूथ डिव्हाइस यांसारखी कोणतीही इलेक्ट्रॉनिक साधने घेऊन येणे किंवा वापरणे सक्तीने बंदी आहे. नियम मोडल्यास उमेदवारी रद्द होऊ शकते आणि कायदेशीर कारवाई केली जाईल.सर्व उमेदवारांनी परीक्षा सुरू होण्यापूर्वी किमान दोन तास आधी केंद्रावर पोहोचणे आवश्यक आहे.अधिक माहितीसाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे मो. ७३०४२१०७२४, प्रवीण शेंडे मो, ९८३४१०४२५६ या नंबर वर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस विभागांनी केले आहे.

# एनएमएमएस परीक्षेत जिल्हा परिषद शाळेची झेप

## ११ पैकी ७ विद्यार्थी उत्तीर्ण

**सेलू काटे/जनमाध्यम**

ग्रामीण भागातील शासकीय शाळांनी गुणवत्तेच्या बाबतीत खाजगी शाळांनाही मागे टाकण्याची क्षमता सिद्ध केली आहे. याचे जिवंत उदाहरण म्हणजे जिल्हा परिषद उच्च माध्यम प्राथमिक शाळा, सेलू काटे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठीच्या (NMMS) परीक्षेत शाळेच्या ११ विद्यार्थ्यांपैकी तब्बल ७ विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण होऊन घवघवीत यश संपादन केले.

डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या या परीक्षेसाठी शाळेने कोणत्याही खाजगी शिकवणीशिवाय सकाळ-



संध्याकाळ अतिरिक्त शिष्यवृत्ती वर्ग आयोजित केले होते. विद्यार्थ्यांची जिद्द, चिकाटी, नियोजनबद्ध अभ्यास, दररोजचा सराव, मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचा अभ्यास आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून हे यश मिळाले.या परीक्षेत बौद्धिक व मानसिक क्षमता चाचणीसह विज्ञान, गणित आणि सामाजिक शास्त्र या विषयांतील कौशल्यांचा कस लागतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी या सर्व स्तरांवर उल्लेखनीय कामगिरी करत गुणवत्तेचा ठसा उमटविला आहे.उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये अंजली अमर ओंकार, नैतिक अरुण नाईक, जिज्ञासा तोरण यादव, सोनाली विनोद मांदाडे, आरुषी कमलाकर राऊत, नियती अजय क्षिरसागर, मोहिनी गजानन अंबाडारे, या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.विद्यार्थ्यांना घनश्याम उडान, संगीता चलाख यांनी मार्गदर्शन केले, तर मालू वाघ व राजेश ठाकूर यांनी सहकार्य केले. शिक्षकांच्या समर्पित वृत्तीमुळे आणि वर्षभराच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळे विद्यार्थ्यांनी हे यश मिळवले.या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता भारती यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले. तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रवीण हिवंज, उपाध्यक्ष विना भोई, आणि सदस्य राहुल उरकुडे, प्रवीण चौधरी, राहुल बाभुळकर तसेच पालकांनीही सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# भाव कोसळले, हवामान बिघडले; दुहेरी संकटात शेतकरी

## अकाली पाऊस, किड-रोगांचा प्रादुर्भाव आणि वाढता खर्च

**साहूर/जनमाध्यम**

परिसरातील शेतकरी सध्या बाजारातील घसरलेले भाव आणि बदलत्या हवामानाच्या दुहेरी फटक्यामुळे आर्थिक कोंडीत सापडले आहेत. अकाली पाऊस, ढगाळ वातावरण आणि तापमानातील सतत होणारे बदल यामुळे पिकांवर किडी व रोगांचा प्रादुर्भाव वाढला असून उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे.

गेल्या आठ-दहा दिवसांपासून वातावरणात अस्थिरता दिसून येत आहे. काही ठिकाणी पावसाच्या सरी, तर काही ठिकाणी दिवसभर ढगाळ वातावरण असल्याने पिकांची वाढ खुंटत आहे. रोग-किडींचा फैलाव रोखण्यासाठी शेतकऱ्यांना महागडी कीटकनाशके फवारावी लागत आहेत. मात्र याच वेळी शेतीमालाचे बाजारभाव कोसळल्याने खर्च वसूल होणेही कठीण झाले आहे.परिसरात सोयाबीन पिकाला मागील काही वर्षांपासून अपेक्षित उत्पादन किंवा दर मिळत नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी या पिकाकडे पाठ फिरवली आहे. मुख्य पीक असलेल्या कापसालाही समाधानकारक भाव मिळत नसल्याची तक्रार आहे. परिणामी कोणते पीक घ्यावे, हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे.सध्या रब्बी हंगामातील गहू, हरभरा आणि कांदा पिकांची लागवड मोठ्या प्रमाणात झाली असली तरी पीक निघताच भाव पडण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. वर्षानुवर्षे सुरू असलेल्या या चक्रामुळे शेती व्यवसाय दिवसेंदिवस अनिश्चित होत चालल्याची भावना व्यक्त होत आहे.काही कृषी तज्ज्ञांच्या मते, कीड-रोग नियंत्रणासाठी शासनाने सामूहिक फवारणी, अनुदानित औषधे, साठवणूक सुविधा आणि थेट विक्री व्यवस्था उपलब्ध करून दिल्यास खर्च कमी होऊन शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकतो. तसेच बाजार व्यवस्थेतील सुधारणा अत्यावश्यक असल्याचेही मत व्यक्त होत आहे.संकटांच्या मालिकेतही शेतकरी खचलेला नाही. आपल्या पिकांचे संरक्षण करण्यासाठी तो दिवस-रात्र शेतात राबत असून मेहनत आणि संयमाच्या बळावर शेती टिकवण्याचा प्रयत्न करत आहे.एकूणच हवामानातील अनिश्चितता आणि बाजारातील अस्थिरता यामुळे शेतकरी अडचणीत असला तरी नव्या आशेने पुन्हा उभे राहण्याची त्याची जिद्द कायम असल्याचे चित्र साहूर परिसरात पाहायला मिळत आहे.

# बुलबुल 'हिरक पंख' चाचणी शिबीर उपक्रमातून आत्मविश्वास व सुसंस्कारांची जडणघडण - कॅप्टन गुजरकर

**वर्धा/जनमाध्यम**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शालेय अभ्यासक्रमाबरोबरच व्यक्तिमत्त्व घडविणारे उपक्रम आवश्यक आहेत. भारत स्काऊट-गाईड चळवळीतील कब व बुलबुल गाईड उपक्रमांमुळे लहान वयातच आत्मविश्वास, शिस्त, सुसंस्कार आणि देशभक्तीची भावना रुजते, असे प्रतिपादन रोव्हर स्काऊटचे जिल्हा आयुक्त कॅप्टन मोहन गुजरकर यांनी केले.

स्काऊट-गाईडच्या जिल्हा प्रशिक्षण केंद्रात १० ते १२ मार्चदरम्यान आयोजित राज्यस्तरीय बुलबुल 'हिरक पंख' चाचणी शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॅप्टन मोहन गुजरकर होते. प्रमुख अतिथी म्हणून सहाय्यक जिल्हा आयुक्त राजहंस जंगले, शिबिर प्रमुख तथा वर्धा जिल्हा गाईड संघटक वैशाली घोम, नागपूर जिल्हा गाईड संघटक हेमा



वानखेडे, जिल्हा संघटक मंजुषा जाधव तसेच सहाय्यक जिल्हा आयुक्त निर्मला नांदुरकर उपस्थित होते.

या राज्यस्तरीय शिबिरात नागपूर व वर्धा जिल्ह्यातील ५६ बुलबुल गाईड्स सहभागी झाल्या. शिबिरात हस्तकला, विविध खेळ, प्रथमोपचार, प्रार्थना तसेच आत्मविश्वास वाढविणारे उपक्रम यांवर आधारित परीक्षा घेण्यात आली.सहाय्यक परीक्षक म्हणून दीपमाला मानकर, स्मिता पाटील, प्रिया वसाके, संध्या मंगेकर, दिपाली ढोरे, वंदना आंबटकर, योगिता साळवे, रंजीता गजभिये, ज्योती ढोले, ज्योती कुडमती आणि प्राची रोकडे यांनी काम पाहिले.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रियंका ठोसर, हेमलता वाढीवे, राजेश जयस्वाल आणि सुषमा कार्लेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

**NAME IN CHANGE**

My Old Name as per Passport is **Makbulbhai AnwarBhai Chini** and My New Name as per Aadhar and PAN is **Makbool Haji Anwar Chini**, Address: Wardha-442001

**नावात बदल**

माझे पूर्वी **NILESH PRABHAKAR KUKDE** असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन आधार कार्ड वरील **NILESH PRABHAKARRAO KUKADE** हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे. पत्ता :- गजानन नगर मुडे लेआऊट वर्धा 442001

### अर्धशतकानंतर रंगला मैत्रीचा मेळावा

# दहावीच्या वर्गमित्रांचा भावनिक स्नेहमिलन सोहळा

**देवळी/जनमाध्यम**

आयुष्याच्या धावपळीत विखुरलेले दहावीचे वर्गमित्र तब्बल पन्नास वर्षांनंतर पुन्हा एकत्र आले आणि तुळजाई सभागृहात जुन्या आठवणींचा अक्षरशः जागर रंगला. १९७७–७८ च्या बॅचमधील माजी विद्यार्थ्यांच्या या स्नेहमिलन सोहळ्यात गळाभेटी, हशा, अश्रू आणि आठवणींचा ओलावा यांचे अनोखे मिश्रण पाहायला मिळाले.

६४ वर्षे पूर्ण करून ६५ व्या वर्षात पदार्पण केलेल्या या मित्रांनी पत्नीसह उपस्थित राहत दिवस अविस्मरणीय ठरवला. अनेक जण दूरवरून खास या भेटीसाठी आले होते. शालेय जीवन संपून अर्धशतक उलटल्यानंतर झालेली ही भेट उपस्थितांसाठी आनंददायी तेवढीच भावनिक ठरली.



न.प. माध्यमिक शाळेच्या १९७७–७८ च्या दहावी बॅचचा हा विशेष स्नेहमिलन सोहळा श्रीकांत चाफले, विलास मांडवकर आणि विठ्ठल जावंदिया यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आला होता. शालेय शिक्षण पूर्ण होऊन ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वर्गमित्र मनोज टावरी होते. प्रमुख उपस्थिती म्हणून माजी प्राचार्य श्रीराम उमरे, वसंतराव तलमले, अशोक पोटदुखे, कुमुदिनी काकडे तसेच हारगोळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी दिवंगत शिक्षक तसेच मित्र-मैत्रिणींना श्रद्धांजली वाहण्यात आली.

# जिल्हा परिषदेचा ३०.८० कोटींचा अर्थसंकल्प सादर;

## शिक्षण, पाणीपुरवठा व कल्याणकारी योजनांवर भर

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्हा परिषदेचा सन २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठीचा मूळ अर्थसंकल्प तसेच सन २०२५–२६ या आर्थिक वर्षाचा अंतिम सुधारित अर्थसंकल्प जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन यांनी सादर केला. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने शिक्षण, पाणीपुरवठा, समाजकल्याण, महिला व बालकल्याण, कृषी, आरोग्य यांसह विविध विभागांसाठी या अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्यात आली आहे.

सन २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठीचे मूळ अंदाजपत्रक २२ कोटी ५० लाख रुपये इतके असून सन २०२५–२६ या वर्षाचे अंतिम सुधारित अंदाजपत्रक ३० कोटी ८० लाख रुपये इतके आहे. ग्रामीण भागातील विकासकामांना गती देण्यासाठी पंचायत समिती व ग्रामपंचायतींना निधीचे मोठे वाटप करण्यात आले आहे.सन २०२५–२६ या आर्थिक वर्षात पंचायत समिती, ग्रामपंचायत व पंचायत राज कार्यक्रमांसाठी १२ कोटी ११ लाख रुपये राखून ठेवण्यात आले होते. त्याशिवाय बांधकाम विभागासाठी ४ कोटी रुपये, समाजकल्याण विभागासाठी ३ कोटी ६ लाख रुपये, पाणीपुरवठा विभागासाठी ४ कोटी ११ लाख रुपये, तर महिला व बालकल्याण विभागासाठी १ कोटी ७३ लाख रुपये निधीची तरतूद करण्यात आली होती.नवीन आर्थिक वर्षासाठीच्या मूळ अंदाजपत्रकातही ग्रामीण भागातील मूलभूत सुविधा मजबूत करण्यावर भर देण्यात आला आहे. त्यानुसार पाणीपुरवठा विभागासाठी ४ कोटी ६६ लाख रुपये, समाजकल्याण विभागासाठी १ कोटी ५१ लाख रुपये, दिव्यांग कल्याणासाठी ४५ लाख रुपये, महिला व बालकल्याण विभागासाठी ७० लाख ५० हजार रुपये, तर पंचायत समिती व ग्रामपंचायतींशी संबंधित योजनांसाठी ८ कोटी ६३ लाख रुपये निधीची तरतूद करण्यात आली आहे.राज्य शासनाच्या मुख्यमंत्री पंचायत राज अभियानासाठी अर्थसंकल्पात एकूण निधीपैकी १० टक्के रक्कम राखीव ठेवण्यात आली आहे. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण प्रशासन अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

जिल्हा परिषदेच्या शाळांमधील पाचवी, सातवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क जिल्हा परिषद भरणार अशी तरतूद करण्यात आली आहे. तसेच आठवीतील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना (एनएमएमएस) परीक्षेच्या शुल्कासाठीही निधी राखून ठेवण्यात आला आहे.दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठीही या अर्थसंकल्पात विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. या योजनांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी, दिव्यांग नागरिक आणि विविध घटकांना थेट लाभ होईल, असा विश्वास मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन यांनी व्यक्त केला.अर्थसंकल्प सादरीकरणाच्या बैठकीला अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल भोसले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मनोज पाते तसेच जिल्हा परिषदेच्या विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.दरम्यान, प्रशासकीय काळात सादर होणारा हा जिल्हा परिषदेचा चौथा अर्थसंकल्प आहे. यापूर्वी २०२३ व २०२४ मध्ये रोहन घुगे, तर २०२५ मध्ये जितीन रहमान यांनी अर्थसंकल्प सादर केला.

# आष्टीत 'जनता जनसंवाद' कार्यक्रम;

## सायबर गुन्ह्यांबाबत पोलिसांचे मार्गदर्शन



**आष्टी (शहीद)/जनमाध्यम**

दिवसेंदिवस वाढत असलेल्या सायबर गुन्हे, एटीएममधून पैसे काढण्याचे प्रकार तसेच महिलांसह नागरिकांची विविध मार्गाने होणारी फसवणूक रोखण्यासाठी जनजागृती आवश्यक असल्याने उमेद संस्था व आष्टी पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'जनता जनसंवाद' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा मार्गदर्शन कार्यक्रम १० मार्च रोजी सव्वालाखे मंगल कार्यालयात पार पडला.

यावेळी ठाणेदार राजेश जोशी यांनी उपस्थित महिला व नागरिकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, अलीकडच्या काळात सायबर फ्रॉड, डिजिटल अरेस्ट, फेसबुक आदी सोशल मीडियाच्या माध्यमातून फसवणुकीचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. थोडीशीही निष्काळजीपणा केल्यास बँक खात्यातील रक्कम परस्पर काढली जाण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे प्रत्येकाने सतर्क राहणे अत्यावश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.महिलांच्या सुरक्षेसाठी विविध कायदे अस्तित्वात असून त्या कायद्यांची माहिती करून घेऊन महिलांनी स्वतःची सुरक्षितता जपावी, असे आवाहनही त्यांनी केले.उमेद संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनीही सायबर गुन्ह्यांच्या विविध पद्धती, फसवणूक कशी ओळखावी व त्यापासून बचाव कसा करावा याबाबत माहिती दिली. तसेच उपस्थित महिला व नागरिकांनी मांडलेल्या समस्यांचे निराकरण करण्यात आले.आपली फसवणूक होऊ नये यासाठी जागरूकता आणि दक्षता हाच सर्वोत्तम उपाय आहे, असा संदेश यावेळी देण्यात आला.कार्यक्रमास महिला व नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# पळसगावची सखुमाऊली भक्तांच्या श्रद्धेचे जिवंत तीर्थक्षेत्र

वर्धा जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील पळसगाव बाई हे गाव सध्या भक्तिभावाने न्हाऊन निघाले आहे. सिंदी (रेल्वे) स्थानकाच्या दक्षिणेस सुमारे चार किलोमीटर अंतरावर मंदा-नंदा नद्यांच्या संगमावर वसलेले हे गाव श्री संत सखुआईंच्या पावन स्मृतींमुळे 'दुसरे पंढरपूर' म्हणून ओळखले जाते.

विदेही संत म्हणून प्रसिद्ध असलेल्या सखू आईंचे जीवन अत्यंत अलौकिक होते. देहभान नसताना अखंड 'नारायणष्ठ नारायणष्ठ या नामस्मरणात तल्लीन राहणारी ही माय भक्तांसाठी करुणेचा सागर मानली जाते. त्यांच्या जन्मापूर्वीच या भूमीत महान संत अवतरतील, अशी भविष्यवाणी संत केजाजी महाराजांनी मंदिराच्या पायाभरणीवेळी केल्याचे सांगितले जाते.काही वर्षांतच भक्त दांपत्य माता यमुना व पिता लक्ष्मण देवतळे यांच्या पोटी कार्तिक शुद्ध एकादशीला सखुआईंचा जन्म झाला. बालपणापासूनच त्यांच्या ठायी दैवी गुण प्रकट होत असल्याचे ग्रामस्थ सांगतात.सखुमाऊलींच्या चमत्कारांच्या अनेक कथा आजही भक्तिभावाने सांगितल्या जातात. गुलाब पिंजारी नावाचा मुस्लिम युवक दृष्टी गमावल्यावर ताजुद्दीन बाबांकडे गेला असता, त्यांनी त्याला गावातील सखुआईंकडे जाण्यास सांगितल्याची आख्यायिका आहे. सखू आईंच्या चरणी शरण गेल्यानंतर त्याला दृष्टी प्राप्त झाली, असा विश्वास व्यक्त केला जातो. हा दिवस चैत्र शुद्ध तृतीया प्रगट दिन म्हणून साजरा केला



जातो.त्यानंतर पळसगाव हे भाविकांचे श्रद्धास्थान बनले. संकटात सापडलेले, दुःखाने ग्रस्त किंवा मनःशांतीच्या शोधात असलेले लोक येथे येऊन प्रार्थना करतात. 'भाव ज्याचा जसा, फळ तसं अशी श्रद्धा भक्तांमध्ये दृढ आहे.

या पवित्र भूमीला अनेक संतांचा सहवास लाभल्याचे सांगितले जाते. गाडगेबाबा, कैकाडी महाराज, विठ्ठूबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांसारख्या संतांनी येथे येऊन दर्शन घेतल्याची परंपरा सांगितली जाते. संत प्रेमनाथ बाबांनी सखुमाऊलींना गुरु मानून दिग्रस येथे त्यांची प्रतिमा स्थापल्याचेही नमूद केले जाते.दरवर्षीप्रमाणे यंदाही सखुमाऊलींचा १०३ वा प्रगट दिन उत्सव १४ मार्चपासून सुरू होत असून २१ मार्च रोजी काला-दहीहंडी व महाप्रसादाने सांगता होणार आहे. या कालावधीत भजन, कीर्तन, नामस्मरण, धार्मिक कार्यक्रम आणि प्रसाद वितरणाचे आयोजन करण्यात आले आहे. दूरदूरच्या भागांतून भाविक येथे येऊन दर्शन घेतात व मनोभावे प्रार्थना करतात. श्रद्धा, भक्ती आणि शांततेचा अनुभव देणारे हे स्थळ एकदा तरी भेट द्यावे, अशी भावना अनेक भक्त व्यक्त करतात.

**सखुनाम - सुखधाम**

सखुमाऊलींची कृपा सर्वांवर राहो, हीच भक्तांची प्रार्थना.

**शब्दांकन**

**अरुण भट** (माजी सरपंच)
सदस्य श्री सखुबाई दे.प.कमिटी श्री शेत्र पळसगाव बाई

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १०६**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# मोसीकॉल कारखान्याच्या जमिनीची लिलाव प्रक्रिया रद्द होणे शहराच्या विकासासाठी योग्य निर्णय - अनिल अग्रवाल

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहराच्या मध्यवर्ती भागातील विलास नगर परिसरात असलेल्या मोसीकॉल कारखान्याच्या सुमारे २५ एकर जमिनीच्या लिलाव प्रक्रियेला राज्य सरकारने रद्द करण्याचा घेतलेला निर्णय हा अमरावती शहराच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत योग्य व स्वागतार्ह असल्याची प्रतिक्रिया मनपा स्वीकृत नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी व्यक्त केली आहे.

या संदर्भात बोलताना अनिल अग्रवाल म्हणाले की, वेगाने विस्तारत असलेल्या अमरावती शहरात एवढ्या मोठ्या आणि महत्त्वाच्या जागेचा वापर सार्वजनिक कामांसाठी व जनहिताच्या प्रकल्पांसाठी होणे अत्यंत गरजेचे आहे. मात्र ही जमीन अत्यंत नियोजित पद्धतीने लिलाव करण्याचा प्रयत्न सुरू होता, जो शहराच्या भविष्यासाठी योग्य नव्हता.त्यांनी पुढे सांगितले की, ही जमीन मिळविण्यासाठी एका मोठ्या कंत्राटदाराने संपूर्ण यंत्रणा व्यवस्थापित करत निविदा व लिलावाच्या अटी स्वतःच्या सोयीने निश्चित केल्याची माहिती समोर आली होती. या अटी पूर्णपणे अव्यवहार्य होत्या आणि त्याद्वारे जमीन खरेदी करणाऱ्या



कंत्राटदाराला शेकडो कोटी रुपयांचा फायदा होण्याची शक्यता होती. या प्रकरणात काही राजकारणी व अधिकाऱ्यांचीही मिलीभगत असल्याची चर्चा होती.

अग्रवाल यांच्या मते, शहराच्या विकासासाठी व जनतेच्या हितासाठी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार संजय खोडके तसेच कॉंग्रेस नेते व माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी या प्रकरणात ठामपणे आवाज उठवला. यासोबतच आमदार संजय खोडके यांनी या विषयावर विधान परिषदेत लक्षवेधी प्रस्तावही मांडला.या प्रयत्नांमुळे राज्य सरकारने मोसीकॉल कारखान्याच्या जमिनीचा लिलाव रद्द करण्याचा निर्णय घेतला असून, आता या जागेचा वापर सार्वजनिक हिताच्या प्रकल्पांसाठी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अमरावती शहराच्या विकासाला निश्चितच चालना मिळेल, असा विश्वास अनिल अग्रवाल यांनी व्यक्त केला.

# गॅस पुरवठ्याच्या बाबतीत सरकार अपयशी - अनिल अग्रवाल

**अमरावती/प्रतिनिधीः-** सध्या इराण-इस्त्रायल युद्ध आणि खाडी देशांमध्ये निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने अचानक एलपीजीच्या दरांमध्ये वाढ करत रसोई गॅसच्या पुरवठ्यात कपात करण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत मनपा स्वीकृत नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी गॅस पुरवठ्याच्या बाबतीत केंद्र व राज्य सरकार अपयशी ठरत असल्याची टीका केली आहे.

या संदर्भात बोलताना अनिल अग्रवाल म्हणाले की, एलपीजीसह पेट्रोलियम पदार्थांचा पुरेसा राखीव साठा असल्याचा दावा केंद्र सरकारकडून वारंवार केला जात होता. मात्र केवळ आठवड्याभरातच गॅसच्या दरवाढीबरोबर पुरवठ्यात कपात झाल्याने हे दावे हवेत विरले असल्याचे दिसून येत आहे.

घरगुती गॅस सिलेंडरच्या दरांमध्ये अचानक झालेल्या वाढीमुळे सर्वसामान्य कुटुंबांचे घरगुती बजेट कोलमडले आहे. तसेच बुकिंग केल्यानंतर प्रतीक्षा कालावधी वाढवण्यात आल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

याशिवाय कमर्शियल गॅस सिलेंडरचा पुरवठा कमी झाल्याने अनेक हॉटेल, रेस्टॉरंट आणि भोजनालयांना अडचणींचा सामना करावा लागत असून काही ठिकाणी व्यवसाय बंद ठेवण्याची वेळ आली आहे. त्यामुळे हजारो लोकांच्या रोजगारावरही परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान या समस्येचे ठोस समाधान काढण्याऐवजी राज्य सरकारने राज्यातील ३६ पैकी २३ जिल्ह्यांतील सुमारे १२ कोटी लोकसंख्येसाठी केरोसीनच्या कोट्यात केवळ ४० हजार लिटरची वाढ केली आहे. ही वाढ म्हणजे जनतेची थट्टाच असल्याची टीकाही अग्रवाल यांनी केली.


## पाहिजे

बु.रामरावजी खंडारे बहुउद्देशीय समाज विकास संस्था उपराई द्वारा मेडिटेशन सेंटर बांधकाम करिता प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्ती करायची आहे. करिता अनुभवी प्रकल्प सल्लागार व्यक्तींनी त्वरीत संपर्क साधावा.

**अध्यक्ष**
बु. रामरावजी खंडारे बहुउद्देशीय समाज विकास संस्था उपराई ता. दर्यापुर जि.अमरावती मो. ९३७०४९१५८२

## पाहिजे

अमरावती, अचलपूर व वरूड येथे नामांकित लॉ फर्म मध्ये युवक व युवतींना पार्ट टाईम काम करण्याची संधी.
शिक्षण- १२ वी पास
पगार- १०,००० + टिए डिए + कमीशन (ट्रेनिंग झाल्यावर पगार वाढ व ईतर इन्क्रिमेंट्स)
**संपर्क - ९६०७५८२०९४**


## चौकशीची नोटीस

(नमुना क्र.०२)
सार्वजनिक विश्वस्त क्रमांक ९०७/२०२५
(सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, सन १९५० याचे कलम २२ अन्वये)
सन २०२५ चा अर्ज क्र९०७/२२/२०२५

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी क्रमांक: **विदर्भ लोकविकास समिती, अचलपूर, अमरावती ता.अचलपूर, जि.अमरावती एफ-५२०५**

श्री/सौ/कु./श्रीमती ---------------------------------------------------यांस

ज्याअर्थी, खाली सही करणार याजकडून वरील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थे संबंधात कलम १८ अन्वये केलेला अर्ज कलम १९/२२/२२-अ/२८/५०(अ)/किरकोळ) नोंद दाखल करण्यासाठी चौकशी करण्यात येणार आहे.

सदरच्या तुम्हास ही नोटीस देण्यात येत आहे आणि फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधीमार्फत किंवा योग्य रितीने सूचना दिलेल्या वकीलामार्फत, खाली सही करणार यांचेसमोर वर दिलेल्या पत्त्यावर तारीख १० माहे ०३ सन २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वरील बाबींचा अखेरचा निकाल करण्यासाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर रहावे आणि चौकशी संबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्यासंबंधीचा तोंडी व दस्तऐवजाच्या रुपातील सर्व पुरवा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यास तुम्ही कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत सदरहू चौकशी होईल. तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल, अशी तुम्हास नोटीस देण्यात येत आहे.

आज दिनांक २३ माहे ०२ सन २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व सहायक धर्मादाय आयुक्त-०१ अमरावती यांच्या शिक्क्यानिशी दिली. रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक,(न्याय)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती विभाग, अमरावती

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 12/09/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक: **श्री.संत गजानन महाराज संस्थान ट्रस्ट, सोनेगांव खेर्डा ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री.संजय रामचंद्र देशमुख**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--
(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - १) मौजा सोनेगांव खेर्डा, ग्रामपंचायत सोनेगांव खेर्डा, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती येथील माझे नांवाचे व मालकीचे ताब्यातील गट नं.८५ मालमत्ता नं.४७८ वर्णन खालीलप्रमाणे -- ४० बाय ५० एकुण क्षेत्रफळ २००० पैकी ४०० चौ.फुट जागेवर असणारे श्री.संत गजानन महाराज मंदिर व उर्वरित १६०० चौ.फुट खाली जागा याची चतुःसिमा--
पुर्वेस - भातकुली सोनेगांव खेर्डा रोड
पश्चिमेस - संजय देशमुख यांचे शेत
दक्षिणेस - सरकारी पांदन
उत्तरेस - जयंत श्रीनिवास देशमुख यांचे शेत

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक १०.०३.२०२६ रोजी दिली.

शिक्का
**(श्रीमती वाय.एस.शेख)**
**अधीक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.८७/२०२६ ने.ता.३०.०३.२०२६

**अर्जदार :** १. कुसूम वसंतराव देशमुख, वय ७८ धंदा - घरकाम
२. संजय वसंतराव देशमुख, वय ६३ धंदा - शेती
३. श्रीमती उषा अविनाश देशमुख, वय ६४ धंदा - घरकाम
सर्व रा.बेलोरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
४. अपर्णाबिन दत्तात्रय देशमुख, वय ५५ धंदा - घरकाम
रा.जी-५०१, प्रगती नगर, पिपलोड, सुरत गुजरात

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार : निरंक**

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत वसंतराव शामराव देशमुख** यांचा मृत्यू दिनांक **१०.०५.२०२३** रोजी बेलोरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.४८/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााणपत्र देण्यात येईल.

आज दि. **२७.०२.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.४२६/२०२६
**शालिनी व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१०.०४.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Shalini Murlidhar Upadhye, Age 92 Yrs. Occu.: Nil R/o Huose No.18, Wadali Road, Nandanvan Colony, Chaprasipura, Amravati
2. Sanjay Murlidhar Upadhye, Age 71 Yrs. Occu.: Pvt. Job R/o 403, Ambrosia Disti Acres, Shaikh Mishree Road, S.M.Road Near Antop Hill Bus Depot, Wadala East Mumbai
3. Geeta Omprakash Bambawale, Age 69 Yrs.Occu.: HOusehold R/o Flat No.106, Gokul Park, Tower-3, Besa Road, Near Kachore Lawn, Manisha Nagar, Besa Nagpur

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत मुरलीधर किष्णराव उपाध्याय** यांचे दिनांक **२६.०७.२००७** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार शालिनी व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शालिनी व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०५.०३.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

प्रो.नं.८३०/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.११.०३.२०२६

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय
किरकोळ अर्ज क्र./१३३/२०२६ दिनांक १३.०४.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार -** १. रमेशचंद्र रामचंद्र आगाशे, वय ७३ वर्षे, धंदा - सेवानिवृत्त
रा.भवानी वेश, दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती
२. राजेश ज्ञानदेव आगाशे, वय ५१ वर्षे, धंदा - नोकरी
रा.लाल बहादुर शास्त्री नगर, बुलढाणा, ता.जि.बुलढाणा

**--- विरुध्द ---**

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **रामचंद्र उकर्डाजी आगाशे** हे दिनांक **२४.०९.१९८०** रोजी व त्यांची पत्नी **देवकाबाई रामचंद्र आगाशे** ही दिनांक **०७.०९.२००० रोजी** मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** मयत **रामचंद्र उकर्डाजी आगाशे व देवकाबाई रामचंद्र आगाशे** यांचे नांवे मौजा दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथे अनु.क.३७०, वार्ड नं.७ मालमत्ता नं.३१, अनु.क.३७१ वार्ड नं.७ मालमत्ता नं.३२ येणेप्रमाणे जागा आहे. सदर जागेचा बाजारभाव मूल्य रु.२५,०००/ आहे.

आज दि.११.०३.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१२७/२०२६ ने.ता.२१.०४.२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती मीना बाबाराव अवतारे, वय ५१ धंदा - घरकाम
२. वैशाली बबनराव कराळे, वय ३२ धंदा - घरकाम
३. रुपाली चेतनराव धरपाळे, वय ३० धंदा - घरकाम
४. विशाल बाबाराव अवतारे, वय २८ धंदा -
अर्जदार नं.१ व ४ रा.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार नं.२ रा.यसुरना, ता.जि.अमरावती
अर्जदार नं.३ रा.निमखेड, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार : निरंक**

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत श्री.बाबाराव नागोराव अवतारे** यांचा मृत्यू दिनांक **२१.०४.२०१६** रोजी आजाराने शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१२७/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााणपत्र देण्यात येईल.

आज दि. **११.०३.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

महाराष्ट्र शासन
**सहकार पणन व वस्त्रोउद्योग विभाग**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती**
**सहकार संकुल, पहिला माळा, कांतानगर, कॅम्प, अमरावती**
**दुरध्वनी क्र. ०७२१-२६६१६३३ Email-ddr_amr@rediffmail.com**
जा.क्र. जिउनिअम/वि-१/महिला ना. सह.पत.म.अच/अप. प्रा.प्र./१३५०/२०२६ दिनांक : १३ /०३/२०२६

## जाहीर नोटीस

**प्रति,**
**१.** श्री. पुरुषोत्तम सुरेशराव देवहाते रा. खापर्डे प्लॉट, परतवाडा ता. अचलपुर जि. अमरावती. (कर्जदार)
**२.** श्री. मंगेश जनार्धन भोरे, रा. ब्राह्मणसभा कॉलनी, परतवाडा. (जामीनदार)
**३.** श्री. श्रीकांत मधुकरराव काळे रा. येसुर्णा ता. अचलपुर जि. अमरावती. (जामीनदार)

**विषय** - सुनावणीस उपस्थित राहणेबाबत नोटीस
**संदर्भ** - विशेष वसुली व विक्री अधिकारी अमरावती जिल्हा सहकारी पतसंस्थाफेडरेशन मर्या. अमरावती यांचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त दिनांक ०२.०५.२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने विशेष वसुली व विक्री अधिकारी अमरावती जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या. अमरावती यांचा सदरचे कर्ज प्रकरणास अपसेट प्राईज किंमत कायम करून मिळण्याबाबत प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. त्यानुषंगाने या कार्यालयाने दिनांक ११/०७/२०२५ व दि ०९/१०/२०२५ रोजी नोटीस देण्यात येऊन सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु सदर सुनावणीस गैरअर्जदार श्री. पुरुषोत्तम सुरेशराव देवहाते रा. खापर्डे प्लॉट, परतवाडा ता. अचलपुर जि. अमरावती हे हजर झाले नाही किंवा त्यांचे म्हणने या कार्यालयास प्राप्त झाले नाही.

तेव्हा या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, दि २४/०३/२०२६ रोजी दु ३.०० वाजता आवश्यक त्या कागदपत्रासह सुनावणीकरिता या कार्यालयात उपस्थित राहावे. आपण सुनावणीस उपस्थित न झाल्यास उपलब्ध कागदपत्राच्या आधारे पुढील योग्य तो कायदेशीर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(शंकेर कुंभार)**
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, अमरावती

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१३०/२०२६ ने.ता.२८.०४.२०२६

**अर्जदार :** १. रजनी मधुकर मेसकर, वय ४५ धंदा - घरकाम
२. हरीश मधुकरराव मेसकर, वय २७ धंदा - शिक्षण
३. योगेश मधुकरराव मेसकर, वय २५ धंदा - शिक्षण
४. धर्मेंद्र मधुकरराव मेसकर, वय २४ धंदा - शिक्षण
सर्व रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार : निरंक**

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत मधुकर एकनाथराव मेसकर** यांचा मृत्यू दिनांक **१०.०२.२०२६** रोजी रा.शिवाजी महाराज चौक, अकोट, ता.अकोट, जि.अकोला येथे झाला. तसेच मृतक **गिताबाई एकनाथराव मेसकर** हिचा मृत्यू दि.**२४.०८.२०१४** रोजी रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१३०/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााणपत्र देण्यात येईल.

आज दि. **१२.०३.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१८४/२०२६ ने.ता.१५.०४.२०२६

**अर्जदार -** १. रिना किशोर मनोहरे, वय ३८ वर्षे, धंदा - गृहिणी
रा.पिंपळपुरा, चांदुर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. रुपाली मनोज कडू, वय ३४ वर्षे, धंदा - गृहिणी
रा.थुगांव खानापूर, ता.जि.अमरावती
३. शेषराव बजरंग वानखडे, वय ६० वर्षे, धंदा - मजुरी
रा.रिध्दपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. रोहीत विलास ढोके, वय २३ वर्षे, धंदा - मजुरी
५. लकी विलास ढोके, वय २३ वर्षे, धंदा - मजुरी
अर्जदार नं.४ व ५ रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

सर्व लोकांस नोटीसद्वारे कळविण्यात येते की, **मयत मनकर्णा शेषराव वानखडे** यांचे निधन दिनांक **२८.०१.२०२६** रोजी राहते घरी रिध्दपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे झाले आहे. अर्जदार हे मृतकाचे कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरिक्त मृतकाला दुसरे कोणीही वारस नाही. मयतांचे वारसांना विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयीन कामाकरीता वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

अर्जदारांनी वारसाचे प्रमाणपत्र मिळण्यास वि.दिवाणी न्यायाधीश साहेब, मोर्शी येथे अर्ज केला असून अर्जावर कोणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी प्रसिध्दी तारखेपासून एक महिन्याचे आत वि.कोर्टात आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा तुमचे गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होवून निर्णय दिल्या जाईल, याची नोंद घ्यावी.

दिनांक १२.०३.२०२६

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 1046/25 कलम -22
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक: **मागासवर्गीय आदिवासी बहुउद्देशीय संस्था, विलास नगर,अमरावती, ता. जि.अमरावती एफ-२१४६५**
बाबत अर्जदार - **राजकुमार संजय डोंगरे**
गैरअर्जदार - **१) निलेश बबनराव दुरतकर, २) मिलिंद माणिकराव बनसोड, ३) मंगेश सुधाकरराव कटनकर**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये आपणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक १२.०३.२०२६ रोजी दिली.

शिक्का
**(र.र.ठाकरे)**
**अधीक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती विभाग, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.४६९/२०२६
**श्रीमती कुंदा अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.१०.०४.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Smt.Kunda Suresh Varsale, Age 80 Yrs. Occu.: Housewife
2. Shri Sandeep Suresh Varsale, Age 54 Yrs. Occu.: Service Both R/o Vivekanand Colony, Amravati.
3. Sau.Smita Shrikant Gangane, Age 51 Yrs. Occu.: Housewife R/o Bldg.No.2-O, Flat No.33, 9th Floor, Aditya Garden City, Survey No.109, 110, Warje Pune-411058
4. Sau.Rupali Mangesh Kulkarni, Age 48 Yrs. Occu.: Housewife R/o 1205, Rutu River Near K.M.Agrwal College, Gandhari, Kalyan, Dist. Thane-421301

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सुरेश गणेश वरसाळे** यांचे दिनांक **०६.०२.२०२६** रोजी **राजुरा, ता.जि. अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार कुंदा अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कुंदा अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१३.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२७६/२०२६
**श्रीमती कुमूद अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.०४.०४.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Kumud Vinayak Deshpande, Age 82 Yrs. Occu.: Household R/o Prabhat Colony, Shilangan Road, Amravati.
2. Rajesh Vinayak Deshpande, Age 57 Yrs. Occu.: Retired R/o Flat No.301-A, Ganpati Enclave Hanuman Nagar, Nagpur
3. Anjali Vinayak Deshpande, Age 55 Yrs. Occu.: Household R/o Prabhat Colony, Shilangan Road, Amravati.
4. Anuradha Jayant Deshpande, Age 51 Yrs. Occu.: Service R/o Vishwakarma Colony, Kandli, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत विनायक यशवंत देशपांडे** यांचे दिनांक **२३.०९.२०२१** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार कुमूद अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कुमूद अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२०.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.३९०/२०२६
**श्रीमती श्रीकृष्ण -वि- निरंक**
पुढील ता.०२.०४.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Shrikrushna Mahadeorao Balapure, Age 50 Yrs. Occu.: Labour R/o Rahatgaon, Shivaji Nagar, Amravati. Tq.Dist.Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सुनंदा महादेवराव बाळापुरे** यांचे दिनांक **३१.०७.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार श्रीकृष्ण विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीकृष्ण विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०७.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.३४३/२०२६
**श्री.मनोहर अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.०१.०४.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Manohar Shriram Nandedkar, Age 68 Yrs. Occu.: Labour R/o Near Hanuman Mandir, Mu.Rajura, Po.Wadgaon Mahore, Amravati.
2. Nirmala Suresh Munjale, Age 63 Yrs. Occu.: Household R/o Near Mankar Galli, Rahul Jewller, Kharraiya Nagar, Mahendra Colonyn, Amravati
3. Mohan Shriram Nandedkar, Age 57 Yrs. Occu.: Labour R/o At Rajura Wadgaon Mahore, Po.Amravati Camp, Amravati
4. Savita Sanjayappa Munjale, Age 53 Yrs. Occu.: Household R/o Near Ram Mandir, Kharraiya Nagar, Galli No.1, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत श्रीराम अण्णा नांदेडकर** यांचे दिनांक **११.१०.२०१७** रोजी **राजुरा, ता.जि. अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार मनोहर अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मनोहर अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०२.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १८५**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### विद्यापीठात महिलांकरिता आरोग्य तपासणी शिबीर

**अमरावती-**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आरोग्य केंद्राच्यावतीने महिला व विद्यार्थीनींकरिता आरोग्य तपासणी शिबिर यशस्वीरित्या घेण्यात आले. शिबिरामध्ये बी.पी. ब्लड शुगर, सी.बी.सी., एचबीए वन सी आदी तपासण्या करण्यात आल्या. जवळपास १२० महिलावर्गानी या शिबिराचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. हेमलता नांदुरकर, प्रमुख मार्गदर्शक म्हणून अमरावतीच्या प्रसिध्द स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सोनाली शिरभाते, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. सपना गुप्ता, विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. मंगेश मेंढे, आरोग्य केंद्राच्या आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात यांची उपस्थिती होती. मार्गदर्शन करतांना डॉ. सोनाली शिरभाते म्हणाल्या, याप्रसंगी डॉ. मंगेश मेंढे यांनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील सोयीसुविधांविषयी उपस्थितांना माहिती दिली. प्रास्ताविकातून आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात यांनी महिलांच्या आरोग्य तपासणी शिबिराच्या आयोजनाची भूमिका सांगितली. सूत्रसंचालन डायबेटिक असोसिएशनचे जनसंपर्क अधिकारा राजेश पिदडी यांनी केले. शिबिराला विद्यापीठातील महिला अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.



### आदिवासी भटक्या जनसमुदायासमोर भजन, पोवाड्यातून प्रबोधन

**परतवाडा-**साधुसंतांचे काम केवळ धार्मिक पुजाविधीपुरतेच मर्यादित नसून अखिल मानव समाजाला सुयोग्य दिशा व मार्गदर्शन करून त्यांचा सर्वांगीण विकास साधणे हा आहे. आजवरच्या सकल साधुसंतांनी रंजल्या-गांजल्या व दीन-दलितांची तसेच आदिवासी विमुक्त भटक्या जनसमुदायाची सेवा करून हे स्वकर्तृत्वातून सिद्ध केले.प्रत्येकाचे आद्यकर्तव्य असल्याचे प्रतिपादन दूरदर्शन व आकाशवाणी लोक-कलावंत प्रमोद पोकळे गुरुजी यांनी केले.त्यानंतर अ. भा. श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे जीवन-प्रचारक तथा जिल्ह्यातील दूरदर्शन व आकाशवाणी लोक-कलावंत प्रमोद पोकळे गुरुजी यांनी भजने व पोवाडा सादर करून आरोग्य, सुसंस्कार, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा व अनिष्ट रूढी-परंपरा निर्मूलन, राष्ट्रीय एकात्मता, स्वच्छता, सामाजिक सलोखा, देशभक्ती, पाणी पुनर्भरण, गोपालन व वृक्ष-संवर्धन अशा अनेक विषयांवर प्रबोधन केले. या प्रबोधनाने उपस्थित आबालवृद्ध महिला-पुरुष व तरुण मंत्रमुग्ध झाले. यावेळी गावाचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील व गावातील प्रतिष्ठित नागरिक महिला-पुरुष उपस्थित होते.



### नवसारी प्रभागात छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन

**अमरावती-**हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती, पराक्रमी आणि धर्मरक्षक म्हणून ओळखले जाणारे छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त अमरावती शहरातील नवसारी प्रभागात भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमादरम्यान छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्य, धर्म आणि स्वाभिमानासाठी दिलेल्या महान बलिदानाचे स्मरण करत त्यांच्या पराक्रमाला सलाम केला.यावेळी उपमहापौर सचिन भेंडे, गटनेते नानाभाऊ आमले, नगरसेविका सौ. प्रीतीताई रेवणे, नगरसेवक योगेश विजयकर तसेच इतर सहकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या मनोगतात छत्रपती संभाजी महाराजांचे धैर्य, पराक्रम आणि स्वराज्याप्रती असलेली निष्ठा यांचे स्मरण केले.या कार्यक्रमाच्या माध्यमातून उपस्थितांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या विचारांचे आणि आदर्शांचे स्मरण करत समाजात एकता, धैर्य आणि राष्ट्रभक्तीची भावना दृढ करण्याचा संकल्प केला. कार्यक्रम शांततेत आणि उत्साहात पार पडला.

### धामणगाव गढीमध्ये अस्वलचा मुक्त संचार

**अचलपूर-**धामणगाव गढी मध्ये १२ मार्च रोजी पहाटे ५



दरम्यान गावात अस्वलाचा मुक्त संचार असल्याचे चित्र सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.गावातील पांडे नामक ग्रामस्थ यांनी घराच्या परिसरात लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात हे कैद झाले.यामुळे तत्काळ वन विभागाने ठोस उपाययोजना राबविण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते नीलेश फाटकर यांनी केली आहे.त्यांनी अचलपूर वन परिक्षेत्र अधिकारी यांना निवेदन सुद्धा दिले आहे.वन विभागाचे पथकांनी गावात पाहणी करून पुढील तपास करीत असल्याची माहिती मिळाली आहे.

# राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिराचा उत्साहात समारोप

## मेळघाटातील निसर्ग अनुभव युवकांसाठी एक जीवनदायी शिक्षण-डॉ.रवींद्र कडू

**अमरावती/का.प्र.**

निसर्ग आणि मानवाचे नाते उलगडण्यासाठी ट्रेकिंग हे एक उत्तम माध्यम असून, त्यातून मिळणारा अनुभव हा खऱ्या अर्थाने जीवनाचे शिक्षण देणारा असतो, असे प्रतिपादन राज्यपाल नामीत व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रवींद्र कडू यांनी केले. महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने दि.७ ते ११ मार्च दरम्यान चिखलदरा येथील वन प्रशिक्षण संस्था येथे राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबीर आयोजित करण्यात आले होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी रा.से.यो. चे संचालक डॉ. निलेश कडू, विद्यापीठ अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर, प्राचार्य डॉ. राजेश जयपूरकर,सुप्रसिद्ध आर्किटेक्ट उमेश पाटणकर, वन प्रशिक्षण संस्थेचे वनपरिक्षेत्र अधिकारी राघवेंद्र मुन, वंदना मुन तसेच पाचही जिल्ह्यांचे रा.से.यो. जिल्हा समन्वयक उपस्थित होते.



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ ठरले उत्कृष्ट विद्यापीठ

डॉ. रवींद्र कडू पुढे म्हणाले, मेळघाटातील जैवविविधतेचा अनुभव घेण्यासाठी येथे आलेल्या स्वसंसेवकांनी निसर्ग संवर्धनाला महत्त्व दिले पाहिजे.मेळघाटातील जंगलात आजही अशा अनेक वनस्पती आहेत ज्यांचा अद्याप शोध लागलेला नाही. संशोधकांसाठी हे क्षेत्र मोठे आव्हान आणि संधी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नसून, ती 'अनुभवांची गोळाबेरीज' आहे. ट्रेकिंगमुळे व्यक्तीचे चारित्र्य आणि व्यक्तिमत्व घडण्यास मदत होते. भारतामध्ये युवकांचे प्रमाण जगात सर्वाधिक आहे. विकसित भारताकडे वाटचाल करताना युवकांचा वाटा अत्यंत महत्त्वाचा असल्याचेहि त्यांनी यावेळी नमूद केले.

**नियोजन आणि सळसळते रक्तच घडवेल देशाची प्रगती - डॉ. निलेश कडू**

अध्यक्षीय भाषण करतांना डॉ. निलेश कडू म्हणाले, दैनंदिन जीवनात शिस्त आणि नियोजनाचे महत्त्व अधोरेखित करताना, शांत डोक्याने केलेले नियोजन आणि युवकांमधील सळसळते रक्तच देशाच्या प्रगतीसाठी आणि सामाजिक सुधारणेसाठी कारणीभूत ठरेल, असा विश्वास विद्यापीठ रासेयो विभागाचे संचालक डॉ. निलेश कडू यांनी राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिराच्या समारोपिय कार्यक्रमात व्यक्त केला. ते पुढे म्हणाले कि 'एका हाताने टाळी वाजत नाही,' या म्हणीचा आधार घेत त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांची साथ आणि आमचा प्रयत्न' यातूनच विकासाचे ध्येय गाठता येईल, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले

**साहसी खेळातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व- डॉ. जयंत वडतकर**

विद्यार्थ्यांमध्ये साहसी वृत्ती निर्माण करण्यासाठी आणि त्यांना विविध खेळांची तांत्रिक माहिती देण्यासाठी चिखलदरा येथे पाच दिवसीय साहसी क्रीडा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिर केवळ मनोरंजनासाठी नसून, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळावी या उद्देशाने आयोजित करण्यात आले होते. चिखलदऱ्याच्या या भूमीवर उपलब्ध असलेल्या भौगोलिक परिस्थितीचा वापर करून विद्यार्थ्यांना साहसी खेळांचे उत्कृष्ट प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

उपकरणांची ओळख आणि त्यांच्या वापराचे तंत्र आत्मसात केल्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढल्याचे चित्र पाहायला मिळाला असल्याचे त्यांनी सांगितले

पाच दिवस चाललेल्या या साहसी क्रीडा शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी ॲडव्हेंचर,प्रात्यक्षिके, सांस्कृतिक, शिस्त व वागणूक आणि लेखी परीक्षा अशा विविध अक्टीव्हीटीमध्ये सहभाग घेतला. परीक्षकांनी सर्व प्रकारांचे मूल्यांकन करून त्यांना सन्मानित करण्यात आले. यामध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांनी उत्कृष्ट विद्यापीठ पुरस्कार पटकाविला. तसेच उत्कृष्ट संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. सचिन चव्हाण, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व प्रा.अर्चना श्रीचिपा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तर उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून प्रथमेश चाटे, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी व रंजित जाधव, मुंबई विद्यापीठ, श्रृष्टी राणे, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, पारुल तिवारी, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई याचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तर ॲडव्हेंचर हब चे मनीष ढाकुलकर व त्यांच्या संपूर्ण टीमचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या पाचही दिवसाचे अहवाल वाचन डॉ. विशाल गजभिये यांनी केलेसूत्रसंचालन डॉ. सुधीर कोहचाळे , तर आभार डॉ. विकास देशमुख यांनी मानले. शिबिराकरीता राज्यभरातील १९ विद्यापीठातील ९८ विद्यार्थी व १५ संघ व्यवस्थापक,विद्यार्थी, स्वयंसेवक, संघ व्यवस्थापक, राष्ट्रीय सेवा योजना विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री. जगदंबा व्यायाम शाळेतर्फे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती

**अचलपूर/वार्ताहर**

श्री जगदंबा व्यायाम शाळा द्वारा आयोजित तिथीनुसार सार्वजनिक शिव जयंती अचलपूर शहरात उत्साहात साजरा. यामध्ये पारंपरिक वाद्याच्या गजरात ढोल ताशे, वारकरी दिंडी , व्यायाम शाळेची प्रात्यक्षिके तसेच विविध प्रकारचे देखावे, घोडे,पालखी,रथ जिवंत झाक्या तयार करण्यात आल्या होत्या.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भूमिकेत अभिजीत गाडबैल, छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेत अमोल चीरडे, छत्रपती राजाराम महाराजांच्या भूमिकेत रितिक अकोलकर व जिजा मातेच्या भूमिकेत प्राजक्ता सिरसुद्धे व सईबाई च्या भूमिकेत श्रेया मांडेकर, ताराबाईच्या भूमिकेत शर्वरी शहाणे, राणू अक्काच्या भूमिकेत पंखुडी चव्हाण,राणी लक्ष्मी बाई च्या भूमिकेत रिद्धी भुजाडे,हिरकणीच्या भूमिकेत खुशी रायकवार,अहिल्याबाई होळकर यांच्या



भूमिकेत राधिका गभणे तसेच मावळ्यांच्या भूमिकेत अक्षय कुसराम,वतन लोणारे, प्रियांशु बुरंगे,सौरभ राजस, प्रज्वल देवगिरकर,आकाश तेल्हारकर यांनी हुबेहूब भूमिका साकारल्या. शोभायात्रा यशस्वी करण्याकरिता व्यायाम शाळेचे अध्यक्ष अजय भुजाडे, सचिव विजय भुजाडे यांच्या मार्गदर्शनात पवन पुसे, वसंत शेंद्रे उमेश इंगोले,रवी गंजीवाले,वैभव बोकडे श्याम मांडेकर, प्रणव नंदनवार,चेतन ठाकरे, ऋषी झोंबाळे,ओम रोटे,प्रथम मांडेकर, मानव माथने,हर्षल मांडेकर,स्वराज डांगे,दीपेश भुजाडे,रुपेश इंगळे,आनंद गाठे, मुकेश भिसे,मंगेश मोहोड,ऋषी इंगळे ,चेतन भुजाडे आणि व्यायाम शाळेतील विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. यामध्ये आ.प्रवीण तायडे,नगराध्यक्ष रुपाली माथने,माजी जिल्हा परिषद सदस्य वासंती मंगरोले ,नेहा वाजपेयी, नगरसेविका पद्मिनी बेंडे,भाजपा जिल्हा महामंत्री सुधीर रसे डॉ.आतिश रोडगे,अतुल लकडे ,विजय पिंपळकर, अभय माथने, सुनील खानझोडे,बंटी केजडीवाल,अभय वाजपेयी,छोटू लाडोळे,पवन जडिये,विनय चतुर,नील माहेश्वरी अशोक बेंडे,सुशांत चेडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## राजेशसिंग बावरी यांची निवड

**तिवसा-**जिल्हा परिषद शाळा आनंदवाडी स्थानिक शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी राजेशसिंग बावरी यांची निवड करण्यात आली आहे.त्यांच्या निवडीमुळे पालक व ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.राजेश बावरी हे सामाजिक कार्यात सक्रिय असून शाळेच्या विकासासाठी, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी तसेच शाळेतील सुविधा सुधारण्यासाठी ते प्रयत्नशील राहतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.नवीन अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर राजेश बावरी यांनी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक, पालक व



ग्रामस्थांच्या सहकार्याने काम करण्याची भूमिका व्यक्त केली.यावेळी शाळा व्यवस्थापन समिती सदस्य कविता बनसोड, उपाध्यक्ष सिद्धार्थ मुंद्रे ,सदस्य आकाशसिंग बावरी, सदस्य निलेश खडसे, सदस्य गोलू उईके,सदस्य मनीषा इंगळकर, सदस्य खैरुणिसा पठाण ,सदस्य प्रीती भुरभुरे नगरसेविका, ममता सोळंके शिक्षक प्रेमी, किशोर तीखाडे सदस्य शिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## 'स्वाधार'च्या प्रलंबित अर्जांसाठी मोहीम

### त्रुटी दूर करण्यासाठी १६ मार्चपासून कार्यशाळेचे आयोजन

**अमरावती/क्रा.प्र.**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी समाज कल्याण विभागातर्फे विशेष कार्यशाळेचे आयोजन १६ ते २० मार्च २०२६ या कालावधीत दुपारी ३ ते ५ या वेळेत सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय,अमरावती येथे करण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज केवळ तांत्रिक त्रुटींमुळे किंवा कागदपत्रांच्या अपूर्ततेमुळे प्रलंबित आहेत, त्यांच्यासाठी अमरावती समाज कल्याण विभागातर्फे याकार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेमुळे विद्यार्थ्यांच्या अर्जांचा मार्ग मोकळा होणार असून, त्यांना शैक्षणिक भत्ता मिळण्यास मदत होणार आहे.शहरात उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या मोठी असते, मात्र शासकीय वसतिगृहांची प्रवेश क्षमता मर्यादित असल्याने अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहतात. अशा विद्यार्थ्यांचा निवास, भोजन आणि इतर शैक्षणिक खर्च सुसह्य व्हावा यासाठी शासन 'स्वाधार' योजनेअंतर्गत थेट बँक खात्यात रक्कम जमा करते. मात्र, ऑनलाइन अर्ज भरताना उत्पन्नाचा दाखला, आधार लिंकिंग किंवा बँक खात्याच्या माहितीमध्ये झालेल्या चुकांमुळे अनेक अर्ज 'Sent Back' (परत) केले जातात. विद्यार्थ्यांची अडचण ओळखून समाज कल्याण विभागाने ही कार्यशाळा आयोजित केली आहे.या कार्यशाळेत विद्यार्थ्यांच्या अर्जांमधील त्रुटी जागेवरच तपासून त्या कशा दूर कराव्यात, याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन केले जाणार आहे. ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज तांत्रिक कारणास्तव रखडले आहेत, त्यांनी आपले मूळ कागदपत्रे, ऑनलाइन अर्जाची प्रत आणि लॉगिन आयडीसह या कार्यशाळेत उपस्थित राहावे, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्तांनी केले आहे. या उपक्रमामुळे पात्र विद्यार्थ्यांच्या खात्यात योजनेची रक्कम जमा होण्याची प्रक्रिया गतिमान होणार आहे.

## आरोग्य विभागाच्या तत्परतेमुळे मातेचे वाचले प्राण

### अचलपूरच्या मडकी येथील आरोग्य चमूची कामगिरी

**अमरावती/का.प्र.**

कर्तव्यदक्षता आणि वेळेवर घेतलेला अचूक निर्णयामुळे अचलपूर तालुक्यातील मडकी येथे जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या चमूने केलेल्या अथक परिश्रमामुळे एका अतिजोखमीच्या मातेचे आणि तिच्या नवजात बालकाचे प्राण वाचविण्यात यश आले आहे. 'मिशन २८०' अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या गृहभेटी दरम्यान गरोदर मातेच्या आरोग्याचा धोका लक्षात आल्याने ही तत्परता दाखवण्यात आली, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिली.

मडकी येथील रहिवासी मीनाक्षी अमोल धांडे या गरोदर मातेच्या घरी आशा स्वयंसेविका आणि अंगणवाडी सेविका भेटीसाठी गेल्या असता, मातेच्या पायावर सूज असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. सुरुवातीला कुटुंबाने माहिती देण्यास टाळाटाळ केली, मात्र आरोग्य सेविकांनी तत्परतेने वैद्यकीय अधिकाऱ्यांना याची सूचना दिली. डॉ. नीता निगोळे, डॉ. प्रशांत ढोके आणि प्रविणा धाकडे यांनी मातेची तपासणी केली असता, त्यांचा रक्तदाब अत्यंत धोकादायक पातळीवर असल्याचे आढळले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून आरोग्य पथकाने कुटुंबाचे सविस्तर समुपदेशन केले आणि गरोदरपणात रक्तदाब वाढल्याने उद्भवणाऱ्या जीवघेण्या धोक्यांची जाणीव करून दिली. यावेळी मातेला तातडीने अचलपूर आणि त्यानंतर अमरावती येथील डफरिन रुग्णालयात हलविण्यात आले. डफरिन रुग्णालयात वेळेवर उपचार मिळाल्याने मातेने एका गोंडस कन्येला सुखरूप जन्म दिला. सध्या माता आणि बाळ दोन्ही सुरक्षित असून, जिल्हा प्रशासनाच्या 'सुरक्षित मातृत्व अभियाना'चे हे यश मानले जात आहे.

## डॉ.राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च अमरावतीला स्वायत्त दर्जा

### तांत्रिक शिक्षणाच्या क्षेत्रात नवे पर्व;विद्यार्थ्यांसाठी आधुनिक व उद्योगाभिमुख शिक्षणाची संधी

**अमरावती/का.प्र.**

विदर्भातील तांत्रिक शिक्षण क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केलेल्या डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, अमरावती या प्रतिष्ठित अभियांत्रिकी महाविद्यालयाला नुकताच स्वायत्त (Autonomous) दर्जा प्राप्त झाला आहे. या मान्यतेमुळे संस्थेला शैक्षणिक, प्रशासकीय व अभ्यासक्रम रचनेत अधिक स्वायत्तता मिळणार असून विद्यार्थ्यांना अत्याधुनिक, उद्योगाभिमुख आणि संशोधनाधारित शिक्षण उपलब्ध होण्यास मोठी चालना मिळणार आहे. स्वायत्त दर्जा प्राप्त झाल्यामुळे संस्थेला स्वतःचे अभ्यासक्रम विकसित करण्याचे, तांत्रिक क्षेत्रातील बदलांनुसार अभ्यासपद्धती अद्ययावत करण्याचे तसेच विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासासाठी नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबविण्याचे स्वातंत्र्य मिळणार आहे. स्वायत्त दर्जा प्राप्त करण्यामध्ये डॉ. राजेंद्र गोडे शैक्षणिक परिसर, अमरावतीचे अध्यक्ष योगेंद्रजी गोडे व सचिव तन्वी गोडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्राचार्य डॉ. सागर सी. जिरापुरे यांच्या कुशल नेतृत्व, दूरदृष्टी आणि परिश्रमांमुळे, सिव्हिल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख व IQAC इंचार्ज डॉ. गौरव डी. धाडसे यांच्या नियोजनबद्ध प्रयत्नातून व समन्वयातून, तसेच सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ही महत्त्वपूर्ण उपलब्धी साध्य झाली आहे. सदर संस्थेत बॅचलर ऑफ



इंजिनिअरिंग या पदवी अभ्यासक्रमांतर्गत सिव्हिल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स अशा आधुनिक व रोजगाराभिमुख शाखांमध्ये शिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. तसेच संस्थेत मास्टर ऑफ इंजिनिअरिंग या पदव्युत्तर अभ्यासक्रमांतर्गत ट्रान्सपोर्टेशन इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, थर्मल इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन या शाखांमध्ये उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध आहे. यासोबतच संस्थेत संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी पीएच.डी. (Ph.D.) अभ्यासक्रमदेखील सुरू असून इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग तसेच मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विषयांमध्ये संशोधन कार्यासाठी विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मेकॅनिकल इंजिनिअरिंग आणि इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग हे प्रमुख अभियांत्रिकी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.दरम्यान, अलीकडेच या संस्थेला एमबीए (MBA) व एमसीए (MCA) या महत्त्वपूर्ण व्यावसायिक अभ्यासक्रमांची मान्यता प्राप्त झाली असून त्यामुळे व्यवस्थापन व संगणक क्षेत्रात करिअर घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नवी दालने खुली झाली आहेत.

विशेष म्हणजे, डॉ. राजेंद्र गोडे एज्युकेशनल कॅम्पसचा विस्तीर्ण परिसर अत्यंत निसर्गरम्य, शांत व हिरवळीने नटलेला असून विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी प्रेरणादायी वातावरण येथे उपलब्ध आहे.स्वायत्त दर्जा प्राप्त झाल्यामुळे संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीत नवे पर्व सुरू झाले असून भविष्यातही उत्कृष्ट शिक्षण व संशोधनाच्या माध्यमातून हे महाविद्यालय तांत्रिक शिक्षण क्षेत्रात नवे मानदंड प्रस्थापित करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

**नावात बदल**

Old name - Rhigved Ashutosh Wankhade
**New name - Rheegved Ashutosh Wankhade**
माझा जुना Passport No. N9621297 असून त्यामध्ये माझे नाव Rhigved Ashutosh Wankhade हे होते ते आता **Rheegved Ashutosh Wankhade** असे आहे तरी या पुढील सर्व व्यवहार Rheegved Ashutosh Wankhade याचा नावाने होतील.

**Rheegved Ashutosh Wankhade**
**आधार नंबर**
९८८३८४१८०३०४

GHARKUL Masale

**पाहिजेत**

**ब्रँडेड अगरबत्ती घरोघरी विक्रीकरिता महिला व पुरुष पाहिजे.**

**: संपर्क :**
**घरकुल मसाले फॅक्टरी,**
**एमआयडीसी. अमरावती**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# दारूसाठी मुलाने केली वडिलांची हत्या

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोपाल नगर परिसरात शुक्रवारी एका भयानक घटनेने खळबळ उडवली. दारूच्या पैशावरून भांडण करणाऱ्या मुलाने स्वतःच्या वडिलांवर लाकडी बल्लीने वार करून त्यांची जागीच हत्या केली.

मनोहर मधुकर बोरकर (वय ५५) आणि त्यांचा मुलगा राहुल मनोहर बोरकर (वय ३३) यांच्यात गुरुवारी मध्यरात्रीनंतर दारूच्या पैशांवरून वाद झाला. माहितीप्रमाणे, राहुल सातत्याने वडिलांकडे दारू पिण्यासाठी पैसे मागत होता. वडिलांनी पैसे देण्यास नकार दिल्याने वादात तणाव वाढला. संतप्त



राहुलने घरात असलेली लाकडी बल्ली उचलून





पित्याच्या डोक्यावर वार केले. या भीषण मारहाणीत मनोहर बोरकर यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच राजापेठ पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलीस निरीक्षक पुनीत कुळट यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने तपास सुरु करून काही तासांतच राहुल बोरकर याला ताब्यात घेतले. आरोपीविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. ही घटना उघडकीस आल्यावर गोपाल नगर परिसरात लोकांमध्ये भीती आणि हळहळ व्यक्त होत आहे.

# जमीन प्रकरण निकाली काढण्यासाठी ५० हजारांची लाच

## लिपिकासह महादूल सहाय्यक अँटी करप्शनच्या जाळ्यात

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** जमीन प्रकरण निकाली काढून आदेश काढून देण्यासाठी ५० हजार रुपयांची लाच मागून ती स्वीकारताना अँटी करप्शन ब्युरोच्या पथकाने दोन शासकीय कर्मचाऱ्यांना रंगेहाथ पकडले. ही कारवाई शुक्रवारी (दि. १३ मार्च) यवतमाळ शहरातील स्टेट बँक चौक परिसरात करण्यात आली.

या प्रकरणात राहुल अरुणराव कुंपटे (वय ३८), वरिष्ठ लिपिक, तहसील कार्यालय पांढरकवडा (प्रतिनियुक्ती) तसेच गोपाल महादेव मोहोड़े (वय ४०), महादूल सहाय्यक, महादूल कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, यवतमाळ यांना अटक करण्यात आली आहे.

तक्रारदाराच्या नातेवाईकांची शेती जमीन भोगवटादार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रूपांतरित करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज करण्यात आला होता. या प्रकरणाचा प्रस्ताव पुढे पाठवून आदेश काढून देण्यासाठी आरोपींनी तक्रारदाराकडे ५० हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार अँटी करप्शन ब्युरो, यवतमाळ येथे करण्यात आली. तक्रारीची पडताळणी करण्यात आली असता लाचेची मागणी झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर अँटी करप्शनच्या पथकाने सापळा रचला.

दि. १३ मार्च २०२६ रोजी तक्रारदाराकडून ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना आरोपींना स्टेट बँक चौक येथील फॅन्सी बार परिसरात रंगेहाथ पकडण्यात आले. या कारवाईनंतर दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून यवतमाळ शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई अमरावती परिक्षेत्र अँटी करप्शन ब्युरोचे पोलीस अधीक्षक बापू बांगर व अपर पोलीस अधीक्षक सौरभ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक अभय आढेकर, पोलीस निरीक्षक अर्जुन घवटे व पथकातील कर्मचाऱ्यांनी केली. दरम्यान, शासकीय कामासाठी कोणीही लाच मागितल्यास नागरिकांनी अँटी करप्शन ब्युरो, यवतमाळ कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन अँटी करप्शन विभागाने केले आहे.

## देशात अमरावतीचे सर्वाधिक तापमान

# पारा पोहचला ४२.८ अंश सेल्सिअस वर

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यात उन्हाचा तडाका दिवसेंदिवस वाढत आहे. मार्च महिन्याच्या सुरुवात पासूनच तापमानात वाढ आहे. अमरावतीचे आज शुक्रवार रोजी कमाल तापमान ४२ अंश सेल्सियस वर पोहचले आहे.



देशातील सर्वाधिक हॉट शहर म्हणून अमरावतीची ओळख झालेली आहे. शहरात सरासरीपेक्षा तब्बल ६.८ अंशांनी अधिक तापमान वाढ झाली आहे. विदर्भातील अनेक शहरांमध्ये उष्णतेचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. तसेच काही जिल्ह्यात अवकाळी पावसाचा ही इशारा देण्यात आलेला आहे. असे असले तरीही अमरावतीचे तापमान गेल्या आठवड्याभरा☞(पान २ वर)

# उमरसरात जुन्या वादातून तरुणाची निर्घृण हत्या

## तीन ते चार अज्ञात हल्लेखोरांकडून चाकूने सपासप वार

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** शहरातील उमरसरा परिसरात जुन्या वादाचा वचपा काढत एका तरुणाची चाकूने सपासप वार करून निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी रात्री सुमारे १० वाजताच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शहरात खळबळ उडाली आहे.



मृत तरुणाचे नाव अमोल खडसे (वय २७, रा. पाटीपुरा, यवतमाळ) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अमोल खडसे हा पूर्वी उमरसरा येथील तीन फोटो परिसरात राहत होता. त्या भागातील काही तरुणांसोबत त्याचे वारंवार वाद होत असल्याने तो काही काळापूर्वी पाटीपुरा येथे भाड्याने राहायला गेला होता.

दरम्यान गुरुवारी रात्री अमोल खडसे उमरसरा येथील तीन फोटो परिसरात आला असताना, जुन्या वादाचा राग मनात धरून तीन ते चार अज्ञात व्यक्तींनी त्याच्यावर अचानक हल्ला चढविला. हल्लेखोरांनी चाकू व इतर धारदार शस्त्रांनी त्याच्यावर सपासप वार केले. गंभीर जखमी अवस्थेत त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले.☞(पान २ वर)

# अमरावतीत करण कोठारी ज्वेलर्सच्या भव्य शोरूमचे १५ मार्चला उद्‌घाटन

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपूरमधील विश्वासाचे आणि शुद्धतेचे नाव असलेल्या करण कोठारी ज्वेलर्सची सुवर्णगाथा आता अमरावतीत सुरू होत आहे. गेल्या अनेक दशकांपासून मध्य भारतात आपल्या उत्कृष्ट कारागिरीने ओळखल्या जाणाऱ्या या ब्रँडच्या भव्य शोरूमचा उद्‌घाटन सोहळा रविवार १५ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे,अशी माहिती संचालक कोठारी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

१९६५ मध्ये नागपूरच्या शहीद चौक येथून सुरू झालेला हा प्रवास आज महाराष्ट्र आणि मध्य भारतातील ग्राहकांच्या पसंतीस उतरला आहे. पारदर्शकता हे या ब्रँडचे मुख्य वैशिष्ट्य आहे. येथील प्रत्येक दागिना



बीआयएस ९१६ हॉलमार्क आणि एचयुआयडी प्रमाणित असतो. विशेष म्हणजे ग्राहकांना पूर्ण पारदर्शकता मिळावी यासाठी हॉलमार्क आणि एचयुआयडी क्रमांक बिलावर स्पष्टपणे नमूद केले जातात. सोन्यासोबतच येथे जीआयए प्रमाणित हिऱ्यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे कलेक्शनही उपलब्ध आहे.

करण कोठारी ज्वेलर्स केवळ शुद्धतेसाठीच नाही तर त्यांच्या रास्त मेकिंग चार्जेससाठी ओळखले जातात. अमरावतीच्या या नवीन शोरूममध्ये ☞(पान २ वर)

# गॅस दरवाढ व टंचाई विरोधात युवक काँग्रेस आक्रमक

## अंबानाला परिसरात केंद्र सरकारच्या विरोधात घोषणाबाजी

**अमरावती/प्रतिनिधीः-** घरगुती गॅसच्या किमती गगनाला भिडल्या असून सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. दुसरीकडे गॅसचा मोठा तुटवडा निर्माण झाल्याने गृहिणींचे बजेट पूर्णपणे कोलमडले आहे. या भीषण परिस्थितीचा आज शुक्रवार १३ मार्च रोजी सायंकाळी युवक काँग्रेसच्या वतीने निषेध करण्यात आले.अंबा नाला परिसरात अनोखे प्रतीकात्मक आंदोलन करून केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.?आंदोलना दरम्यान



कार्यकर्त्यांनी 'नरेंद्र सरेंडर' अशा गगनभेदी घोषणा दिल्या. देशाच्या संरक्षणाचा मुद्दा असो वा नागरिकांच्या मूलभूत गरजा, केंद्र सरकार प्रत्येक आघाडीवर अपयशी ठरल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. सीमेवरील सुरक्षेपासून ते देशांतर्गत महागाईपर्यंत सर्वच बाबतीत सरकारने शरणागती पत्करली असल्याची टीका करत कार्यकर्त्यांनी सरकारचे लक्ष वेधून घेतले. पंतप्रधान मोदींवर प्रखर टीका ☞(पान २ वर)

## शहरात प्रतिबंधात्मक कलम ३७ (१) व (३) लागू

**अमरावती :** शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला आहे. सदर आदेश दि. १३ मार्च ते दि. २७ मार्चच्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी कळविले आहे.

# ग्राहकांनी गॅस सिलिंडरसाठी आगाऊ बुकींग करू नये

## जिल्हाधिकाऱ्यांचे नागरिकांना आवाहन

**-घरपोच सेवा देण्यासाठी यंत्रणा राबविणार**

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत सुरू आहे. मध्यंतरीच्या काळात फोनद्वारे होणाऱ्या बुकींगसाठी वेळ लागत असल्याने ग्राहकांमध्ये घबराहट निर्माण झाली. परिणामी ग्राहकांनी आवश्यकता नसताना खबरदारी म्हणून गॅस बुकींग सुरू केले. यामुळे वितरणावर परिणाम होत असल्याने ग्राहकांनी गॅस सिलिंडरसाठी आगाऊ बुकींग करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील घरगुती गॅस सिलिंडरच्या वितरणाबद्दल वितरकांची बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांच्यासह शहरातील गॅस वितरक उपस्थित होते.



जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी वितरकांकडून सद्यस्थितीची माहिती घेतली. वितरकांनी ग्राहकांसाठी ?प, तसचे फोनद्वारे बुकींगची सुविधा आहे. मात्र फोनद्वारे गॅस बुकींग करणाऱ्यांची संख्या अधिक आहे. या यंत्रणेमध्ये दुरूस्ती सुरू आहे. परिणामी ग्राहकांना बुकींग करताना वेळ लागत आहे. तसेच मध्यपूर्व भागातील युद्धामुळे घबराटीचे वातावरण असल्यामुळे ग्राहक आगाऊ गॅस बुकींग करीत आहे. बुकींग जादा झाल्यामुळे वितरणाला वेळ लागत आहे. त्यामुळे ग्राहकांनी अशाप्रकारची बुकींग टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. बुकींगनंतर ग्राहकांना घरपोच सिलिंडर देण्यात येत असल्याचे सांगितले.

शासनाने व्यावसायिक गॅस पुरवठा बंद केला आहे. त्यामुळे वितरकांनी घरगुती सिलिंडर वितरणावर लक्ष केंद्रीत करावे. गॅस कंपन्यांनी वितरणाची सशक्त यंत्रणा उभारली असली तरी बुकींग केलेल्याच ग्राहकांना सिलिंडरचे वितरण करण्यात यावे. तसेच एजंसीसमोर सिलिंडरच्या रांगा लागत असल्याने ग्राहकांना घरपोच ☞(पान २ वर)

# ४३ वर्षीय पुरुषाची गळफास घेऊन आत्महत्या

## रवी नगरातील बंद घरात दोन दिवस मृतदेह होता पडून

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील रवी नगर परिसरात गुरुवारी धक्कादायक घटना उघडकीस आली. ४३ वर्षीय सतीश अजाबराव काजे यांनी घरातच गळफास घेऊन आत्महत्या केली. मृतदेह दोन दिवसांपासून बंद घरात पडला होता, ज्यामुळे परिसरात भीती आणि खळबळ पसरली होती.

निलेश अजाबराव काजे यांच्या फिर्यादीनुसार, सतीश आपल्या पत्नीसोबत वरच्या मजल्यावर राहात होते. पत्नी काही दिवसांपूर्वी माहेरी गेल्यामुळे ते घरात एकटे होते. सतीश यांना दारू पिण्याची सवय होती आणि मधुमेहाचा त्रासही होता. १२ मार्च रोजी सकाळी निलेश यांच्या आईला वरच्या मजल्यावरून तीव्र दुर्गंधी येत असल्याचे ☞(पान २ वर)

# महिलेच्या घरातून हातभट्टी दारूचा साठा जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा हद्दीत गुन्हे शाखेच्या पथकाने पेट्रोलिंग करत असताना दारू तस्करी प्रकरणाचा पर्दाफाश केला. मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, आरोपी महिलेच्या (वय ६५, रा. भोईपुरा वडाळी, अमरावती) घरात हातभट्टी दारू तयार केली जात असल्याचे समोर आले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घरातून ५५ लिटर हातभट्टी दारू, ९० लिटर मोहमास सडवा आणि इतर साहित्य जप्त करून जागीच नष्ट करण्यात आले. या कारवाईत एकूण ४१,५५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी फ्रेजरपुरा ठाण्यात आरोपीविरुध्द कलम ६५(क)(फ)(ड) म.दा.का. अंतर्गत गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरु आहे. फ्रेजरपुरा पोलीस यांच्या या धडक कारवाईमुळे शहरात दारू तस्करीवर जोरदार संदेश गेला आहे.

# गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाला रोखण्यासाठी एचपीव्ही लस पूर्णपणे सुरक्षित

## अफवांवर विश्वास ठेवू नका जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** महिलांमध्ये वाढणाऱ्या गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाला प्रभावीपणे रोखण्यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातर्फे 'जिल्हास्तरीय एचपीव्ही लसीकरण' मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला आहे. नुकतेच आष्टी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात या मोहिमेचे उद्घाटन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे आणि जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. हर्षल क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. प्रवीण पारिसे यांनी सोशल मीडियावरून पसरवल्या जाणाऱ्या चुकीच्या माहितीचे ☞(पान २ वर)

# वृद्ध महिलेवर अत्याचार करणाऱ्या आरोपीवर कारवाई करा

## -मैत्री संघटना व बंजारा समितीची मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील सोवगाव तालुक्यातील जरंडी गावातील एका ८० वर्षीय बंजारा समाजाच्या वृद्ध महिलेवर बलात्कार करणाऱ्या नराधम शेख रमजान शेख मोहम्मद याच्यावर कठोर कार्यवाही करण्याची मागणी मैत्री संघटना व युवा गोर बंजारा समितीच्या वतीने आज शुक्रवार १३ मार्च रोजी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, ६ मार्च रोजी आरोपीने गावातीलच एका वृद्ध महिलेवर अत्याचार केला. अमानुष कृत्य करून मानवतेला काळिमा फासणारी ही घटना आहे. ही घटना केवळ बंजारा समाज नव्हे तर संपूर्ण मानव जातीसाठी लज्जास्पद आहे. आरोपी विरुद्ध कठोर कार्यवाही करून वृद्धेला न्याय देण्याची मागणी केली आहे. यावेळी निलेश जाधव, करण ☞(पान २ वर)

# एनएसयुआय व इतर विद्यार्थी संघटनांचा कुलगुरूंच्या दालनात ठिय्या

## अभाविपने सिनेट सभेत घातलेल्या गोंधळावर अखेर नेमली चौकशी समिती

**अमरावती/प्रतिनिधीः-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात घडलेल्या घटनेवर NSUI व सर्व पक्षीय विद्यार्थी संघटने कडून निषेध करण्यात आला व निवेदन देण्यात आले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आमसभेदरम्यान ABVP संघटनेच्या काही कार्यकर्त्यांकडून सिनेट सदस्यांवर हल्ला करण्याचा प्रयत्न झाल्याच्या घटनेचा NSUI ने



तीव्र निषेध व्यक्त केला आहे. या संदर्भात NSUI चे शहर अध्यक्ष संकेत साहू यांनी कुलगुरू डॉ. मिलिंद बरहाते यांना निवेदन देत तातडीने कारवाईची मागणी केली.

निवेदनात म्हटले आहे की, विद्यापीठाच्या☞(पान २ वर)

# शहराचा पाणीपुरवठा सुरळीत राहणार

## -मजिप्रा उप अभियंता यांचे स्पष्टीकरण

**अमरावती/प्रतिनिधीः-** सोशल मीडिया मध्ये अनेक वेळा खोट्या बातम्या प्रचारीत व प्रसारित केल्या जातात या बातम्यांचा सर्वसामान्यांच्या जीवनाशी संबंध असतो, काही खोडसाळ प्रवृत्तीचे लोक अशा वावड्या उठवतात आणि लोकांमध्ये घबराट निर्माण होते.त्यात १५ मार्च पासून दहा दिवस अमरावती व बडनेराचा पाणीपुरवठा बंद राहणार असल्याचे सुतोवाच करण्यात आले होते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे उपअभियंता संजय लवरकर यांनी पाणीपुरवठा सुरळीत राहील असे स्पष्टीकरण दिले आहे आणि कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन अमरावती व बडनेराच्या नागरिकांना केले आहे. सोशल मीडियावर वावड्या पसरविल्या जातात. कधी पेट्रोल व डिझेल संपले तर कधी घरेलू गॅस सिलेंडरचा स्टॉक संपला असे खोटे वृत्त प्रसारित करण्यात येते. याच श्रृंखलेत अमरावती शहराचा पाणीपुरवठा १५ मार्च २०२६ पासून दहा ☞(पान २ वर)

# जिल्हा न्यायालय परिसरातील कंटेनरची महापौरांकडून पाहणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील स्वच्छता व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी आज जिल्हा न्यायालय परिसरातील कचरा कंटेनरची पाहणी केली. या पाहणीदरम्यान परिसरातील स्वच्छता, कचरा व्यवस्थापन तसेच नागरिकांना येणाऱ्या अडचणींबाबत माहिती घेतली.

महापौर श्रीचंद तेजवाणी



यांनी संबंधित अधिकाऱ्यांना परिसरात नियमित स्वच्छता ठेवण्याचे आणि कचरा वेळेवर उचलण्याचे ☞(पान २ वर)